# भाग - एक

# प्रारंभिक

**1.** **संक्षिप्त नांव, व्याप्ती व प्रयुक्ती .-**

या नियमांस, महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम, 2014 असे म्हणावे.
(यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य नियम" असा करण्यात आला आहे).
दि. 06.08.2018 रोजीची अधिसुचना महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) (प्रथम सुधारणा) नियम 2017

**2.** **व्याख्या -** या नियमांत संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षीत नसेल तर,

(1) 'अधिनियम' याचा अर्थ महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 (महा. XXIV of १९६१) असा आहे.

(2) 'मतदान पेटी' यात मतदारांनी मतपत्रिका टाकण्यासाठी वापरलेली कोणतीही पेटी, पिशवी किंवा इतर वस्तू किंवा इलेक्ट्रॅनिक मतदान यंत्र यांचा समावेश होतो.

(3) 'उपविधी' याचा अर्थ अधिनियमान्वये तयार केलेले संस्थेचे उपविधी, असा आहे.

(4) 'मुख्य कार्यकारी अधिकारी' याचा अर्थ ज्या संस्थेची निवडणूक व्हावयाची आहे अशा संस्थेचा प्रशासकीय प्रमुख अथवा समकक्ष अधिकारी, असा आहे.

(5) 'समिती' याचा अर्थ जिच्याकडे संस्थेच्या कामकाजाचे व्यवस्थापन सोपविण्यात आले असेल अशा सहकारी संस्थेची व्यवस्थापन समिती किंवा संचालक मंडळ किंवा नियामक मंडळ किंवा निदेशन निकाय –मग तिला कोणत्याही नावाने संबोधले जावो, असा आहे.

(6) 'मतदारसंघ' याचा अर्थ संस्थेच्या उपविधींमध्ये विनिर्दष्ट केलेले निर्वाचक विभाग, असा आहे.

(7) 'भ्रष्ट कृती' याचा अर्थ नियम 79 मध्ये विनिर्दष्ट केलेली कोणत्याही कृती, असा आहे.

(8) 'जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी' याचा अर्थ म्हणजे राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या पर्यवेक्षणाखाली व नियंत्राणखाली जिल्हयातील सहकारी संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी त्याचे कार्य पार पाडतांना प्राधिकरणाला सहाय्य करण्याकरिता जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्यापेक्षा कमी दर्जा नसेल असा राज्य सहकारी निवडणूक प्राधिकारणाने मान्यता दिलेला किंवा मान्यता दिलेले अधिकारी, असा आहे.

(9) 'निवडणूक' याचा अर्थ सहकारी संस्थेच्या समितीस किंवा समितीच्या सदस्यांना आणि पदाधिका-यांना निवडून देण्यासाठी घेतलेल्या निवडणुका, असा आहे.

(10) 'मतदार यादी' याचा अर्थ नियम 8 व नियम 11 नुसार, अंतिम रुप दिलेली मतदारांची यादी, असा आहे.

(11) 'निरीक्षक' याचा अर्थ राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने सहकारी संस्थांची निवडणूक किंवा निवडणूका घेतांना त्यावर लक्ष ठेवण्यासाठी किंवा प्राधिकरणकडून सोपविण्यात येतील अशी इतर कोणतीही कार्ये पार पाडण्यासाठी नामनिर्देश केलेला शासकीय अधिकारी, असा आहे.

(12) 'मतदान अधिकारी' याचा अर्थ निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने निवडणुकीकामी मतदान केंद्राध्यक्ष यांन मदत करण्यासाठी नेमलेली कोणतीही व्यक्ती, असा आहे.

(13) 'मतदान केंद्राध्यक्ष' याचा अर्थ निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने निवडणूकीकामी नेमलेली कोणतीही व्यक्ती, असा आहे.

(14) 'सार्वजनिक सुट्टी' याचा अर्थ परक्राम्य संलेख अधिनियम, 1881 (1881 चा 26) याच्या कलम 25 च्या प्रयोजनाकरता ज्या दिवशी सार्वजनिक सुट्टी असेल असा कोणताही दिवस असा असून, त्यामध्ये राज्यातील सरकारी कार्यालयासाठी सुट्टी म्हणून राज्य शासनाने किंवा जिल्हाधिकाऱ्याने त्या जिल्हयासाठी स्थानिक सुट्टी म्हणून अधिसूचित केलेल्या इतर कोणत्याही दिवसाचा समावेश होतो.

(15) 'राखीव जागा' याचा अर्थ (~~अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती, महिला, विमुक्त जाती किंवा भटक्या जमाती किंवा विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास प्रवर्ग वगळण्यात आले आहे~~) या ऐवजी कलम 73 ब आणि 73 क मध्ये नमूद प्रवर्गातील सदस्यांसाठी राखून ठेवलेली जागा, असा आहे.

(16) 'निवडणूक निर्णय अधिकारी' याचा अर्थ सहकारी संस्थांच्या निवडणुका पार पाडण्यासाठी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या वतीने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने नेमणूक केलेली व्यक्ती, असा आहे.

(17) 'राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण याचा अर्थ उक्त अधिनियमाच्या कलम 73 कब नुसार राज्य शासनाने घटित केलेल राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, असा आहे.

(18) 'कलम' याचा अर्थ उक्त अधिनियमाचे कलम, असा आहे.

(19) 'संस्था' याचा अर्थ उक्त अधिनियमात विनिर्दिष्ट केलेली संस्था, असा आहे.

(20) 'तालुका किंवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी' याचा अर्थ तालुक्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका पार पाडण्याच्या दृष्टीने, सर्व कार्य पार पाडील असा राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने मान्यता दिलेला आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण व जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांच्या अधीक्षणाखाली व नियंत्रणाखाली असलेला अधिकारी, असा आहे.

## 3. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे अधिकार (रा.स.नि.प्रा.) :-

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास, सहकारी संस्थांच्या निवडणुका पार पाडण्यासाठी खालील अधिकार असतील.

(1) निवडणुका घेण्याच्या प्रयोजनार्थ, कोणत्याही पदावर असलेल्या राज्य शासनाच्या किंवा कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्था किंवा कोणत्याही सहकारी संस्थेच्या कोणत्याही अधिका-याची किंवा कर्मचा-याची अशा पदनामासह व कर्तव्यांसह नेमणूक करणे आणि अशा प्रकारे नेमणूक केलेल्या प्रत्येक अधिका-याने किंवा कर्मचा-याने त्याला नेमून दिलेली कर्तव्ये पार पाडणे त्याच्यावर बंधनकारक असेल, ही कर्तव्ये पार पाडण्यात कसूर केल्यास, तो, भारतीय दंड संहिता 1860 च्या प्रकरण 10 च्या अर्थातर्गत लोकसेवकाच्या कायदेशीर प्राधिकाराचा अवमान केल्याबददल खटला दाखल केला जाण्यासाठी पात्र असेल.

परंतु, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण साधारण किंवा विशेष आदेशाने राज्य शासनाच्या जिल्हा उपनिबंधक पेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकारी किंवा कर्मचा-यास ह्या उपखंडांतर्गतचे तिचे अधिकार वापरण्याचे निर्देश देऊ शकेल.

परंतु आणखी असे की, असा अधिकारी किंवा कर्मचारी राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाच्या सर्वसाधारण पर्यवेक्षण व नियंत्रणाखाली काम करील.

(2) निवडणूक घेण्यासाठी त्यांना योग्य वाटत असेल अशी आवश्यक असलेली कोणतीही शासकीय किंवा खाजगी जागा, वाहने, सेवा किंवा इतर कोणतीही साधनसामग्री यांची राज्य शासनाचे कोणतेही कार्यालय, स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था यांच्याकडून मागणी करणे, अशी मागणी केल्यावर, ज्यांच्याकडे अशी मागणी केली असेल त्या प्राधिका-याने जागा, वाहने किंवा यथास्थिती , इतर कोणतीही साधनसामग्री यांचा ताबा, मागणी करणा-या प्राधिकरणकडे किंवा याबाबतीत प्राधिकरणाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीकडे तात्काळ सुपूर्द करणे बंधनकारक असेल.

**परंतु आणखी असे की, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणास सर्वसामान्य किंवा विशिष्ट आदेशाव्दारे जिल्हा उपनिबंधकपेक्षा कमी दर्जाचा नसलेल्या, राज्य शासनाच्या कोणत्याही अधिकारी किंवा कर्मचाऱ्यास, ह्या खंडाखालील अधिकारांचा वापर करुन निदेश देता येतील.**

(3) संस्थांच्या कामकाजाचे स्वरुप किंवा वर्ग यांनुसार संस्थेच्या कार्यक्षेत्रात अंमलबजावणी करावयाची आचारसंहिता विहीत करणे.

(4) निवडणूका सुरळीतपणे व मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी त्यावर लक्ष ठेवण्याच्या दृष्टीने नेमणूक करण्यात येईल असे निरीक्षक व क्षेत्रीय अधिकारी यांची आवश्यकता असेल तेव्हा व त्याप्रमाणे नेमणूक करणे.

(5) निवडणूका सुरळीतपणे व मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी अधिनियम व नियमांच्या तरतुदींशी विसंगत नसतील असे विशेष किंवा साधारण आदेश किंवा निर्देश देणे

(6) अधिनियमाच्या कलम 73 कब च्या पोटकलम (13) नुसार संस्थानी 'निवडणुक निधीत' आगाऊ जमा करावयाची आवश्यक असलेली निवडणुक खर्चाची संबंधित अंदाजित रक्कम संस्था किंवा संस्थांचा वर्ग यांचेसाठी निर्धारीत करण्याचे साधारण व विशेष आदेश जारी करणे. राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाने निवडणुक खर्चाची अंदाजित रक्कम निर्धारीत करतांना मतदार संख्या, उमेदवार संख्या, मतदान केंद्र संख्या, मतदार संघ संख्या, संस्था कार्यक्षेत्र, संस्था वर्ग, इत्यादी निकष पदाधिकारी निवडणुकांसह संस्था निवडणूका सुरळीतपणे व मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी विचारात घ्यावेत.

# भाग - दोन
## संस्थांचे प्रकार

**4. संस्थांचे प्रकार**

या अधिनियमान्वये संस्थांच्या निवडणूका घेण्याच्या प्रयोजनासाठी संस्थांचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात येईल, जसेः- खाली नमूद केलेल्या प्रवर्गातील संस्थांच्या समित्यांच्या सदस्यांची व समित्यांच्या पदाधिका-यांची निवडणूक ही, अधिनियमाच्या कलम 73 कब चे पोट-कलम (11) च्या तरतुदींच्या अधीन असेल.

**(एक) 'अ' वर्ग प्रकारात मोडणा-या संस्था**

(1) राज्य स्तरीय शिखर किंवा संघीय सहकारी संस्था;

(2) महाराष्ट्र राज्य सहकारी बँक;

(3) महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी व ग्रामीण बहुद्देशीय विकास बँक;

(4) महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्तीय महामंडळ;

(5) महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ;

(6) महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महामंडळ;

(7) सर्व सहकारी साखर कारखाने;

(8) सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका;

(9) सर्व सहकारी सूत गिरण्या;

(10) मागील आर्थिक वर्षात दररोज सरासरी एक लाख लिटर्स किंवा एक लाख लिटर्सपेक्षा जास्त दूध संकलन असणारे सर्व सहकारी दूध महासंघ किंवा संघ.

**(दोन) 'ब' वर्ग प्रकारात मोडणा-या संस्था**

(1) सर्व नागरी सहकारी बँका,

(2) सर्व पगारदारांच्या सहकारी बँका,

(3) (~~रुपये दहा लाख किंवा त्यापेक्षा जास्त वसूल भाग भांडवल असणाऱ्या प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था व आदिवासी सहकारी पतसंस्था,~~) **या ऐवजी सर्व प्राथमिक कृषि सहकारी पतसंस्था आणि आदिवासी कृषि सहकारी पतसंस्था.**

(4) (~~लगतच्या मागिल वर्षी दिनांक 31 मार्च रोजी रुपये शंभर लाख किंवा त्यापेक्षा जास्त ठेवी असलेल्या किंवा रुपये दहा लाख किंवा त्यापेक्षा जास्त वसूल भाग भांडवल असणाऱ्या सहकारी पतसंस्था,~~) **या ऐवजी सर्व सहकारी पतसंस्था ज्यांचे कार्यक्षेत्र एका जिल्ह्यापेक्षा जास्त आहे.**

(5) लगतच्या मागिल वर्षी दिनांक 31 मार्च रोजी रुपये शंभर लाख किंवा त्यापेक्षा जास्त वसूल भाग भांडवल असलेल्या पगार नोकरदारांच्या सहकारी पतसंस्था,

(6) साखर कारखाने वगळता शासकीय सहाय्य मिळालेल्या इतर सर्व सहकारी प्रक्रिया संस्था,

(7) शासकीय सहाय्य मिळालेल्या सहकारी औद्योगिक-संस्था व सहकारी औद्योगिक वसाहती,

(8) सर्व जिल्हा किंवा तालुका सहकारी खरेदी विक्री संघ,

(9) सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी ग्राहक संस्था,

(10) ~~सर्व विभागीय व जिल्हा स्तरीय सहकार मंडळे~~, **सर्व सहकारी रुग्णालये आणि सहकारी शैक्षणिक संस्था**

(11) मागील आर्थिक वर्षात दररोज सरासरी एक लाख लिटर्स पेक्षा कमी दूध संकलन असणारे सर्व सहकारी दूध महासंघ किंवा संघ.

(12) 'अ' वर्ग प्रकारात न मोडणारे इतर कोणतेही जिल्हा/ तालुका सहकारी महासंघ / संघ.

**(तीन) 'क' वर्ग प्रकारात मोडणा-या संस्था**

(1) ~~रुपये दहा लाखांपेक्षा कमी वसूल भाग भांडवल असणाऱ्या सर्व प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था व आदिवासी सहकारी पतसंस्था,~~ वगळण्यात आले आहे.

(2) ~~लगतच्या मागिल वर्षी दिनांक 31 मार्च रोजी रुपये शंभर लाख पेक्षा कमी ठेवी असलेल्या, किंवा रुपये दहा लाखांपेक्षा कमी वसूल भाग भांडवल असणाऱ्या सर्व सहकारी पतसंस्था,~~ **या ऐवजी सर्व सहकारी पतसंस्था ज्यांचे कार्यक्षेत्र एका जिल्ह्यापुरते आहे.**

(3) लगतच्या मागिल वर्षी दिनांक 31 मार्च रोजी, रुपये शंभर लाख पेक्षा कमी वसूल भाग भांडवल असलेल्या पगारदारांच्या सहकारी पतसंस्था,

(4) लगतच्या मागिल वर्षी दिनांक 31 मार्च रोजी दोनशे किंवा दोनशे पेक्षा जास्त सभासद असलेल्या गृहनिर्माण संस्था,

(5) सर्व प्राथमिक ग्राहक सहकारी संस्था,

(6) ~~सर्व प्राथमिक दुग्ध, कुक्कुट, मत्स्य, वराह आणि पशुधन सहकारी संस्था,~~ **या ऐवजी सर्व प्राथमिक सहकारी दुग्ध संस्था, ज्यांचे दैनिक सरासरी दुग्ध संकलन लगतच्या आर्थिक वर्षात 100 लिटर किंवा 100 लिटरपेक्षा जास्त आहे.**

(7) ~~शासकीय सहाय्य नसलेल्या सर्व सहकारी औद्योगिक संस्था किंवा सहकारी औद्योगिक वसाहती~~, **या ऐवजी सर्व विभागीय व जिल्हा स्तरीय सहकार मंडळे**

(8) ~~साखर कारखाने वगळता शासकीय सहाय्य नसलेल्या इतर सहकारी प्रक्रिया संस्था~~, **वगळण्यात आले**

(9) सर्व प्रकारच्या प्राथमिक सहकारी पणन संस्था,

(10) ~~सर्व प्रकारच्या प्राथमिक विणकर (हातमाग व यंत्रमाग) सहकारी संस्था~~, **वगळण्यात आले**

(11) इतर कृषी सहकारी संस्था,

(12) लगतच्या मागिल वर्षी दिनांक 31 मार्च रोजी दोनशे किंवा दोनशे पेक्षा जास्त सभासद असलेल्या सहकारी उपसा जलसिंचन आणि सहकारी पाणी वापर संस्था,

(13) ~~वरील 'अ' व 'ब' प्रकारामध्ये आणि खालील 'ड' प्रकारामध्ये न मोडणा-या इतर कोणत्याही सहकारी संस्था किंवा संस्थांचा प्रवर्ग~~, **वगळण्यात आले**

**(चार) 'ड' वर्ग प्रकारामध्ये मोडणा-या संस्था**

(1) लगतच्या मागिल वर्षी दिनांक 31 मार्च रोजी दोनशे पेक्षा कमी सभासद असलेल्या सर्व सहकारी गृहनिर्माण संस्था,

(2) लगतच्या मागिल वर्षी दिनांक 31 मार्च रोजी दोनशे पेक्षा कमी सभासद असलेल्या सर्व सहकारी उपसा जलसिंचन आणि सहकारी पाणी वापर संस्था,

(3) सर्व मजूर किंवा वन कामगार सहकारी संस्था,

**खालील नोंदींचा समावेश करण्यात आला**

**(4) सर्व अनुदान अप्राप्त सहकारी औद्योगिक संस्था,**

**(5) सर्व अनुदान अप्राप्त सहकारी प्रक्रिया संस्था "साखर कारखाने वगळून,**

**(6) सर्व प्रकारच्या प्राथमिक विणकर (हातमाग व यंत्रमाग) सहकारी संस्था,**

**(7) सर्व प्राथमिक दुग्ध संस्था ज्यांचे मागील आर्थिक वर्षात दैनिक सरासरी दुध संकलन 100 लिटरपेक्षा कमी आहे,**

**(8) सर्व प्राथमिक कुक्कुट, मत्स्य, सुकरायल आणि पशुधन सहकारी संस्था,**

**(9) स्वयं व्यवसाय सहकारी संस्था, बेरोजगार तरुणांच्या सहकारी संस्था आणि ज्या संस्थांची नोंद सर्वसामान्य संस्था ह्या वर्गीकरणात झालेली आहे,**

परंतु, जर संस्था प्रकाराच्या वर्गीकरणा बाबत विवाद उद्भवला तर, त्याबाबत राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाचा निर्णय अंतिम राहिल व विवादाच्या सर्व पक्षकारांवर तो बंधन कारक राहील.

**5. ज्या संस्थांमध्ये निवडणुका घेतल्या जाणार आहेत, त्या संस्थांच्या नावांची वर्षवार माहिती:-**

(1) राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण हे, पुढील कॅलेंडर वर्षात निवडणूकीसाठी पात्र असलेल्या त्याच्या अधिकारितेतील सर्व संस्थांची नावे दर्शविणारी नमुना ‘इ-1’ मधील नोंदवही संस्थांच्या तपशिलासह **जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी आणि तालुका सहकारी निवडणुक अधिकारी, हे सुध्दा अशी नोंदवही त्यांचे अधिकारीतेतील** कार्यालयात ठेवतील.

(2) संस्थेची समिती ही, संस्थेच्या समितीचा कालावधी संपण्यापूर्वी सहा महिने अगोदर, नमुना ‘इ-2’ मधील माहिती जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका किंवा यथास्थिती प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांचेकडे पाठविल.

परंतु, ज्या संस्थेचे कार्यक्षेत्र एकापेक्षा जास्त जिल्ह्यात विस्तारलेले असेल, ती संस्था त्या संस्थेचे मुख्यालय ज्या जिल्ह्यात आहे, त्या जिल्ह्याच्या जिल्हा सहकारी निवडणूक अधिकाऱ्याकडे ही माहिती पाठवील.

परंतु आणखी असे की, संस्थेची समिती, कलम 73 कब चे पोटकलम (14) च्या खंड (अ) नुसार माहिती देण्यात कसूर करील तर, संबंधित जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका अथवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी नोंदवहीत उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे, या नियमाच्या प्रयोजनार्थ, अशा संस्थेच्या किंवा संस्थांच्या नावांची सूची तयार करील आणि नावांची अशी सूची ही, यात परस्पर विरुध्द काहीही सिध्द झाले नाही तर, निवडणूक घेण्यास अशी संस्था पात्र आहे याचा प्रथमदर्शनी पुरावा असेल.

## भाग-तीन

## मतदार यादी तयार करणे

**6. व्यक्ती सभासद असणाऱ्या सहकारी संस्थांची तात्पुरती मतदार यादी:-**

(1) ज्या वर्षी प्रत्येक संस्थेची सार्वत्रिक निवडणूक होणार असेल त्या वर्षातील मतदारांची तात्पुरती यादी अशा संस्थांकडून तयार करण्यात येईल. ज्या सभासदाने त्याचे नांव नोंदविल्यापासून **विद्यमान समितीचा कार्यकाल संपण्याच्या दिनांकापर्यंत ( स्पष्टीकरण ह्या उपनियमासाठी विद्यमान समितीचा कालावधी संपण्याचा दिनांक म्हणजे विद्यमान समिती ज्या दिनांकास, निवडणुकीच्या दिनांकापासून पाच वर्षांचा कालावधी पूर्ण करते असा दिनांक )** सभासद म्हणून कमीत कमी दोन वर्षे पूर्ण केली असतील व जो क्रियाशील सभासद असेल अशा सभासदाचा, अधिनियमाच्या कलम 26 व 27 अन्वये निर्धारित केल्याप्रमाणे तात्पुरत्या मतदार यादीत समावेश करण्यात येईल. उपविधीमध्ये वेगवेगळया मतदारसंघांची तरतूद करण्यात आली असेल तर, मतदारांची नांवे, उपविधीमध्ये निर्धारित केल्याप्रमाणे, आवश्यक असेल तर मतदारसंघ निहाय क्रमाने लावण्यात येतील.

(2) अधिनियमाच्या कलम 27 च्या पोट कलम (3अ) मध्ये जसे तरतुद केलेल्या दोन वर्षाचा कालावधीची गणना, सभासद म्हणून नावनोंदणी केल्याच्या दिनांकापासून ते ज्या दिनांकास संस्थेच्या व्यवस्थापन समितीची निवडणूक असेल त्या दिनांकापर्यंत करावयाची आहे.

परंतु, असा दोन वर्षाचा कलावधी अधिनियमाच्या कलम 27 च्या पोट कलम (3अ) प्रथम परंतुकात नमूद केल्याप्रमाणे सहकारी गृहनिर्माण संस्था व सहकारी गाळे संकुल संस्था यांचेकरीता गणना केली जाणार नाही:

परंतू आणखी असे की, अकल्पीत परिस्थती किंवा इतर कोणत्याही कारणामुळे समितीची मुदत संपण्यापूर्वी निवडणूका घेतल्या जाऊ शकत नाहीत अशा संस्थांच्या बाबतीत, तात्पूरती मतदार यादी ही, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणने निश्चित केलेल्या दिनांकाच्या आधारे तयार करण्यात येईल;

परंतू, आणखी तसेच, कलम 73 च्या पोट कलम (1अ) च्या खंड (अ) अन्वये, हंगामी समितीची मुदत संपल्यानंतर संस्थेच्या होणा-या पहिल्या निवडणूकीच्या वेळी, संस्थेच्या तात्पुरत्या मतदार यादीमध्ये निवडणुक नियत दिनांकास असलेल्या सर्व सभासदांचा समावेश होईल. परंतू, आणखी तसेच, ज्या सहकारी संस्थेवर कलम 77-अ अन्वये प्राधिकृत अधिकारी अथवा कलम 78-अ अन्वये प्रशासक नेमलेला असेल अशा संस्थेच्या बाबतीत, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांनी ठरवून दिलेल्या अर्हता दिनांकानुसार संस्थेच्या मतदारांची तात्पुरती मतदार यादी तयार करण्यात येईल.

(3) समितीची मुदत संपण्यापूर्वीच्या दिनांकापूर्वी 120 दिवस अगोदर तात्पूरत्या मतदार यादीच्या चार अधिप्रमाणित प्रती प्राधान्याने डीजीटल नमुन्यात, संस्थेच्या समितीकडून, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका अथवा

प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्याकडे किंवा राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणच्या निर्देशानुसार पाठविण्यात येतील. अशा यादीच्या प्रती, संस्थेच्या सूचना फलकावर लावण्यात येतील. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका अथवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यादया मिळाल्यापासून 10 दिवसांच्या आत, संस्थेच्या सभासदांकडून हरकती व दावे मागवील.

(4) कोणतीही समिती मतदारांच्या तात्पुरत्या यादीच्या प्रती, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका किंवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्याकडे उचित दिनांकास किंवा त्यापूर्वी पाठविण्यास कसूर करील तर, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा संबंधित तालुका सहकारी निवडणूक अधिकारी, स्वतः किंवा याबाबतीत त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीमार्फत, मतदारांची तात्पुरती यादी तयार करील आणि त्यासाठी आलेला खर्च, जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे समितीकडून किंवा इतर जबाबदार व्यक्तींकडून त्या संस्थेकडून वसुल करण्यात येईल.

(5) जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका किंवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी, लगतच्या पूर्वावर्ती पोटनियमान्वये कार्यवाही करीत असेल तर, तो संस्थेच्या सदस्यांकडून, दावे व हरकती मागविण्यासाठी, संस्थेकडून अशी यादी मिळाल्याच्या दिनांकापासून 10 दिवसांच्या आत, त्याच्या सुचनाफलकावर व त्या संस्थेच्या सुचनाफलकावर लावावयाच्या तात्पुरत्या मतदार यादीच्या प्रतींची व्यवस्था करील.

परंतू, अशी यादी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणच्या व सहकार विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यांत येईल.

**7. व्यक्ती सभासद असणाऱ्या सहकारी संस्थांच्या मतदारांच्या तात्पुरत्या यादीत समाविष्ठ करावयाचा तपशील -**

वैयक्तिक भागधारकांच्या बाबतीत, तात्पुरत्या मतदार यादीमध्ये, मतदाराची ओळख पटविण्यासाठीआवश्यक असतील अशा इतर तपशिलांबरोबर, मतदार म्हणून नोंदणी करण्यास हक्क असलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या ‘ नमुना ई-3’ मधील सभासदांच्या नोंदवहीत नोंद केल्याप्रमाणे त्याचे नांव, वडीलांचे किंवा पतीचे नांव, आडनांव (वर्णक्रमानुसार), कोणतेही असल्यास, व पत्ता यांचा समावेश असेल.

**8. व्यक्ती सभासद असलेल्या सहकारी संस्थांच्या तात्पुरत्या मतदार यादीसंबंधातील दावे व हरकती**:-

(1) दावे किंवा हरकत मागविण्यासाठी मतदारांची कोणतीही तात्पुरती यादी प्रसिध्द करण्यात येईल तेव्हा, मतदार असणाऱ्या संबंधित संस्थेच्या कोणत्याही सदस्यास, यादीतील नाव किंवा पत्ता किंवा इतर तपशील यांच्यासंबंधातील कोणतीही अकृती किंवा चूक, तात्पुरती मतदार यादी प्रसिद्ध झाल्यापासून दहा दिवसांच्या आत जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्या निदर्शनास आणून देण्यात येईल.

(2) प्रत्येक दावा किंवा हरकत लेखी स्वरुपात दाखल करण्यात येईल आणि ज्या कारणावरुन दावा कार्यालयीन वेळेत करण्यात किंवा, यथास्थित, हरकत घेण्यात आलेली असेल ती कारणे त्यात नमूद करण्यात येतील.

(3) जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका किंवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी किंवा राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणच्या निर्देशानुसार, याबाबतीत आवश्यक वाटत असेल अशी चौकशी केल्यानंतर, प्रत्येक दावा व हरकत यावर विचार करील आणि दावे किंवा हरकती प्राप्त होण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांकापासून 10 दिवसांच्या आत संबंधित व्यक्तींना त्यावरील त्याचा निर्णय लेखी देईल. त्यानंतर हरकती व दावे प्राप्त होण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांकापासून 15 दिवसांच्या आत अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल. सर्व दावे व हरकतींवर निर्णय दिल्यानंतर, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका किंवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांचेकडून पक्की करण्यात आलेली अंतिम मतदार यादी असेल.

(4) मतदारांच्या अंतिम यादीच्या प्रती जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका किंवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या सूचनाफलकावर तसेच संस्थेच्या सूचना फलकावर, निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यापूर्वी किमान 10 दिवस आणि कोणतीही हरकत व दावे निकालात काढल्यापासून 15 दिवसाहून उशिरा नसेल इतक्या कालावधीत प्रसिद्ध करण्यात येतील.

जिल्हा सहकारी निवडणूक अधिका-याला, अंतिम मतदार यादी, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या अधिकृत संकेतस्थळावर कोणतेही असल्यास, प्रसिध्द करण्याची व्यवस्था करता येईल.

**9. व्यक्ती सभासद अथवा व्यक्ती सभासद व संस्था सभासद असलेल्या सहकारी संस्थांची तात्पुरती मतदार यादी:-**

(1) (**लगत किंवा पुर्वी या शब्दांसाठी पर्यंत हे शब्द ठेवण्यात यावे** )ज्या वर्षी प्रत्येक संस्थांच्या निवडणूका घ्यावयाच्या असतील त्या वर्षासाठी मतदारांची तात्पुरती यादी अशा प्रत्येक संस्थेकडून तयार करण्यात येईल. ज्या सभासदांनी त्यांचे नाव नोंदविल्याच्या दिनांकापासून विद्यमान व्यवस्थापन समितीच्या कार्यकाल समाप्तीच्या दिनांकास **( स्पष्टीकरण ह्या उपनियमासाठी विद्यमान समितीचा कालावधी संपण्याचा दिनांक म्हणजे विद्यमान समिती ज्या दिनांकास, निवडणुकीच्या दिनांकापासून पाच वर्षांचा कालावधी पूर्ण करते असा दिनांक )** सभासद म्हणून किमान दोन वर्षे पूर्ण केली असतील अशा क्रियाशील सभासदांचा आणि सक्रिय सभासद असणा-या संस्थेच्या बाबतीत, ज्या संस्थेच्या विदयमान व्यवस्थापन समितीचा कालावधी संपण्याच्या दिनांकापूर्वी किंवा दिनांकास नोंदणी केल्याच्या दिनांकापासून किमान 3 वर्षे पूर्ण झालेल्या संस्थाचा, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 च्या कलम 27 मध्ये निर्धारित केल्याप्रमाणे, तात्पुरत्या मतदार यादीत समावेश करण्यात येईल. उपविधीमध्ये वेगवेगळया मतदारसंघाची तरतूद करण्यात आली असेल तर, मतदारांची नांवे, उपविधीमध्ये घालून दिल्याप्रमाणे, मतदारसंघ निहाय क्रमाने लावण्यात येतील.

(2) अधिनियमाच्य कलम 27 च्या पोटकलम (3अ) मध्ये तरतुद केलेल्या तीन वर्षांच्या कालावधीची गणना, सभासद म्हणून नावनोंदणी केलेच्या दिनांकापासून ते ज्या दिनांकास संस्थेच्या व्यवस्थापन समितीची निवडणूक असेल त्या दिनांकापर्यंत मोजण्यात येईल.

परंतू , अकल्पीत परिस्थीती किंवा इतर कोणत्याही कारणामुळे सहकारी संस्थांच्या समितीची मुदत संपण्यापूर्वी निवडणूक घेतल्या जाऊ शकत नाहीत अशा संस्थांच्या बाबतीत, तात्पुरती मतदार यादी ही, राज्य सहकारी निवडणूक प्राधीकरणाने निश्चित केलेल्या दिनांकाच्या आधारे तयार करण्यात येईल.

परंतू, आणखी असे की, कलम 73(1-अ) (अ) हंगामी समितीची मुदत संपल्यानंतर संस्थेच्या होणा-या पहिल्या पहिली निवडणूकीच्या वेळी, संस्थेच्या तात्पुरत्या मतदार यादीमध्ये निवडणुक नियत दिनांकास असलेल्या सर्व सभासदांचा समावेश असेल.

परंतू , आणखी तसेच, ज्या सहकारी संस्थेवर कलम 77-अ अन्वये प्राधिकृत अधिकारी किंवा कलम 78-अ अन्वये प्रशासक नेमलेला असेल अशा संस्थेच्या बाबतीत, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांनी ठरवून दिलेल्या अर्हता दिनांकानुसार संस्थेच्या मतदारांची तात्पुरती मतदार यादी तयार करण्यात येईल.

(3) समितीची मुदत संपण्यापूर्वीच्या दिनांकापूर्वी 120 दिवस अगोदर तात्पुरत्या मतदार यादीच्या मुद्रीत तसेच प्राधान्याने डीजीटल नमुन्यात चार अधिप्रमाणित प्रती, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका अथवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्याकडे किंवा राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या निर्देशानुसार पाठविण्यात येतील. अशा यादीच्या प्रती, संस्थेच्या सूचना फलकावर लावण्यात येतील. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका अथवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यादया मिळाल्यापासून 10 दिवसांच्या आत, संस्थेच्या सभासदांकडून हरकती अथवा सूचना मागवील.

(4) कोणतीही संस्था मतदारांच्या तात्पुरत्या यादींच्या प्रती, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका अथवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्याकडे उचित दिनांकास किंवा त्यापूर्वी पाठविण्यात कसूर करील तर, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका अथवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी स्वतः किंवा याबाबतीत त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीमार्फत, मतदारांची तात्पुरती यादी तयार करील आणि त्यासाठी आलेला खर्च, जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे जबाबदार समितीकडून वसूल करण्यात येईल.

(5) जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका किंवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी, लगतच्या पूर्ववर्ती पोटनियमान्वये कार्यवाही करीत असेल तर, तो, संस्थेच्या सभासदांकडून दावे व हरकती मागविण्यासाठी, संस्थेकडून अशी यादी मिळाल्याच्या दिनांकापासून 10 दिवसांच्या आत, त्यांच्या सुचनाफलकावर आणि संस्थेच्या सुचनाफलकावर लावावयाच्या तात्पुरत्या मतदार यादीच्या प्रतींची व्यवस्था करील.

परंतू, अशी यादी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणच्या व सहकार विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यांत येईल.

## 10. संस्था किंवा संस्था आणि व्यक्ती सभासद असलेल्या सहकारी संस्थांच्या तात्पुरत्या मतदार यादीत समाविष्ट करावयाचा तपशील :-

(1) वैयक्तिक सक्रीय सभासदांच्या बाबतीत, तात्पुरत्या मतदार यादीमध्ये, मतदाराची ओळख पटविण्यासाठी आवश्यक असतील अशा इतर तपशिलाबरोबर,मतदार म्हणून नोंदणी करण्यास हक्कदार असलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या नमुना ई-3 मधील सभासदांच्या नोंदवहीत नोंद केल्याप्रमाणे व्यक्तीचे नांव, तिच्या वडिलांचे किंवा पतीचे नांव, आडनांव, वय, स्त्री-पुरुष (वर्णक्रमानुसार) कोणीही असल्यास व पत्ता यांचा समावेश असेल.

(2) जेथे एखादी संस्था किंवा भागीदारी संस्था ही सहकारी संस्थेची सभासद असेल तेथे, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका किंवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी हा, संस्थेच्या किंवा भागीदारी संस्थेच्यावतीने निवडणुकीत मत देण्यासाठी यथोचितरित्या प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीचे नांव, जिल्हा सहकारी निवडणूक अधिका-याच्या किंवा तालुका किंवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिका-याच्या कार्यालयात पोहचणे शक्य व्हावे म्हणून समितीचा पदावधी संपण्याच्या दिनांकापूर्वी किमान 120 दिवस अगोदर त्या कार्यालयाकडे पाठवील. सभासद संस्थेने प्राधिकृत केलेला प्रतिनिधी हा, सभासद संस्थेचा सक्रीय सभासद असला पाहिजे.

(3) प्रतिनिधीचे नाव संस्थेला कळवितांना, संलग्न संस्था ही, जेथे प्रतिनिधीला अशा प्रकारे प्राधिकृत केले असेल तेथे, ~~तिच्या **उपविधीमध्ये** तरतूद **केल्याप्रमाणे**~~, संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या किंवा तिच्या समितीच्या ठरावाची एक प्रत सोबत जोडील. संस्था ही, जिल्हा सहकारी निवडणूक अधिका-याने किंवा तालुका किंवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिका-याने तात्पूरती मतदार यादी प्रसिद्ध करण्यासाठी निश्चित केलेल्या दिनांकापूर्वी तिला कळविण्यात येतील अशा सर्व प्रतिनिधींची नावे मतदार यादीत समाविष्ट करील. यादीमध्ये, ~~**प्रतिनिधींच्या नावांशिवाय**~~, सलग्न संस्थांची नावे, त्यांचे नोंदणी क्रमांक व ~~त्या ज्या मतदारसंघात, कोणताही असल्यास~~, ( ज्यांचे ते असतील य शब्दांऐवजी आणि प्रतिनिधींची नावे, कोणतीही असल्यास ) येतात त्या मतदारसंघाच्या नावांसहित पत्ते यांचा नावाचा समावेश असेल.

(4) ज्या संस्थेने तिच्या अधिकृत प्रतिनिधीचे नाव कळविलेले असेल त्या संस्थेला, केवळ प्रतिनिधीचा मृत्यू झाला असेल किंवा जेथे नामनिर्देशन करण्याच्या शेवटच्या दिनांकापूर्वी 5 दिवसाच्या आत सभासद संस्थेची समिती नव्याने निवडून आली असेल त्याबाबतीत, ठरावाव्दारे, पाठविलेल्या प्रतिनिधीचे नांव बदलण्याची परवानगी असेल.

## 11. संस्था किंवा संस्था आणि व्यक्ती सभासद असलेल्या सहकारी संस्थांच्या तात्पुरत्या मतदार यादी संबंधातील व अंतिम मतदार यादर संबंधातील दावे व हरकती :-

(1) दावे किंवा हरकती मागविण्यासाठी मतदारांची कोणतीही तात्पुरती यादी प्रसिध्द करण्यात येईल तेव्हा, मतदार असणाऱ्या संबंधित संस्थेच्या कोणत्याही सदस्यास किंवा अशा संस्थेच्या वतीन मत देण्यास प्राधिकृत केलेल्या कोणत्याही प्रतिनिधीस, यादीतील नाव किंवा पत्ता किंवा इतर तपशील यांच्यासंबंधातील कोणतीही अकृती किंवा चूक, मतदार यादी प्रसिद्ध झाल्यापासून दहा दिवसांच्या आत कार्यालयीन वेळेत, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका किंवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्या निदर्शनास आणून देता येईल.

(2) दावा करणा-या किंवा हरकत घेणा-या संबंधित संस्थेच्या कोणत्याही सभासदाला, स्वतंत्रा विनंती अर्ज करुन तसे करता येईल, असा विनंतीअर्ज हा दावे किंवा हरकती मागविण्यासाठी प्रसिध्द केलेल्या शेवटच्या दिनांकापूर्वी, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका किंवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांचेकडे कार्यालयीन वेळेत सादर करण्यात येईल. असे दावे किंवा हरकती लेखी स्वरुपात दाखल करण्यात येईल आणि ज्या कारणावरुन दावा करण्यात किंवा, यथास्थिती, हरकत घेण्यात आलेली असेल ती कारणे त्यात नमूद करण्यात येतील.

(3) जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका किंवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी, याबाबतीत आवश्यक वाटत असेल अशी चौकशी केल्यानंतर, प्रत्येक दावा व हरकत यावर विचार करील आणि दावे किंवा हरकती प्राप्त होण्यासाठी विहीत केलेल्या अंतिम दिनांकापासून 10 दिवसांच्या आत संबंधित व्यक्तिंना त्यावरील त्याचा निर्णय लेखी देईल, आणि दावे व हरकती प्राप्त होण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांकापासून 15 दिवसांच्या कालावधीत अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली पाहिजे. सर्व दावे व हरकतींवर निर्णय दिल्यानंतर जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका किंवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी-याने अंतिम रुप दिलेली यादी ही, मतदारांची अंतिम मतदार यादी असेल.

(4) मतदारांच्या अंतिम यादीच्या प्रती जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका किंवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयाच्या सूचनाफलकावर तसेच संस्थेच्या सूचना फलकावर निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यापूर्वी किमान 10 दिवस अगोदर आणि कोणतीही हरकत व दावे निकालात काढल्यापासून पंधरा दिवसांहून उशिरा नसेल इतक्या कालावधीत प्रसिद्ध करण्यात येतील

जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका किंवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिका-याला, अंतिम यादी, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या अधिकृत संकेतस्थळावर कोणतेही असल्यास प्रसिध्द करण्याची व्यवस्था करता येईल.

(5) नियम 10,पोटनियम 4 अन्वये अंतिम मतदार यादीतील आवश्यक त्या बदलांबाबत, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा त्याने प्राधिकृत केलेला अधिकारी त्याला आवश्यक वाटेल ती चौकशी करुन, संबंधीत बदलाची नोंद संबंधीत मतदाराच्या अंतिम यादीत आवश्यक ते बदल करील.

## भाग-चार

## निवडणुका पार पाडण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा

**12. निवडणुका पार पाडण्यासाठी आवश्यक असलेले निवडणूक निर्णय अधिकारी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी व असे इतर अधिकारी याची नेमणूक :-**

(1) राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण किंवा याबाबतीत त्यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी आणि त्याला मदत करण्यासाठी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ओळखल्या जाणा-या एका किंवा अधिक व्यक्तींची नेमणूक करेल.

(2) प्रत्येक सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, निर्वाचन अधिका-याच्या नियंत्रणाधीन राहून आणि सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या सर्वसाधारण नियंत्रणाधिन निवडणूक निर्णय अधिका-याची सर्व किंवा कोणतीही कार्ये पार पाडण्यास सक्षम असेल.

परंतु, कोणताही सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, नामनिर्देशन पत्राच्या छाननीशी संबंधित असतील अशी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची कोणतीही कार्ये, ती करण्यास निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास अपरिहार्यपणे प्रतिबंध केला नसेल तर, पार पाडणार नाही. परंतु, आणखी असे की, राज्य सहकारी निवडणूक निर्णय प्राधिकरणाला, आवश्यकता भासल्यास, निवडणूक निर्णय अधिका-याला बदलता येईल.

**13. निरीक्षकाची नेमणूक :-**

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाला, सहकारी संस्थांच्या निवडणुकांवर लक्ष ठेवण्यासाठी आणि रा.स.नि.प्रा. ने निरीक्षकावर सोपविलेली इतर कार्ये पार पाडण्यासाठी, शासकीय अधिकाऱ्यास निरीक्षक म्हणून नामनिर्देशीत करता येईल.

**14. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचे सर्वसाधारण कर्तव्य .-**

कोणत्याही निवडणुकीत, संस्था किंवा संस्थांसाठी केलेले हे नियम व उपविधी यांमध्ये तरतूद केलेल्या रीतीने, कार्यक्षमपणे निवडणूक घेण्यासाठी आवश्यक असतील अशा सर्व कृती आणि गोष्टी करणे हे निवडणूक निर्णय अधिका-यांचे सर्वसाधारण कर्तव्य असेल.

**15. मतदान केंद्रे .-**

निवडणूक निर्णय अधिकारी, आवश्यकता असेल तर, ज्या मतदारसंघात निवडणूक घ्यावयाची असेल अशा कोणत्याही मतदारसंघासाठी पुरेशा प्रमाणात मतदान केंद्राची तरतूद करील व संस्थेच्या सूचना फलकावर आणि त्याला योग्य वाटेल अशा अन्य रितीने अशाप्रकारे तरतूद केलेली मतदान केंद्रे आणि ज्यासाठी त्या मतदान केंद्रांची अनुक्रमे तरतूद करण्यात आली असेल ती मतदान क्षेत्रे दर्शविणारी यादी प्रसिद्ध करील.

**16. मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकारी यांची नेमणूक. -**

(1) निवडणूक निर्णय अधिकारी, प्रत्येक मतदान केंद्रासाठी, मतदार केंद्राध्यक्षाची आणि त्याला आवश्यक वाटेल अशा मतदान अधिकाऱ्याची किंवा अधिकाऱ्यांची नेमणूक करील, परंतु, जी व्यक्ती संबंधित संस्थेकडून किंवा तिच्या वतीने कामावर लावलेली असेल किंवा त्या निवडणुकीत किंवा निवडणुकीसंबंधी उमेदवारासाठी अन्यथा काम करीत असेल अशा कोणत्याही व्यक्तीची नेमणूक करणार नाही.

परंतु, मतदान केंद्रावर मतदान अधिकारी गैरहजर असेल तर, मतदान केंद्राध्यक्षास, जी व्यक्ती संबंधित संस्थेकडून किंवा तिच्या वतीने कामावर लावलेली असेल किंवा निवडणुकीत किंवा निवडणुकीसंबंधी, त्या उमेदवारासाठी अन्यथा काम करीत असेल अशा कोणत्याही व्यक्तीव्यतिरिक्त, मतदान केंद्रावर उपस्थित असणा-

या कोणत्याही अशा व्यक्तीची, अशा अधिकाऱ्याच्या अनुपस्थितीत मतदान अधिकारी म्हणून नेमणूक करता येईल आणि निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास त्याप्रमाणे कळविता येईल.

(2) मतदान केंद्राध्यक्षाने तसा निर्देश दिला असेल तर, मतदान अधिकारी, अधिनियमाखालील किंवा तद्न्वये केलेले कोणतेही नियम किंवा उपविधी यांखालील मतदार केंद्राध्यक्षाची सर्व किंवा कोणतीही कार्ये पार पाडील.

(3) आजारपणामुळे किंवा अन्यथा इतर अपरिहार्य कारणामुळे मतदान केंद्राध्यक्षास, मतदान केंद्रावर उपस्थित राहणे शक्य झाले नसेल तर, त्याच्या अनुपस्थितीमध्ये अशी कार्ये पार पाडण्यासाठी, मतदान केंद्राध्यक्षाकडून पूर्वी प्राधिकृत करण्यात आला असेल अशा मतदान अधिकाऱ्याकडून त्याची कार्ये, पार पाडण्यात येतील.

**17. मतदान केंद्राध्यक्षाचे आणि मतदान अधिकाऱ्यांचे सर्वसाधारण कर्तव्य :-**

(1) मतदान केंद्रावर कायदा व सुव्यवस्था राखणे आणि उचितरीत्या मतदान होत आहे हे पाहणे, हे मतदान केंद्राध्यक्षाचे सर्व साधारण कर्तव्य असेल.

(2) मतदान केंद्रावर मतदान केंद्राध्यक्षाला त्याची कामे पार पाडण्यात मदत करणे हे, त्या मतदान केंद्रावरील मतदान अधिका-यांचे कर्तव्य असेल.

(3) निवडणूक निर्णय अधिकारी , सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी, आणि या नियमांच्या कोणत्याही प्रयोजनासाठी नेमण्यात आलेल्या इतर व्यक्ती, रा.स.नि.प्रा. किंवा याबाबतीत ते प्राधिकृत करेल असे अधिकारी यांचे सर्वसाधारण मार्गदर्शन , देखरेख आणि नियंत्रण यानुसार काम करतील.

**18. निवडणूक कार्यक्रम जाहीर करणे. -**

निवडणूक निर्णय अधिकारी , राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या पूर्व मान्यतेने, निवडणुकीच्या विविध टप्प्यांचा कार्यक्रम आखून संस्थेची ~~**अंतिम मतदार यादी प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून 10 दिवसांच्या आत**~~ जाहीर करेल. हा कार्यक्रम पुढीलप्रमाणे:-

| अ.क्र. | बाब | कालावधी |
|---|---|---|
| 1. | निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्याच्या **निवडणुक कार्यक्रम जाहीर करण्याचा दिनांक हा अंतिम मतदार यादी प्रसिध्द झाल्यानंतर दोन्ही दिवस धरुन दहा ते वीस दिवसांमधील असावा** | (ज्या दिनांकास कार्यक्रम प्रसिद्ध करावायाचा आहे तो दिनांक टाकावा.) |
| 2. | नामनिर्देशन करण्याची शेवटचा दिनांक | निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्याच्या दिनांकापासून ~~5 दिवस~~ **5 कामाचे दिवस** |
| 3 | *मिळालेल्या* नामनिर्देशन पत्रांच्या यादीच्या प्रसिध्दीचा दिनांक | नामनिर्देशनासाठी निश्चित केलेल्या शेवटच्या दिनांकापर्यंत जसजशी मिळतील त्याप्रमाणे |
| 4 | नामनिर्देशन पत्रांच्या छाननीचा दिनांक | नामनिर्देशन पत्र दाखल करण्यासाठी निश्चित केलेल्या शेवटच्या दिनांकानंतरच्या दुसऱ्या दिवशी |
| 5 | छाननीनंतरच वैध नामनिर्देशन पत्रांच्या यादीचा प्रसिद्धीचा दिनांक | छाननी पूर्ण झाल्यानंतरच्या दिनांकाच्या दुस-या दिवशी |
| 6 | ज्या दिनांकापर्यंत उमेदवारी मागे घेता येईल तो दिनांक | छाननीनंतर वैध नामनिर्देशन पत्रांच्या यादीच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून 15 दिवसांच्या आत |
| 7 | निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराच्या अंतिम यादीची प्रसिद्धी व चिन्हांचे वाटप याचा दिनांक | उमेदवारी मागे घेण्यासाठी निश्चित केलेल्या अंतिम दिनांकाच्या निकट अनुवर्ती दिवस |
| 8 | आवश्यक असल्यास, ज्या दिनांकास ज्या वेळी व ज्या ठिकाणी मतदान घेण्यात येईल ती दिनांक, ती वेळ व ते ठिकाण/ठिकाणे | निवडणूक लढविणा-या उमेदवारांच्या अंतिम यादीच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून 07 दिवस अगोदरचा नाही व 10 दिवसांनंतरचा नाही असा दिनांक ( निवडणूक निर्णय अधिकारी वेळ व ठिकाण निश्चित करतील. ) |
| 9 | मतमोजणीचा दिनांक, वेळ व ठिकाण | ज्या दिनांकास मतदान घेण्यात येईल त्या दिनांकापासून तारखेपासून तिसऱ्या दिवसाच्या आत ( निवडणूक निर्णय |

| | | |
|---|---|---|
| | | अधिकारी वेळ व ठिकाण निश्चित करतील.) |
| 10 | मतदानाचे निकाल जाहीर करण्याचा दिनांक | मतमोजणीनंतर लगेच. |

**स्पष्टीकरण :-**

**(अ)** वरील प्रकरणांत विनिर्दिष्ट केलेल्या मोजावयाच्या ताराखांमधील तारीख, सार्वजनिक सुट्टीचा दिवस असेल तर, तिचा निकट अनुवर्ती कामाचा दिवस, त्या त्या कारणांसाठी निश्चित करण्यात येईल.

**(ब)** मतदारांच्या संख्येनुसार मतदान केंद्राची संख्या व त्यांची ठिकाणे, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण किंवा जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांच्याशी विचारविनिमय करुन, निश्चित करण्यात येतील. संपूर्ण जिल्हयात किंवा त्या जिल्याच्या शहरात अथवा गावात मतदान केंद्रे विखुरली असतील त्या बाबतीत निवडणूक निर्णय अधिकारी, त्याच्या कार्यालयात संबंधित निबंधकाच्या अथवा संस्थेच्या कार्यालयात किंवा त्यास योग्य वाटेल अशा सुरक्षित ठिकाणी सर्व मतपेट्या किंवा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे मिळण्याची व्यवस्था करील.

## 19. निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्याची रीत.-

(1) जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी नियम 18 अन्वये नमुना इ-4 अन्वये काढलेल्या आदेशाची प्रत, एकतर संस्थेस जातीने देईल किंवा संस्थेच्या नोंदणी केलेल्या पत्त्यावर, <u>नोंदणीकृत</u> टपालाने किंवा विशेष संदेशाव्दारे पाठवील आणि संस्थेच्या सूचना फलकावर किंवा संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याचे निदेया देईल. त्याशिवाय उक्त निवडणूक कार्यक्रम, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी, निबंधक यांच्या कार्यालयातील सूचना फलकावर किंवा अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

(2) प्रत्यक्ष मतदानाची वेळ निवडणूक कार्यक्रमामध्ये नमूद केलेली असेल.

(3) निवडणूक निर्णय अधिकारी निवडणुकीच्या वेगवेगळया टप्प्यांकरिता जेथे जेथे आवश्यक असेल तेथे तेथे वेळ, तारीख आणि ठिकाण निश्चित करील व त्याने जाहिर करावयाच्या निवडणूक कार्यक्रमांमध्ये नमूद करण्यात येईल.

(4) राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण अथवा यथास्थिती <u>निवडणूक निर्णय अधिकारी</u> संस्थेकरिता किंवा संस्थांच्या वर्गाकरिता निवडणुकीचा कार्यक्रम किमान एका स्थानिक वृत्तपत्रातदेखील प्रसिद्ध करील.

परंतु, <u>'क' आणि 'ड' वर्गीकरण प्रकारच्या संस्थांबाबत</u> निवडणुकीचा कार्यक्रम त्या संस्थेच्या किंवा यथास्थिती त्या त्या कार्यक्षेत्रात स्थित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल.

(5) राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या पूर्वमान्यतेशिवाय, अन्यथा या नियमान्वये निश्चित केलेल्या तारीखा, मतदानासाठी निश्चित केलेल्या तारखेपासून सात दिवसांच्या आत बदलता येणार नाही.

## 20. उमेदवारांचे नामनिर्देशन .-

(1) हा अधिनियम, नियम आणि संबंधित संस्थेचे उपविधी यांच्या उपबंधान्वये एखादी जागा भरण्यासाठी एखादा सदस्य व्यक्ती निवडला जाण्यास अर्हताप्राप्त असेल आणि त्याचे नाव अंतिम उमेदवारांच्या <u>मतदार</u> यादीत नमूद केलेले असेल तर, जागा भरण्यासाठी निवडणूकीतील उमेदवार म्हणून, अशा कोणत्याही सभासदास नामनिर्देशित करता येईल.

परंतु, असे की, कलम 73 ब आणि 73 क यामधील तरतूदीप्रमाणे कोणत्याही संस्थेच्या समितीवरील राखीव जागेसाठी, त्या संस्थेचा कोणताही एक सभासद, किंवा सदस्य संस्थेचा कोणताही समिती सदस्य, मग तो निवडून आलेला, स्विकृत झालेला किंवा नामनिर्देशित केलेला असा, निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून निर्देशित केला जाण्यास पात्र असेल.

<u>परंतु, आणखी असे की, सहकारी गृहनिर्माण संस्था व सहकारी गाळे संकुल संस्था यांचेबाबत ज्या सदस्याचे नाव शेअर प्रमाणपत्रात प्रथम असेल, असा सदस्य निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून नामनिर्देशित होण्यास पात्र असेल. अशा सदस्याच्या अनुपस्थितीत ज्याचे नांव सहयोगी सदस्य म्हणुन दुस-या क्रमांकावर आणि ह्या दोन्हींच्या अनुपस्थितीत त्यापुढे ज्या व्यक्तीचे नांव असेल, ह्याप्रमाणे लगत पुर्वीच्या अनुपस्थितीत व्यक्तीं बबत ज्याचे नांव शेअर प्रमाणपत्रात पुढे असेल व जो अल्पवयीन नसेल असा सदस्य निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून नामनिर्देशित होण्यास पात्र असेल.</u>

(2) नियम 21 अन्वये सादर केलेले प्रत्येक नामनिर्देशनपत्र, नमुना इ -5 मध्ये पूर्ण करण्यात येईल.

परंतु, नामनिर्देशन पत्रातील निशाणी संबंधातील प्रतिज्ञापत्र भरण्यातील कसूर, किंवा ते पूर्ण करण्यातील दोष हा या नियमाच्या अर्थानूसार, महत्वाचा दोष असल्याचे मानण्यात येणार नाही.

(3) मतदारांच्या यादीमध्ये जिचे नाव नोंदविण्यात आलेले आहे अशा कोणत्याही व्यक्तीला, निवडणुकीसाठी एखाद्या उमेदवाराचे नामनिर्देशन करण्यासाठी सूचक किंवा अनुमोदक होता येईल.

परंतू, संस्थाच्या मतदारसंघातील निवडणुकीबाबत कलम 73 ब व कलम 73 क अन्वये असलेल्या राखीव मतदार संघाव्यतिरिक्त इतर मतदार संघांमध्ये त्याच मतदार संघांमधील सूचक व अनुमोदक असला पाहिजे.

**परंतु, आणखी असे की, ज्या संस्थेच्या मतदारसंघात अंतिम मतदार यादीमध्ये केवळ पाच पात्र सदस्य उपलब्ध आहेत, अशा संस्थेतील इतर मतदारसंघातील कोणतीही व्यक्ती जिचे नाव अंतिम मतदारयादीत समाविष्ट आहे, सुचक किंवा अनुमोदक असू शकेल.**

**(सध्याच्या दुसऱ्या परंतुकामध्ये “परंतु आणखी असे की”, या शब्दांच्या ठिकाणी “उपबंधित केलेला असा देखील” हे शब्द ठेवण्यात यावेत)**

(4) कोणत्याही मतदारास, त्याने मागणी केल्यावर, नियम 23 मध्ये नमूद केलेले शुल्क भरल्यानंतर आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने केलेल्या बदलांच्या अनुषंगाने निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून नामनिर्देशनपत्र पुरविण्यात येईल.

## 21. नामनिर्देशनपत्र सादर करणे आणि वैध नामनिर्देशनपत्रासाठी आवश्यक असलेल्या गोष्टी.-

(1) नियम 18 अन्वये नियत केलेल्या, नामनिर्देश करण्यासाठीच्या अंतिम तारखेस किंवा तत्पूर्वी प्रत्येक उमेदवार, उक्त नियमांन्वये घोषित केलेल्या कार्यक्रमामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वेळी आणि जागी, नियम 20 द्वारे तरतूद केल्याप्रमाणे पूर्ण केलेले नामनिर्देशनपत्र एकतर व्यक्तिशः किंवा त्याचे नाव सुचविणाऱ्या व्यक्तीमार्फत निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या स्वाधीन करील.

(2) नामनिर्देशन पत्रा सादर केल्यावर, निवडणूक निर्णय अधिकारी, नामनिर्देशन पत्रामध्ये नोंदवलेली उमेदवारांची व त्यांचे सूचक व अनुमोदक यांची नावे व संख्या हि, मतदारयादीत नोंद केलेल्याप्रमाणेच आहेत याची स्वत: खात्री करील. मात्र, राखीव मतदारसंघाकरिता कलम 73 ब पोटकलम (3) तरतुदींन्वये सादर केलेल्या नामनिर्देशीन पत्राच्या बाबतीत उमेदवार ज्या समितीचे प्रतिनिधीत्व करतो त्या समितीच्या विद्यमान सदस्यांच्या यादीची साक्षांकित प्रत सोबत जोडील. या नियमाखालील नामनिर्देशन पत्र फेटाळण्यात आले तर, त्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी ते फेटाळण्याची त्याची कारणे लेखी नमूद करील.

परंतु, निवडणूक निर्णय अधिकारी उक्त नावांच्या अथवा संख्येच्या बाबतीत नामनिर्देशन पत्रामधील कोणताही लेखन वा तांत्रिक दोष दूर करण्याची परवानगी देईल, जेणेकरुन मतदारयादीतील त्यांच्या संबंधित नोंदीशी त्या अनुरुप होतील आणि जेथे आवश्यक असेल तेथे उक्त नोंदीमधील कोणताही लेखन वा तांत्रिक दोष दुर्लक्षित करील.

(3) कलम 73 ब व 73 क च्या उपबंधाखालील राखीव जागेच्या बाबतीत, उमेदवाराच्या नामनिर्देशनपत्रात ज्या विशिष्ट अनुसूचित जातीचा, अनुसचित जमातीचा किंवा विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास वर्ग, प्रवर्गाचा उमेदवार असेल ती अनुसूचित जात, जमात, किंवा विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग , इतर मागास वर्ग विनिर्दीष्ट करणारे प्रतिज्ञापत्र सभासदाने करुन दिलेले प्रतिज्ञापत्र अंतर्भुत नसेल तर उक्त उमेदवार, उक्त जागा भरण्यासाठी निवडून येण्यास अर्हता प्राप्त असल्याचे समजण्यात येणार नाही.

परंतु, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने विनिर्दिष्ट केलेल्या नमुन्यात, उमेदवार अधिनियमाच्या कलम 73 कअ अनुसार अनर्ह नसल्याबाबतचे **~~शपथपत्र~~ प्रतिज्ञापन** आणि **~~जातीच्या दाखल्याच्या साक्षांकित प्रती~~** नामनिर्देशन पत्रासोबत जोडण्यात येतील.

(4) कलम 73 ब च्या तरतुदींमधील राखीव जागेच्या बाबतीत, कलम 73 ब अन्वये **जातीच्या दाखल्याच्या साक्षांकित प्रती** आवश्यक असलेले शपथपत्र नामनिर्देशनपत्राला जोडल्याशिवाय उमेदवार त्या जागा भरण्याकरिता निवडला जाण्यास अर्हता असल्याचे मानले जाणार नाही

(5) उप- नियम (1) खालील नामनिर्देशन प्राप्त झाल्यावर, निवडणूक निर्णय अधिकारी त्या नामनिर्देशन पत्रावर त्यांचा अनुक्रमांक लिहिल अथवा लिहिण्याची व्यवस्था करील, आणि ज्या दिनांकास व ज्या वेळेस अर्ज त्याच्याकडे पाठविला असेल तो दिनांक व ती नेमकी वेळ नमूद असलेला दाखला त्यावर स्वाक्षरित करील अथवा करण्याची व्यवस्था करील.

## 22. निवडणुकीसाठी चिन्हे.-

1) निवडणूक निर्णय अधिकारी, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने विनिर्दिष्ट केलेल्या चिन्हांमधून उमेदवारास निवडणुकीच्या वेळी निवडता येतील अशी चिन्हे विनिर्दिष्ट करील, परंतु, महाराष्ट्र राज्यातील मान्यताप्राप्त राजकीय पक्षाशी संबंधित असतील अशी कोणतीही चिन्हे नेमून देणार नाही.

2) जेव्हा अशा कोणत्याही निवडणुकीच्यावेळी उमेदवाराकडून किंवा त्यांच्यावतीने एकापेक्षा अधिक नामनिर्देशनपत्र देण्यात येतील त्याबाबतीत, प्रथम देण्यात आलेल्या नामनिर्देशनपत्रात चिन्हांच्या संबंधात करण्यात आलेली शपथपत्रे, जरी उक्त नामनिर्देशनपत्र फेटाळण्यात आले असले तरी, नियम 28 उपनियम 3 अन्वये विचारात घेण्यात येतील व चिन्हांच्या संबंधातील इतर कोणतीही शपथपत्रे विचारात घेण्यात येणार नाहीत.

## 23. ठेवी आणि शुल्क. -

उमेदवाराने निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे खाली विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे रक्कम जमा केल्याखेरीज, किंवा जमा करण्याची व्यवस्था केल्याखेरीज एखाद्या मतदार संघातून त्याला निवडणुकीसाठी यथोचितरीत्या नामनिर्देशित करण्यात आले असल्याचे समजण्यात येणार नाही.

| अ. क्र. | संस्था प्रकार | अनुसूचित जाती व जमातीच्या उमेदवाराव्यतिरिक्त इतर उमेदवारासाठी ठेव रक्कम | अनुसूचित जाती व जमातीच्या उमेदवारासाठी ठेव रक्कम | नामनिर्देशन पत्र शुल्क |
|---|---|---|---|---|
| 1 | शिखर संस्था | रु. 5,000 | रु. 1,000 | रु. 200 |
| 2 | एक जिल्हा किंवा त्यापेक्षा जास्त कार्यक्षेत्र असणारी संस्था | रु. 2,000 | रु. 500 | रु. 100 |
| 3 | एक तालुका किंवा त्यापेक्षा जास्त कार्यक्षेत्र असणारी मात्र जिल्हया पेक्षा जास्त कार्यक्षेत्र नसणारी संस्था | रु. 1,000 | रु. 300 | रु. 100 |
| 4 | गाव किंवा प्रभाग या पेक्षा जास्त कार्यक्षेत्र नसणारी संस्था | रु. 500 | रु. 200 | रु. 50 |
| **5** | **ज्या संस्थेचे कार्यक्षेत्र एका गावाच्या क्षेत्रापेक्षा किंवा विभागापेक्षा जास्त आहे परंतु संपूर्ण तालुक्यापेक्षा कमी आहे** | **रु.750** | **रु.250** | **रु.75** |

परंतु, एकाच मतदार संघातील निवडणुकीसाठी एकाहून अधिक नामनिर्देशनपत्रे उमेदवाराने दाखल केली असेल त्याबाबतीत, या नियमान्वये त्याने एकाहून अधिक ठेवीची रक्कम जमा करणे आवश्यक असणार नाही. असे असले तरी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण संस्थेची व संस्थांच्या वर्गाची आर्थिक स्थिती व सदस्यत्व् या बाबी विचारात घेऊन उपरोक्त तरतूदीनुसार उमेदवाराने जमा करावयाच्या ठेवीबाबत सामान्य अथवा विशेष आदेशाव्दारे वेळोवेळी रक्कम निश्चित करण्यास सक्षम असेल.

परंतु, उमेदवाराने त्याचे नामनिर्देशन मागे घेतल्यास ठेवीची रक्कम त्याने नामनिर्देशन मागे घेतल्याच्या दिनांकापासून 15 दिवसांच्या आत परत करण्यात येईल.

## 24. नामनिर्देशनाची नोटीस व छाननीची वेळ व जागा. -

निवडणूक निर्णय अधिकारी नियम 21 अन्वये नामनिर्देशनपत्र मिळाल्यानंतर, ते देणा-या व्यक्तीस किंवा व्यक्तिंना नामनिर्देशनाच्या छाननीसाठी निश्चित केलेला दिवस, वेळ, आणि जागा याबाबत कळविल, आणि त्या नामनिर्देशनपत्रावर अनुक्रमांक नोंदवून त्याची पोचपावती आणि त्यावर ज्यातारखेस आणि ज्यावेळेस ते नामनिर्देशन त्यांच्याकडे पाठविण्यात आले असेल ती तारीख व वेळ नमूद असलेला दाखला स्वाक्षरित करील, आणि त्यानंतर शक्य तितक्या लवकर उमेदवार आणि सुचक दोघांच्या नामनिर्देशनपत्रात अंर्तभूत असणा-या वर्णनासारखे वर्णन असणा-या नामनिर्देशनाची नोटीस आपल्या कार्यालयात ठळक जागी लावण्याची व्यवस्था करील.

## 25. नामनिर्देशनपत्रांची छाननी. -

(1) नियम 18 अन्वये नामनिर्देशनपत्रांच्या छाननीसाठी तारीख निश्चित केल्यानंतर, उमेदवार, आणि प्रत्येक उमेदवाराने यथोचितरीत्या लेखी प्राधिकृत केलेला एक सूचक यांना, याबाबत नियत केलेल्या वेळी आणि जागी उपस्थित राहता येईल. निवडणूक निर्णय अधिकारी, नियम 20 अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे पाठविण्यात आलेल्या, अशा सर्व उमेदवारांच्या नामनिर्देशनपत्रांच्या तपासणीसाठी सर्व वाजवी सोयी त्यांना उपलब्ध करून देईलअथवा देण्याची व्यवस्था करील. नामनिर्देशन पत्र छाननीस इतर कोणत्याही व्यक्तीस उपस्थित राहता येणार नाही.

(2) निवडणूक निर्णय अधिकारी, त्यानंतर त्या नामनिर्देशनपत्रांची तपासणी करील आणि कोणत्याही नामनिर्देशनासंबंधी घेण्यात येतील अशा सर्व आक्षेपांवर निर्णय देईल आणि एकतर असे आक्षेप घेण्यात आल्यावर किंवा स्वतः होऊन, त्यास आवश्यक वाटेल अशी संक्षिप्त चौकशी, कोणतीही असल्यास, ती केल्यानंतर, पुढीलपैकी कोणत्याही कारणासाठी कोणतेही नामनिर्देशनपत्र फेटाळता येईल.

(अ) अधिनियम हे नियम व उपविधी यांव्दारे किंवा तद्न्वये जागा भरण्यासाठी निवडून येण्यास उमेदवार अनर्ह असेल,

(ब) सूचक किंवा अनुमोदक नामनिर्देशपत्रावर स्वाक्षरी करण्यास अनर्ह असेल,

(क) नियम 21 व 23 च्या तरतूदींपैकी कोणत्याही तरतूदीचे पालन करण्यात कसूर झाली असेल,

(ड) उमेदवाराची किंवा त्यांचे नाव सुचविणाऱ्या व्यक्तीची अथवा अनुमोदकाची नामनिर्देशनपत्रावरील सही खरी नसेल.

(3) ज्या नामनिर्देशनपत्रासंबंधात कोणतीही नियमबाह्य गोष्ट घडली नसेल अशा दुस-या एखादया नामनिर्देशनपत्राव्दारे एखादा उमेदवार यथोचितरीत्या नामनिर्देशित करण्यात आला असेल तर, उपनियम (2) खंड क किंवा ड मधील कोणत्याही मजकुरामुळे पहिल्या नामनिर्देशपत्रासंबंधात कोणतीही नियमबाह्यता घडली आहे या कारणावरुन, कोणत्याही उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र फेटाळण्याचा अधिकार मिळतो असे समजता योणर नाही.

(4) निवडणूक निर्णय अधिकारी, गंभीर स्वरुपाचा नसेल अशा कोणत्याही दोषावरुन कोणतेही नामनिर्देशनपत्र फेटाळणार नाही.

(5) निवडणूक निर्णय अधिकारी, नियम 18 अन्वये नियत केलेल्या तारखेस छाननी करील आणि दंगा किंवा उघड हिंसाचार किंवा त्याच्या नियंत्रणाबाहेरील कारणे यामुळे अशा कामकाजामध्ये व्यत्यय किंवा अडथळा आला असेल त्या व्यतिरिक्त, कामकाज स्थगित करण्यास मान्यता देणार नाही.

परंतु, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने किंवा इतर कोणत्याही व्यक्तीने कोणताही आक्षेप घेतला असेल त्याबाबत, संबंधित उमेदवारास, त्या आक्षेपाचे खंडन करण्यासाठी, वैध नातनिर्देशनांची यादी प्रसिध्द होण्याच्या लगतपूर्वीच्या दिवसानंतरची नसेल अशी मुदत देण्यात येईल आणि निवडणूक निर्णय अधिकारी ज्या तारखेपर्यंत कामकाज स्थगित करण्यात आले असेल त्या तारखेस आपला निर्णय नोंदविल.

(6) निवडणूक निर्णय अधिकारी, प्रत्येक नामनिर्देशनपत्रावर ते स्वीकारल्याचा किंवा ते फेटाळण्याचा आपला निर्णय पृष्ठांकित करील आणि नामनिर्देशनपत्र फेटाळण्यात आले असेल तर, फेटाळण्याच्या आपल्या कारणांच्या संक्षिप्त निवेदनाची लेखी नोंद करील, आणि अशा निवेदनाची एक प्रत संबंधित उमेदवार किंवा त्याचा सूचक यांनी मागणी केल्यास देईल. प्रस्तुत निवेदनाची एक प्रत न चुकता राज्य सहकारी निवडणूक प्राधिकारण किंवा यथास्थिती जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांना पाठविल.

**26. वैध नामनिर्देशनांची यादी प्रसिध्द करणे**.:-

सर्व नामनिर्देशनपत्रांची छाननी करण्यात आल्यानंतर आणि ते स्वीकारल्याच्या किंवा फेटाळल्याच्या निर्णयाची नोंद करण्यात आल्यानंतर लगेचच, निवडणूक निर्णय अधिकारी, ज्यांची नामनिर्देशपत्रे स्वीकारण्यात आली असतील त्या उमेदवारांची यादी तयार करील. छाननी संपल्यानंतर लगेच, पुढील दिवशी निवडणूक निर्णय अधिकारी आपल्या सुचना फलकावर ती यादी लावील आणि ती यादी अशारीतीने ज्या दिनांकास आणि ज्या वेळेस लावण्यात आली असेल तो दिनांक आणि वेळ यांची नोंद करील.

परंतु, निबंधक अथवा राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने प्राधिकृत केलेल्या अधिका-यापुढे नामनिर्देशनपत्र नाकारण्यावर दाखल केलेल्या अपिलात नामनिर्देशनपत्र वैध ठरलेल्या उमेदवारांची नावे निवडणूक निर्णय अधिकारी , वैध नामनिर्देशनांच्या यादीत समाविष्ट करण्यास सक्षम असेल.

**27. उमेदवारी मागे घेणे** :-

(1) कोणत्याही उमेदवारास आपल्या निवडणूक निर्णय अधिका-याकडे सहीनिशी पाठविलेल्या नमुना ई -6 मधील लेखी नोटीशीद्वारे आपली उमेदवारी मागे घेता येईल.

(2) निवडणूक कार्यक्रमामध्ये विनिदिष्ट केल्याप्रमाणे उमेदवारी मागे घेण्यासाठी नियम 18 अन्वये निश्चित केलेल्या शेवटच्या दिवशी दुपारी 3.00 वाजण्यापूर्वी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे नोटीस पाठविण्यात येईल.

(3) नोटीस, एकतर उमेदवारास स्वतः किंवां त्याचे सुचविणाऱ्या व्यक्तीमार्फत जातीने लेखी स्वरुपात देता येईल.

(4) पोट नियम (1) अन्वये जिने आपली उमेदवारी मागे घेतल्याची नोटीस दिली असेल अशा व्यक्तीस, नोटीस रद्द करण्याची मुभा देण्यात येणार नाही.

(5) निवडणूक निर्णय अधिकारी, उमेदवारी मागे घेतल्याच्या नोटीशीचा खरेपणा आणि पोट नियम (1) अन्वये ती देणाऱ्या व्यक्तीची ओळख याबाबत खात्री पटल्यावर,त्याच्या कार्यालयातील सूचना फलकावर नोटीस लावण्याची व्यवस्था करील.

**28. निवडणूक लढविणा-या उमेदवारांची यादी तयार करणे आणि चिन्हांचे नियत वाटप करणे :-**

(1) उमेदवारी मागे घेण्याकरीता निश्चित करण्यात आलेल्या शेवटच्या तारखेच्या लगत नंतरच्या दिवशी निवडणूक निर्णय अधिकारी, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची, म्हणजेच ज्यांची नामनिर्देशनपत्रे अंतिमरीत्या स्वीकारण्यात आली असतील आणि ज्यांनी आपली उमेदवारी विहित मुदतीत मागे घेतली नसेल अशा उमेदवारांची यादी तयार करील आणि ती नमुना ई -7 मध्ये त्याच्या कार्यालयातील सूचना फलकावर प्रसिध्द करील.

(2) उक्त यादीत मतदारांची यादी ज्या भाषेत तयार करण्यात आलेली असेल त्या भाषेतील वर्णानुक्रमानुसार नावे आणि निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांचे नामनिर्देशन पत्रामध्ये दिल्याप्रमाणे पत्ते अंतर्भूत असतील.

(3) मतदान आवश्यक असेल त्या बाबतीत, निवडणूक निर्णय अधिकारी, निवडणूक लढविणा-या उमेदवारांनी आपआपल्या नामनिर्देशनपत्रामध्ये व्यक्त केलेल्या चिन्हांच्या पसंतीवर विचार करील, आणि

(अ) निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवारास, व्यवहार्य असेल तेथवर, त्याच्या पसंतीनुरुप वेगवेगळे चिन्ह नेमून देईल आणि,

(ब) निवडणूक लढविणा-या एकाहून अधिक उमेदवारांनी एकाच चिन्हासाठी आपली पसंती दर्शविली असेल तर, प्रथम आलेल्याला प्रथम प्राधान्य या तत्वावर नेमून देईल आणि असे नियतवाटप अंतिम राहील.

(क) जर निवडून द्यावयाच्या एकूण जागांच्या तीस टक्के उमेदवारांनी गट तयार करून सामूहिक अर्जाव्दारे एकाच चिन्हाची मागणी केल्यास त्यास निवडणूक निर्णय अधिकारी एक चिन्ह देईल.

(4) प्रत्येक उमेदवारास त्याला नेमून देण्यात आलेल्या चिन्हाबाबत तात्काळ कळविण्यात येईल आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने पाठविलेला त्या चिन्हाचा नमुना निवडणूक निर्णय अधिकायाकडून पुरविण्यात येईल.

**29. निवडणूक प्रतिनिधीची नेमणूक करणे** :-

(1) एखाद्या उमेदवारास, स्वत:चा निवडणूक प्रतिनिधी म्हणून एखाद्या व्यक्तीची नेमणूक करावयाची असल्यास, तो अशी नेमणूक उप नियम (3) च्या तरतूदीच्या अधीन राहून नमुना "ई-8" मध्ये करील उमेदवार अशा नेमणुकीसंबंधीची नोटीस निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला नामनिर्देशनपत्र सादर करतेवेळी किंवा त्यानंतर अथवा त्यापूर्वी केव्हाही किंवा चिन्हांच्या वाटपाच्यावेही नेमणूक पत्र नेऊन देऊन किंवा पुढे पाठवून देईल.

(2) उमेदवार, स्वतःची सही असलेले एक लेखी प्रतिज्ञापत्र निवडणूक निर्णय अधिकायाकडे दाखल करुन निवडणूक प्रतिनिधीची नेमणूक कोणत्याही वेळी रद्द करु शकेल. ज्या दिवशी असे प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात येईल त्या दिवसापासून अशी नेमणूक रद्द केली जाईल अशाप्रकारे निवडणूक प्रतिनिधीची नेमणूक रद्द करण्यात येईल, अथवा तो मृत्यु पावेल त्याबाबतीत, मग ही घटना निवडणुकीपुर्वी किंवा निवडणुकीच्या दरम्यान, किंवा निवडणुकीनंतर परंतु उमेदवाराच्या निवडणूक खर्चाचा हिशेब निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे दाखल करण्यापुर्वी घडलेली असो, उमेदवारास आपला निवडणूक प्रतिनिधी म्हणून अन्य एखाद्या व्यक्तीची नेमणूक करता येईल आणि त्यासंबंधीची नोटीस, पहिल्या निवडणूक प्रतिनिधीच्या बाबतीत ती ज्या विहीत पध्दतीने देण्यात आली होती त्याच विहीत पध्दतीने निवडणूक निर्णय आधिकाऱ्याला देता येईल.

(3) उमेदवारास जिचे नाव मतदार यादीत आहे अशा व्यक्तीची निवडणूक प्रतिनिधी म्हणून नेमणूक करता येईल.

(4) उक्त अधिनियम , नियम किंवा उपविधि याअन्वये मतदार म्हणून अनर्ह ठरलेल्या कोणत्याही व्यक्तीची , जोपर्यंत ती अनर्ह असल्याचे चालू आहे तोपर्यंत किंवा तिचे नाव, उमेदवार ज्या मतदार संघाकरिता नामनिर्देशित करण्यात आला असेल त्या मतदार संघाच्या मतदार यादीत नसेल तोपर्यत अशा कोणत्याही व्यक्तीची निवडणूक प्रतिनिधी म्हणून नियुक्ती केली जाणार नाही.

## 30. मतदान प्रतिनिधीची आणि मतमोजणी प्रतिनिधीची नेमणूक .-

**(1)** मतदान घेतले जाणार असेल अशा निवडणुकीत, निवडणूक लढविणा-या कोणत्याही उमेदवारास, प्रत्येक मतदान केंद्रावर, अशा उमेदवाराचा मतदान प्रतिनिधी आणि मतमोजणी प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी एक प्रतिनिधी आणि एक बदली प्रतिनिधी ज्यांचे नांव मतदार यादीत आहे यांची नेमणूक करता येईल. अशी नेमणूक उमेदवाराच्या सहीने नमुना "ई - 8" अ मधील लेखी पत्राव्दारे करण्यात येईल.

(2) उमेदवार नेमणुकीचे पत्र मतदान प्रतिनिधीला देईल व तो प्रतिनिधी ते मतदानासाठी निश्चित केलेल्या तारखेस मतदान केंद्राध्यक्षास सादर करील आणि त्याच्या समक्ष, त्यात अंतर्भूत असलेल्या प्रतिज्ञापनावर सही करील. मतदान केंद्राध्यक्ष, त्याला सादर केलेले पत्र स्वतःच्या ताब्यात ठेवील. मतदान प्रतिनिधीने या नियमाच्या तरतूदींचे पालन केलेले असल्याखेरीज, त्याला मतदान केंद्रावरील कोणतेही काम पार पाडण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

(3) मतदान प्रतिनिधींना, उमेदवारांने, नमुना "ई-8अ" मध्ये दिलेल्या प्राधिकारानुसार मतमोजणी प्रतिनिधी म्हणून काम करता येईल.

(4) निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवारास, आपल्या सहीने, नमुना "ई- 8अ" मध्ये दोन प्रतीत लेखी पत्राव्दारे उमेदवारांचे मतमोजणी प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी, दोनपेक्षा अधिक नसतील इतक्या प्रतिनिधींची नेमणूक करता येईल. मतमोजणीस प्रारंभ करण्यापूर्वी उमेदवार, अशा मतमोजणी प्रतिनिधींच्या नेमणुकीबाबतची नोटीस, निवडणूक निर्णय अधिका-याला, नेमणुकीबाबतचे पत्र त्या अधिकाऱ्याकडे अग्रेषित करुन देईल. उमेदवास नेमणूक पत्राची दुसरी प्रत मतमोजणी प्रतिनिधीलाही देईल. मतमोजणी प्रतिनिधी मतमोजणीकरिता निश्चित केलेल्या तारखेस, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास ती प्रत सादर करील आणि तिच्यात अंतर्भूत असलेल्या प्रतिज्ञापत्रावर त्याच्यासमक्ष सही करील. निवडणूक निर्णय अधिकारी त्याला सादर केलेली दुसरी प्रत स्वतःच्या अभिरक्षेत ठेवून घेईल. कोणत्याही मतमोजणी प्रतिनिधीस, त्याने या तरतूदींचे पालन केलेले असल्याखेरीज, मतमोजणीसाठी निश्चित केलेल्या जागी कोणतेही कार्य पारपाडण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

## 31. मतदानापूर्वी उमेदवार मरण पावणे .-

निवडणूक लढविणारा एखादा उमेदवार मरण पावल्यास असेल आणि त्याच्या मृत्युची बातमी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला मतदानास प्रारंभ होण्यापूर्वी मिळाली असेल तर, निवडणूक निर्णय अधिकारी, उमेदवाराच्या मृत्युच्या वस्तुस्थितीबद्दल खात्री पटल्यावर, मतदानाबाबत प्रत्यादेश देईल आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण किंवा जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांना निवडणुकीच्या कार्यवाहीसह त्याबाबत कळविल आणि, निवडणुकी संदर्भातील सर्व कामकाजास, नवीन निवडणूक असल्याप्रमाणे सर्व बाबतीत, नव्याने प्रारंभ करण्यात येईल :

परंतु असे की, मतदानाबाबत प्रत्यादेश देताना निवडणूक लढविणारा उमेदवार असणा-या कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत, आणखी नामनिर्देशन करण्याची आवश्यकता असणार नाही:

परंतु आणखी असे की, मतदानाबाबत प्रत्यादेश देण्यापूर्वी, जिने नियम 27 अन्वये आपली उमेदवारी मागे घेतल्याची नोटीस दिली असेल अशी कोणतीही व्यक्ती, अशा रितीने मतदानाबाबत प्रत्यादेश दिल्यानंतर, निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून नामनिर्देशित होण्यास पात्र ठरणार नाही.

परंतु तसेच की, ज्या उमेदवारचे नामनिर्देशन प्रत्यादेश देण्यापुर्वी स्वीकारले आहे त्याचेबाबत उमेदवारी मागे घेण्याची नवीन नोटीस अशा प्रत्यादेशानंतरच्या निवडणुकीसाठी निवडणुक निर्णय अधिकारी स्वीकारणार नाही.

32. **बिनविरोध निवडणे** :-

नियम 27 अन्वये ज्या मुदतीच्या आत उमेदवारी मागे घेता येईल ती मुदत संपल्यानंतर ज्यांचे नामनिर्देशन स्वीकारण्यात आले आहे अशा उमेदवारांची संख्या ही, भरावयाच्या जागांच्या संख्येएवढी अथवा त्यापेक्षा कमी असेल तर, निवडणूक निर्णय अधिकारी ती जागा किंवा यथास्थिति त्या त्या प्रमाणातील जागा भरण्यासाठी असे सर्व उमेदवार यथोचितरीत्या निवडून आले असल्याचे तात्काळ जाहीर करील आणि नमुना ई-9 मध्ये प्रतिज्ञापत्र करुन ते प्रमाणित करील आणि यथास्थिती राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण किंवा जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका किंवा प्रभाग सहकारी निवडणूक निर्णय अधिकारी यांना कळविल.

## भाग – सहा

## मतदान

**33. निवडणुकांच्या वेळी मतदानाची रीत .-**

मतदान घेण्यात येईल त्या प्रत्येक निवडणुकीच्या बाबतीत, यात यापुढे तरतूद केलेल्या रीतीने गुप्त मतदान पद्धतीने किंवा इलेक्ट्रॅनिक मतदान यंत्राने मते देण्यात येतील आणि कोणतीही मते प्रतिनिधींमार्फत स्वीकारण्यात येणार नाही.

34. **मतपेटी किंवा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र. -**

प्रत्येक मतपेटी किंवा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र हे राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाकडून मान्यत देण्यात येईल अशा स्वरुपाचे असेल.

**35. मतपत्रिकेचा नमुना. -**

प्रत्येक मतपत्रिका नमुना "ई-10" मध्ये असेल. उमेदवारांची नावे निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या यादीत ती ज्या क्रमाने असतील त्या क्रमाने मतपत्रिकेवर लावण्यात येतील. उमेदवाराला टोपण नाव असल्यास त्याचा समावेश करण्यात येईल. तथापि दोन किंवा त्याहून अधिक उमेदवारांचे नाव सारखेच असेल तर, त्याचा व्यवसाय किंवा निवासस्थान याची त्यापुढे भर घालून किंवा, निवडणूक निर्णय अधिकारी ठरवील अशा इतर कोणत्याही रीतीने त्यातील फरक दाखविला जाईल.

**36. मतदान केंद्रावरील व्यवस्था. -**

(1) प्रत्येक मतदान केंद्राच्या बाहेरील बाजूस पुढील गोष्टी ठळकपणे प्रदर्शित करण्यात येतील :-

(अ) ज्या मतदान क्षेत्रातील मतदारांना त्या मतदान केंद्रात मत देण्याचा हक्क असेल ते मतदान क्षेत्र विनिर्दिष्ट करणारी आणि ज्या मतदान केंद्रात एकाहून अधिक मतदान मंडप असतील त्या बाबतीत, अशा प्रत्येक मंडपाबाहेर अशा मंडपासाठी नेमून दिलेल्या मतदारांचा तपशील विनिर्दिष्ट करणारी एक नोटीस, आणि

(ब) निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या चिन्हांकित यादीची एक प्रत.

(2) प्रत्येक मतदान केंद्रामध्ये, ज्यात मतदारांना, अवलोकनापलीकडे राहून आपली मते नोंदविता येतील अशा एक किंवा त्याहून अधिक मतदान कक्षांची रचना करण्यात येईल.

(3) निवडणूक निर्णय अधिकारी प्रत्येक मतदान केंद्राला पुरेशा प्रमाणात मतपेट्या किंवा इलेक्ट्रोनिक मतदान यंत्र, मतपत्रिका , अशा मतदान केंद्रात ज्यांना मतदानाचा हक्क आहे अशा त्या मतदान क्षेत्रातील किंवा क्षेत्रांतील मतदारांच्या यादीच्या प्रती, मतपत्रिकांवर विभेदक खुणेचा ठसा उमटविण्यासाठी साधने आणि मतपत्रिकांवर खूण करण्यासाठी मतदारांना आवश्यक असलेल्या वस्तू पुरविल. निवडणूक निर्णय अधिकारी प्रत्येक मतदान केंद्राला, अशा मतदान केंद्रात मतदान घेण्यासाठी आवश्यक असतील अशी इतर साधनसामग्री आणि उपसाधनेही पुरविल.

**37. मतदान केंद्रात प्रवेश. –**

मतदान केंद्राध्यक्ष, मतदान केंद्रात कोणत्याही एका वेळी प्रवेश देण्यासाठी मतदारांच्या संख्येचे नियमन करील आणि पुढील, व्यक्तीं व्यतिरिक्त इतर सर्व व्यक्तींना प्रवेश देणार नाही :-

(अ) मतदान अधिकारी,

(ब ) निवडणूकीशी संबंधित अशा कामावर असलेले लोक सेवक,

(क) निवडणूक अधिकारी किंवा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या व्यक्ती,

(ड) उमेदवार, त्यांचे निवडणूक प्रतिनिधी आणि नियम 30 च्या तरतूदींस अधीन राहून, प्रत्येक उमेदवाराचा एक प्रतिनिधी,

(ई ) मतदाराबरोबर असलेले कडेवरील मूल,

(फ) मदतीशिवाय ज्याला हालचाल करता येत नाही अशा अंध किंवा अपंग मतदारासोबत असलेली एखादी व्यक्ती.

(ग) निवडणूक निर्णय अधिकारी किंवा मतदान केंद्राध्यक्ष मतदाराची ओळख पटविणाऱ्या प्रयोजनासाठी नियुक्त करीत अशा इतर व्यक्ती.

**38. मतदानासाठी मतपेट्या तयार करणे. -**

(1) मतपेटीच्या सुरक्षिततेसाठी एखादी कागदी मोहोर वापरात आणण्यात आली असेल त्या बाबतीत, मतदान केंद्राध्यक्ष त्या कागदी मोहोरेवर आपली स्वत:ची सही करील आणि उपस्थित असलेल्या मतदान प्रतिनिधींपैकी ज्यांची त्यावर सह्या करण्याची इच्छा असेल त्यांच्या सह्या घेईल.

(2) मतदान केंद्राध्यक्ष, त्यानंतर अशा रीतीने स्वाक्षरित केलेली कागदी मोहोर ,तिच्यासाठी मतपेटीत ठेवलेल्या जागी लावील आणि त्यानंतर त्या मतपेटीत मतपत्रिका टाकण्यासाठी फट उघडी राहील अशारीतीने ती पेटी सुरक्षित आणि मोहोरबंद करील.

(3) मतपेट्या सुरक्षित करण्यासाठी वापरण्यात आलेल्या मोहोरा अशा रीतीने लावण्यात येतील की, जेणेकरुन पेटी बंद केल्यानंतर मोहोर तोडल्याशिवाय ती उघडता येऊ शकणार नाही.

(4) मतपेट्या सुरक्षित करण्यासाठी कागदी मोहोरांचा वापर करणे आवश्यक नसेल त्याबाबतीत, मतदान केंद्राध्यक्ष, मतपेटीत मतपत्रिका टाकण्यासाठी फट उघडी राहील अशारीतीने मतपेटी सुरक्षित व मोहोरबंद करीत आणि उपस्थित असलेल्या मतदान प्रतिनिधींना, <u>जर</u> त्यांची इच्छा असल्यास, त्यांच्या मोहोरा लावण्यास परवानगी देईल.

(5) मतदान केंद्रात वापरण्यात आलेल्या प्रत्येक मतपेटीला आतून आणि बाहेरून दोन्ही बाजूंस पुढील गोष्टी चिन्हांकित असलेल्या मोहोरा लावलेल्या असल्या पाहिजेत :-

(अ) मतदारसंघाचा अनुक्रमांक , कोणताही असल्यास आणि त्याचे नाव ;

(ब) मतदान केंद्राचा अनुक्रमांक आणि त्याचे नाव ;

(क) मतपेटीचा अनुक्रमांक, जो मतदान संपल्यावर शेवटी मतपेटीच्या केवळ बाहेरील बाजूसच खूण चिठ्ठीवर अनुक्रमांक लिहावा; आणि

(ड) मतदानाची तारीख.

(6) मतदानास प्रारंभ होण्याच्या लगतपूर्वी, मतदान केंद्राध्यक्ष, उपस्थित मतदान प्रतिनिधींना आणि इतर व्यक्तींना मतपेटी रिकामी असल्याचे आणि तिच्यावर या नियमांच्या उपनियम (5) मध्ये निर्दिष्ट केलेल्या खुणचिठ्ठया असल्याचे दाखविल.

(7) त्यानंतर मतपेटी बंद करुन मोहोरबंद आणि सुरक्षित करण्यात येईल आणि ती मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान प्रतिनिधी यांच्या नजरेसमोर राहील अशा जागी ठेवण्यात येईल.

**39. मतदानासाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र तयार करणे. -**

जर इलेक्ट्रॅनिक मतदान यंत्रामार्फत मतदान घेण्याचे ठरविलेले असेल तर, ते तांत्रिकदृष्ट्या शक्य असेल तेथवर या नियमानुसार असलेल्या आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने नेमून दिलेल्या कार्यपध्दतीनुसार घेण्यात येईल.

## 40. मतदारांची ओळख पटविणे. -

(1) मतदान केंद्राध्यक्षास मतदान केंद्रावर मतदारांची ओळख पटविण्यासाठी किंवा मतदान घेताना त्याला सहाय्य करण्यासाठी, त्यास योग्य वाटेल अशा व्यक्तींची नियुक्ती करता येईल.

(2) प्रत्येक मतदार मतदान केंद्रात प्रवेश करतेवेळी भारत निवडणूक आयोगाने ठरवून दिलेला छायाचित्र असलेला ओळखीचा पुरावा किंवा संस्थेने संस्थेच्या उपविधितील तदतुदींअनुसार दिलेले छायाचित्र असलेले ओळखपत्र स्वताजवळ बाळगिल.

(3) प्रत्येक मतदार मतदान केंद्रात प्रवेश करील तेव्हा, मतदान केंद्राध्यक्ष किंवा याबाबत त्याने प्राधिकृत केलेला मतदान अधिकारी मतदाराचे नाव आणि इतर तपशील मतदार यादीतील संबंधित नोंदीशी ताडून पाहिल आणि त्यानंतर मतदाराचा अनुक्रमांक, नांव इतर तपशील पुकारील.

(4) एखाद्या व्यक्तीच्या मतपत्रिका मिळविण्याच्या अधिकाराबाबत निर्णय घेताना, मतदान केंद्राध्यक्ष किंवा यथास्थिति, मतदान अधिकारी, मतदार यादीतील कोणत्याही नोंदीतील केवळ लेखन व मुद्रण दोषांकडे, ज्या मतदाराशी ती नोंद संबंधित आहे तो मतदार आणि ती व्यक्ती एकच आहे याबाबत त्यांची खात्री झाली तर, दुर्लक्ष करील.

## 41. ओळखीबाबत आक्षेप घेणे. -

(1) कोणत्याही मतदान प्रतिनिधीस, आपण विशिष्ट मतदार आहोत असा दावा करणाऱ्या एखाद्या व्यक्तीच्या ओळखीबाबत, मतदान केंद्राधक्षाकडे प्रत्येक आक्षेपासाठी 50 रुपये याप्रमाणे रोख रक्कम जमा करुन आक्षेप घेता येईल.

(2) अशी रक्कम त्या व्यक्तीने जमा केल्यानंतर, मतदान केंद्राध्यक्ष, -

(अ) जिला आक्षेप घेतलेला आहे, त्या व्यक्तीस तोतयेगिरीबद्दल होणाऱ्या शास्तीसंबंधी ताकीद देईल,

(ब) मतदार यादीतील संबंधित नोंद संपूर्णपणे वाचील आणि त्या नोंदीत विनिर्दिष्ट केलेली व्यक्ती तीच आहे किंवा काय याबाबत तिच्याकडे विचारणा करील.

(क) नमुना "ई-11" मधील आक्षेपित मतदारांच्या यादीत तिचे नाव आणि पत्ता नोंदविल; आणि

(ड) उक्त यादीत तिची सही करण्यास तिला फर्माविल,

(3) त्यानंतर मतदान केंद्राध्यक्ष आव्हानाबाबत संक्षिप्त चौकशी करील आणि त्यास त्या प्रयोजनासाठी -

(अ) आव्हान देणाऱ्या व्यक्तीस आव्हानाबाबत पुरावा दाखल करण्यास आणि दिलेल्या व्यक्तीस तिच्या ओळखीबाबतचा पुरावा दाखल करण्यास भाग पाडता येईल;

(ब) आव्हान दिलेल्या व्यक्तीस तिची ओळख पटवून देण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक असे कोणतेही प्रश्न विचारता येतील आणि त्याची शपथेवर उत्तरे देण्यास तिला भाग पाडता येईल; आणि

(क) आव्हान दिलेल्या व्यक्तीकडून आणि साक्ष देऊ करणाऱ्या इतर कोणत्याही व्यक्तीकडून शपथ घेण्यास लावता येईल;

(4) जर, चौकशीनंतर, मतदान केंद्राध्यक्षास असे वाटेल की, आव्हान सिद्ध झालेले नाही तर तो, आव्हान दिलेल्या व्यक्तीस मतदानाची परवानगी देईल आणि त्यास असे वाटेल की, ते आव्हान सिद्ध झालेले आहे तर, त्यास आव्हान दिलेल्या व्यक्तीस मतदान करण्यास मनाई करता येईल;

(5) जर मतदान केंद्राध्यक्षाच्या मते आव्हान क्षुल्लक स्वरुपाचे असले किंवा सद्भावनापूर्वक दिलेले नसेल तर, तो पोटनियम (1) अन्वये ठेवलेली अनामत रक्कम राज्य शासनाकडे जप्त करण्यात यावी असा निदेश देईल आणि इतर कोणत्याही बाबतीत, ती चौकशी करुन आक्षेप घेणाऱ्या व्यक्तीस ती परत करील.

## 42. तोतयेगिरीविरुद्ध खबरदारी घेणे. -

(1) मतदारांच्या तोतयेगिरीस प्रतिबंध करण्यांच्या दृष्टीने, ज्याच्या ओळखीबाबत मतदान केंद्राध्यक्ष किंवा, यथास्थिति मतदान अधिकारी याची खात्री पटली असेल असा प्रत्येक मतदार, मतदान केंद्राध्यक्षाला किंवा मतदान अधिकाऱ्याला आपल्या डाव्या अंगठ्याची तपासणी करण्यास आणि त्यावर पक्क्या शाईची खूण करण्यास परवानगी देईल.

(2) जर कोणताही मतदार पोटनियम (1) अनुसार, त्याच्या डाव्या अंगठ्याचे निरीक्षण करु देण्यास किंवा खूण करु देण्यास नाकारील किंवा त्याच्या डाव्या अंगठ्यावर आधीच अशी खूण केलेली असेल किंवा शाईची खूण काढून

टाकण्याच्या हेतूने तो कोणतेही कृत्य करील तर त्यास कोणतीही मतपत्रिका दिली जाणार नाही किंवा मतदान करण्यास परवानगी दिली जाणार नाही.

(3) मतदाराच्या डाव्या अंगठ्यासंबंधीचा या नियमातील कोणताही निर्देश हा जर मतदाराला डावा अंगठा नसेल तर त्याबाबतीत त्याच्या डाव्या हाताच्या इतर कोणत्याही बोटासंबंधीचा निर्देश आहे असे समजले जाईल आणि त्याच्या डाव्या हाताची सर्व बोटेच नसतील त्या बाबतीत, तो त्याच्या उजव्या हाताचा अंगठा किंवा इतर कोणतेही बोट यासंबंधीचा निर्देश आहे असे समजले जाईल आणि दोन्ही हातांची सर्व बोटे नसतील त्या बाबतीत त्याला असलेल्या त्याच्या डाव्या किंवा उजव्या हाताचे टोक यासंबंधीचा निर्देशआहे असे समजले जाईल.

## 43. मतपत्रिका देणे. -

(1) मतदानाच्या प्रारंभासाठी निश्चित केलेल्या वेळेपूर्वी कोणत्याही मतदारास कोणतीही मतपत्रिका देण्यात येणार नाही.

(2) मतदान समाप्त होण्याच्या वेळी मतदान केंद्रावरचे मतदार उपस्थित असतील त्याखेरीज, इतर कोणत्याही मतदारास मतदान समाप्तीसाठी निश्चित केलेल्या वेळेनंतर कोणतीही मतपत्रिका देण्यात येणार नाही. अशा मतदारांना मतदान संपल्यानंतरही त्यांची मते नोंदविण्याची परवानगी देण्यात येईल.

(3) मतदाराला मतपत्रिका देण्यापूर्वी प्रत्येक मतपत्रिकेवर -

(अ) जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी निदेश देईल अशा विभेदक चिन्हाचा शिक्का मारण्यात येईल.

(ब) तिच्या मागच्या बाजूस मतदान केंद्राध्यक्ष पूर्ण स्वाक्षरी करील.

(4) मतदाराला मतपत्रिका देतेवेळी, मतदान अधिकारी, नोंद करण्यासाठी स्वतंत्रपणे ठेवलेल्या मतदारांच्या यादीच्या प्रतीमध्ये त्या मतदाराच्या नावासमोर मतपत्रिकेच्या अनुक्रमांकाची नोंद करील.

(5) पोटनियम (4) मध्ये तरतूद केली असेल ते खेरीजकरुन, मतदान केंद्रातील कोणतीही व्यक्ती विशिष्ट मतदारांना दिलेल्या मतपत्रिकांचे अनुक्रमांक टिपून घेणार नाही.

## 44. मतदानाची कार्यपद्धती. –

(1) मतपत्रिका मिळाल्यावर, मतदार ताबडतोब :-

(एक) मतदान कक्षांपैकी एका कक्षाकडे जाईल;

(दोन) तेथे ज्या उमेदवाराला मत देण्याची त्याची इच्छा असेल त्या उमेदवाराच्या निशाणीवर किंवा तिच्याजवळ, त्याला त्या प्रयोजनासाठी पुरविण्यात आलेल्या साधनाने खूण करील;

(तीन) आपले मत दिसू नये यासाठी मतपत्रिकेची घडी करील;

(चार) आवश्यक वाटल्यास, मतपत्रिकेवरील विभेदक चिन्ह मतदान केंद्राध्यक्षास दाखवील;

(पाच) घडी केलेली मतपत्रिका मतपेटीत टाकील;

(सहा) मतदान केंद्रातून निघून जाईल.

(2) एक मतदार मतदान कक्षात असताना दुसऱ्या कोणत्याही मतदारास आत प्रवेश देण्यात येणार नाही.

## 45. वेगवेगळे मतदारसंघ नसतील किंवा एका मतदारसंघातून एकापेक्षा अधिक जागा भरावयाच्या असतील त्या बाबतीतील मतदानाची कार्यपद्धती. -

उपविधीमध्ये कोणत्याही मतदारसंघाची व्याख्या केली नसेल त्याबाबतीत, किंवा एखाद्या मतदारसंघासाठी उपवीधीमध्ये एक पेक्षा अधिक जागा प्राधिकृत करण्यात आल्या असतील त्याबाबतीत, या जागांशी जेथवर संबंधित असेल तेथवर, मतदान पुढील तरतूदींना अनुसरुन करण्यात येईल :-

(अ) प्रत्येक मतदारास, जितक्या जागा भरावयाच्या असतील आणि त्या भरण्यासाठी मतदान घ्यावयाचे असतील तितकी मते देण्याचा हक्क असेल, परंतु कोणत्याही मतदारास कोणत्याही एकाच उमेदवारास एकाहून अधिक मते देता येणार नाहीत.

(ब) मतदाराने, मतपत्रिकेवर खूण करण्याच्या प्रयोजनासाठी पुरविलेल्या साधनाने, ज्या उमेदवाराला किंवा उमेदवारांना मत देण्याची त्याची इच्छा असेल त्याच्या निशाणीवर किंवा निशाणींवर किंवा तिच्याजवळ किंवा त्यांच्या जवळ खूण करावी. त्यामुळे अशा रितीने केलेल्या कोणत्याही खुणेचा कोणताही भाग इतर उमेदवारासाठी ठेवलेल्या जागी उमटणार नाही. मतदाराने त्यानंतर आपले मत दिसून नये अशा रितीने,

खूण केलेल्या मतपत्रिकेची घडी करावी आणि घडी केलेली मतपत्रिका मतपेटीत टाकावी आणि गैरवाजवी विलंब न करता मतदान केंद्रातून निघून जावे.

## 46. अंध किंवा अपंग मतदारांच्या मताची नोंदणी :-

(1) अंधत्वामुळे किंवा इतर शारीरिक अपंगतेमूळे एखाद्या मतदारास मतपत्रिकेवरील निशाण्या ओळखणे अशक्य आहे किंवा सहाय्याशिवाय मतपत्रिकेवर खूण करणे अशक्य आहे याविषयी मतदान केंद्राध्यक्षांची खात्री पटली असेल तर, मतदान केंद्राध्यक्ष, त्या मतदारास, त्याच्यावतीने व त्यांच्या इच्छेनुसार, मतपत्रिकेवर मत नोंदविण्यासाठी आणि आवश्यक असल्यास, मत गुप्त राहावे म्हणून मतपत्रिकेची घडी करुन ती मतपेटीत टाकण्यासाठी ज्याचे वय 18 वर्षांहून कमी नाही असा एखादा सोबती मतदान कक्षात त्याच्याबरोबर नेण्यास परवानगी देईल:

परंतु कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही मतदान केंद्रावर त्याच दिवशी एकाहून अधिक मतदारांचा सोबती म्हणून काम करण्यास परवानगी दिली जाणार नाही :

आणखी असे की, या नियमान्वये कोणत्याही दिवशी, मतदारांचा सोबती म्हणून काम करण्यास एखाद्या व्यक्तीस परवानगी देण्यापूर्वी, त्याने मतदाराच्या वतीने नोंदविलेले मत तो गुप्त ठेवील आणि त्याने त्याच दिवशी यापूर्वी दुसऱ्या एखाद्या मतदाराचा सोबती म्हणून कोणत्याही मतदान केंद्रावर काम केलेले नाही असे त्याने नमुना ई - 12 मध्ये जाहीर करणे आवश्यक असेल.

(2) मतदान केंद्राध्यक्ष या नियमाखालील सर्व प्रकरणांची नोंद नमुना इ-13 मध्ये ठेवील.

## 47. खराब झालेल्या आणि परत केलेल्या मतपत्रिका .-

(1) एखाद्या मतदाराने अनवाधानाने आपली मतपत्रिका, अशा रितीने वाटल असेल की, मतपत्रिका म्हणून तिचा सोयीस्करपणे वापर करणे शक्य नसेल तर त्या मतदाराने ती मतदान केंद्राध्यक्षांकडे परत करता येईल आणि ही गोष्ट अनवाधानाने घडल्याबद्दल केंद्राध्यक्षाची खात्री पटवून दिल्यानंतर त्याला दुसरी मतपत्रिका देण्यात येईल आणि अशा परत केलेल्या मतपत्रिकेवर मतदान केंद्राध्यक्ष "खराब झालेली, रद्द केलेली " असा मजकूर लिहील.

(2) एखाद्या मतदाराने मतपत्रिका मिळाल्यावर तिचा उपयोग न करण्याचे ठरविल्यास, तो, ती मतपत्रिका मतदान केंद्राध्यक्षांकडे परत करील आणि अशा रितीने परत केलेल्या मतपत्रिकेवर मतदान केंद्राध्यक्ष "परत केलेली -रद्द केलेली" असा मजकूर लिहील.

(3) पोटनियम (1) किंवा पोटनियम (2) अन्वये रद्द करण्यात आलेल्या सर्व मतपत्रिका वेगळ्या पाकिटात ठेवण्यात येतील.

## 48. दुबार नोंदलेली मते .-

(1) आपण अमुक एक मतदार आहोत असे सांगून एखादी व्यक्ती मतदान करुन गेल्यानंतर, जर दुसरी एखादी व्यक्ती आपण तोच विशिष्ट मतदार आहोत असे सांगून मतपत्रिकेची मागणी करील तर त्या व्यक्तीस स्वत:ची ओळख पटवून देण्यासंबंधात, मतदान केंद्राध्यक्ष विचारील, अशा प्रश्नांची समाधानकारक उत्तरे दिल्यानंतर, या नियमांच्या पुढील तरतूदींना अधीन राहून, इतर कोणत्याही मतदाराप्रमाणे (या नियमात यापुढे "दुबार नोंदलेल्या मतपत्रिका " म्हणून उल्लेखिलेल्या) मतपत्रिकेवर खूण करण्याचा हक्क असेल.

(2) अशी प्रत्येक व्यक्ती दुबार नोंदविलेली मतपत्रिका मिळण्यापूर्वी, योग्य असेल त्याप्रमाणे नमुना ई-14 मध्ये असलेल्या सूचीतील तिच्या संबंधीच्या नोंदीसमोर आपल्या नावाची सही करील.

(3) दुबार नोंदलेली मतपत्रिका, मतदानासाठी वापरण्यात येणाऱ्या इतर मतपत्रिकांप्रमाणेच असेल; फक्त -

(अ) ती मतदान केंद्रावर उपयोगाता आणण्यासाठी देण्यात आलेल्या मतपत्रिकांच्या गठ्ठ्यातील शेवटच्या क्रमांकाची असेल, आणि

(ब) तिच्या मागच्या बाजूवर मतदान केंद्राध्यक्षांने "दुबार नोंदलेली मतपत्रिका" असे स्वत: लिहून त्यावर स्वत:ची सही केलेली असेल.

(4) दुबार नोंदलेल्या मतपत्रिकेवर मतदान कक्षात जाऊन खूण केल्यावर, मतपत्रिकेची घडी घालून मतदार ती मतपत्रिका, मतपेटीत न टाकता मतदान केंद्राध्यक्षाकडे देईल, व मतदान केंद्राध्यक्ष ती मतपत्रिका त्यासाठी राखून ठेवलेल्या लिफाफ्यात ठेवील.

## 49. मतदान बंद करणे.-

(1) मतदान केंद्राध्यक्ष ,नियम 18 अन्वये याबाबतीत निश्चित करण्यात आलेल्या वेळी मतदान बंद करील आणि त्यानंतर कोणत्याही मतदाराला मतदान केंद्रात प्रवेश देणार नाही :

परंतु, मतदान केंद्र बंद होण्यापूर्वी , तेथे हजर असलेल्या सर्व मतदारांना मतदान करु देण्यात येईल.

(2) मतदान केंद्र बंद होण्यापूर्वी एखादा मतदार तेथे हजर होता किंवा कसे असा प्रश्न उद्भवल्यास त्या बाबतीत मतदान केंद्राध्यक्ष त्याबाबत निर्णय देईल आणि त्याचा निर्णय अंतिम असेल.

## 50. मतदानानंतर मतपेटया मोहोरबंद करणे.-

(1) मतदान बंद झाल्यानंतर व्यवहार्य असेल तेथवर मतदान केंद्राध्यक्ष कोणत्याही उमेदवारांच्या किंवा त्यांच्या निवडणूक किंवा मतदान प्रतिनिधींच्या उपस्थितीत मतपेटीची फट बंद करील आणि फट बंद करण्यासाठी मतपेटीला कोणतीही यांत्रिक कळ नसेल तर तो, ती फट मोहोरबंद करील आणि हजर असलेल्या कोणत्याही मतदान प्रतिनिधीला त्याची स्वत:ची मोहोर लावण्यास परवानगी देईल.

(2) नंतर ती मतपेटी मोहोरबंद करण्यास येईल व सुरक्षित ठेवली जाईल.

(3) पहिली मतपेटी भरल्यामुळे दुसऱ्या मतपेटीचा उपयोग करणे भाग पडले तर दुसऱ्या मतपेटीचा उपयोग करण्यापूर्वी प्रथम पहिली मतपेटी पोटनियम (1) व (2) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे बंद करुन मोहोरबंद केली जाईल; व सुरक्षित ठेवली जाईल.

## 51. मतपत्रिकांचा हिशेब. -

(1) मतदान संपल्यांनतर मतदान केंद्राध्यक्ष, मतपत्रिकांच्या हिशेबाची नोंद नमुना ई- 15 मध्ये करील व तो नमुना निराळया पाकीटात भरुन त्यावर "मतपत्रिकांचा हिशेब" असे शब्द लिहील.

(2) एखाद्या मतदान प्रतिनिधीची, मतपत्रिकांच्या हिशेबात केलेल्या नोंदीची सत्य प्रत घेण्याची इच्छा असेल तर मतदान केंद्राध्यक्ष त्याला तसे करण्याची परवानगी देईल व सत्य प्रत म्हणून ती साक्षांकित करील.

## 52. इतर पाकिटे मोहोरबंद करणे. -

(1) मतदान केंद्राध्यक्ष नंतर पुढीलप्रमाणे निरनिराळी पाकिटे तयार करील :-

(अ) खुणा केलेली मतदारांच्या यादीची प्रत ;

(ब) न वापरलेल्या मतपत्रिका ;

(क) रद्द केलेल्या मतपत्रिका ;

(ड) दुबार नोंदलेल्या मतपत्रिका आणि दुबार नोंदलेल्या मतपत्रिकांची यादी असलेला लिफाफा ;

(ई) आक्षेपित मतांची यादी ; आणि

(फ) निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची निदेशानुसार मोहोरबंद पाकिटात ठेवावयाची इतर कोणतीही कागदपत्रे

(2) असे प्रत्येक पाकीट, मतदान केंद्राध्यक्षांची आणि उपस्थितअसणाऱ्या मतदान प्रतिनिधींपैकी मोहोर लावण्याची ज्यांची इच्छा असेल अशा प्रतिनिधींचा मोहोर लावून, मोहोरबंद करण्यात येईल.

## 53. मतपेट्या वगैरे निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे पाठविणे.-

(1) त्यानंतर मतदान केंद्राध्यक्ष, खालील वस्तू, निवडणूक निर्णय अधिकारी निदेश देईल त्या ठिकाणी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या स्वाधीन करील किंवा स्वाधीन करण्याची व्यवस्था करील-

(अ) मतपेट्या; (ब) मतपत्रिकांचा हिशेब;

(क) नियम 52 मध्ये उल्लेखिलेली मोहोरबंद केलेली पाकीटे; आणि

(ड) मतदानाच्या वेळी वापरलेली इतर सर्व कागदपत्रे.

(2) मतमोजणी सुरु होईपर्यंत, निवडणूक निर्णय अधिकारी सर्व मतपेटया, पाकिटे आणि इतर कागदपत्रे यांच्या सुरक्षित परिवहानासाठी आणि त्यांच्या सुरक्षित अभिरक्षेसाठी पुरेशी व्यवस्था करील.

## 54. मतपेट्यांचा नाश वैगेरे झाल्यास नव्याने मतदान घेणे. -

(1) जर एखाद्या निवडणुकीच्या वेळी ,-

(अ) एखाद्या मतदान केंद्रावर उपयोगात आणलेली कोणतीही मतपेटी, मतदान केंद्राध्यक्ष किंवा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या अभिरक्षेतून बेकायदेशीरपणे काढून घेण्यात आली किंवा ती अपघाताने किंवा हेतूपूर्वक नष्ट करण्यात आली किंवा गहाळ करण्यात आली किंवा त्या मतदान केंद्रावर निकाल निश्चित ठरवणे अशक्य होईल इतक्या प्रमाणात तिची नासधूस करण्यात आली किंवा तीत ढवळाढवळ करण्यात आली; किंवा

(ब) जिच्यामूळे मतदानावर अनिष्ट परिणाम घडण्याची शक्यता असेल अशी कोणतीही चूक किंवा नियमबाह्यता कार्यपद्धतीत घडली

तर निवडणूक निर्णय अधिकारी ती गोष्ट जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांना ताबडतोब कळवील.

(2) जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी असा अहवाल मिळाल्यावर किंवा पोट नियम (1) मध्ये उल्लेखिलेल्या परिस्थिती स्वत: विचारात घेवून आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या सामान्य अथवा विशेष आदेशाव्दारे ,

(अ) एकतर त्या मतदान केंद्रावरील मतदान निरर्थक असल्याचे घोषित करील, त्या मतदान केंद्रावर नव्याने निवडणूक घेण्यासाठी एखादा दिवस नेमील आणि वेळ निश्चित करील त्यास योग्य वाटेल अशा रीतीने नेमलेला दिवस व निश्चित केलेली वेळ अधिसूचित करील, किंवा

(ब) त्या मतदान केंद्रावर नव्याने घेतलेल्या मतदानाचा निवडणुकीच्या निकालावर कोणत्याही प्रकारे परिणाम होणार नाही किंवा कार्यपद्धतीमधील चूक किंवा नियमबाह्यता महत्वाची नाही याबद्दल खात्री झाल्यास, तो निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास निवडणुकीसाठी त्यास योग्य वाटतील असे निदेश देईल किंवा कार्यवाही करील.

(3) या अधिनियमाचे किंवा त्या अन्वये केलेल्या नियमांच्या किंवा उप विधीच्या तरतूदी हे मूळ मतदानास लागू होतील, त्याप्रमाणे अशा प्रत्येक मतदानाला लागू होतील.

# भाग - सात

# मतमोजणी व निवडणूक निकाल जाहीर करणे

## 55. मतमोजणी. -

मतदान घेतलेल्या प्रत्येक निवडणुकीत, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या पर्यवेक्षणानुसार किंवा पर्यवेक्षणाखाली आणि त्यांच्या निर्देशानुसार किंवा निदेशांखाली मतमोजणी करण्यात येईल आणि निवडणूक लढविणारा प्रत्येक उमेदवार, त्याचा निवडणूक प्रतिनिधी आणि त्याचे मतमोजणी प्रतिनिधी यांस मतमोजणीच्या वेळी उपस्थित रहाण्याचा अधिकार असेल. निवडणूक निर्णय अधिकारी, प्रत्येक उमेदवारांच्या मतमोजणी प्रतिनिधिंना मुक्त, नि:पक्ष व पारदर्शक रितीने मतमोजणी प्रक्रिया चालावी म्हणून मूभा देईल.

## 56. मतमोजणीसाठी निश्चित केलेल्या जागी प्रवेश. -

(1) निवडणूक निर्णय अधिकारी मतमोजणीसाठी निश्चित केलेल्या जागी, -

(अ) मतमोजणीत त्याला सहाय्य करण्यासाठी तो नेमणूक करील अशा व्यक्ती ;

(ब) जिल्हा सहकारी निवडणूक अधिकाऱ्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्ती ;

(क) निवडणूकीच्या संबंधात कामावर असलेले लोकसेवक ; आणि

(ड) उमेदवार व त्यांचे आणि मतमोजणी प्रतिनिधी यांच्या व्यतिरिक्त. . . इतर व्यक्तींना प्रवेश देणार नाही.

(2) पोटनियम (1) च्या खंड (अ) अन्वये, निवडणुकीत संस्थेद्वारा कामावर लावण्यात आलेल्या किंवा अन्यथा उमेदवारासाठी काम करीत असलेल्या कोणत्याही व्यक्तीची नेमणूक करण्यात येणार नाही.

(3) मतमोजणीच्या कोणत्याही विशिष्ट टेबलावरील किंवा टेबलांच्या गटावरील मतमोजणीवर कोणत्या मतमोजणी प्रतिनिधीने किंवा प्रतिनिधींनी लक्ष ठेवावे हे निवडणूक निर्णय अधिकारी ठरवील.

(4) मतमोजणीच्या वेळी स्वत: गैरवर्तणूक करणाऱ्या किंवा निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या कायदेशीर निदेशांचे पालन करण्यात कसूर करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, जेथे मतमोजणी चालू असेल त्या जागेतून, निवडणूक निर्णय

अधिकाऱ्याकडून किंवा कर्तव्य बजावणाऱ्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याकडून किंवा निवडणूक निर्णय अधिकारी या बाबतीत प्राधिकृत करील अशा कोणत्याही व्यक्तीकडून काढून लावण्यात येईल.

**57. मतपेट्यांची छाननी व त्या उघडणे. –**

(1) निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास, एका किंवा अधिक मतदान केंद्रात वापरलेल्या मतपेट्या एकाच वेळी उघडून त्यांतील मतपत्रिकांची मोजणी करुन घेता येईल.

(2) मतमोजणीच्या टेबलावर मतपेटी उघडण्यापूर्वी, त्या टेबलाजवळ उपस्थित असलेल्या मतमोजणी प्रतिनिधींस, मतपेटीवर लावण्यात आली असेल अशी कागदी मोहोर किंवा इतर कोणतीही मोहोर तपासून पाहण्यास व ती जशीच्या तशीच आहे याबद्दल स्वतःची खात्री करुन घेण्यास परवानगी देण्यात येईल.

(3) निवडणूक निर्णय अधिकारी, कोणत्याही मतपेटीत खरोखरच ढवळाढवळ करण्यात ओलेली नाही याबद्दल स्वत:ची खात्री करुन घेईल. कोणत्याही मतपेटीत अनधिकृत ढवळाढवळ करण्यात आलेली आहे याबद्दल निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची खात्री पटल्यास, तो त्या मतपेटीतील मतपत्रिकांची मोजणी करणार नाही आणि त्या मतदान केंद्राच्या बाबतीत नियम 54 मध्ये ठरवून दिलेली कार्यपद्धती अनुसरील.

**58. मतपत्रिकांची छाननी व त्या बाद करणे. -**

(1) प्रत्येक मतपेटीतून काढलेल्या मतपत्रिकांचे सोयीस्कर असे गेठ्ठ करण्यात येतील व त्यांची छाननी करण्यात येईल.

(2) (अ) मतपत्रिकेवर, मतदार ओळखणे शक्य होईल अशा प्रकारची कोणतीही खूण किंवा लिखाण असेल, किंवा

(ब) तीवर मत नोंदविलेले नसेल, किंवा

(क) एकच उमेदवार निवडावयाचा असेल त्यावेळी, त्या मतपत्रिकेवर एकापेक्षा अधिक मतदारांना मते दिली असतील, किंवा

(ड) एकापेक्षा अधिक उमेदवार निवडावयाचे असतील त्या वेळी, मतदाराने मतपत्रिकेवर जेवढी मते देण्याचा त्याचा हक्क असेल त्याहून अधिक मते नोंदवलेली असतील, किंवा

(इ) कोणत्या मतदारास मत देण्यात आले आहे याबद्दल शंका निर्माण व्हावी अशा रीतीने मतपत्रिकेवरील मत दर्शवणारी खूण केलेली असेल, किंवा

(फ) ती मतपत्रिका बनावट असेल, किंवा

(ग) ती मतपत्रिका खरीखुरी मतपत्रिका म्हणून ओळखता येणार नाही इतकी खराब झाली असेल किंवा छिन्नविछिन्न झाली असेल, किंवा

(ह) त्या मतपत्रिकेचा अनुक्रमांक किंवा तिचे स्वरुप हे, मतदान केंद्रावर वापरण्यासाठी अधिकृत केलेल्या मतपत्रिकेच्या अनुक्रमांकापेक्षा किंवा, यथास्थित, स्वरुपापेक्षा भिन्न असेल, किंवा

(आय) नियम 43 च्या पोट नियम (3) च्या तरतूदीन्वये मतपत्रिकेवर असावयास हवी अशी खूण तीवर नसेल तर, निवडणूक निर्णय अधिकारी ती मतपत्रिका बाद ठरवील:

परंतु, –

(अ) या पोट नियमाच्या खंड (ह) किंवा (आय) मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे असणारा कोणताही दोष हा, मतदान केंद्राध्यक्ष किंवा मतदान अधिकारी यांच्या कोणत्याही चुकीमुळे किंवा कसुरीमुळे निर्माण झाला आहे याविषयी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची खात्री पटल्यास, केवळ अशा दोषाच्या कारणास्तव ती मतपत्रिका बाद ठरवण्यात येणार नाही ;

(ब) दिलेले मत हे विशिष्ट उमेदवारासाठीच आहे हा हेतू मतपत्रिकेवर केलेल्या खुणेमुळे स्पष्ट होत असेल तर, मत दर्शवणारी खूण ही अस्पष्ट आहे किंवा एकाहून अधिक वेळा केली आहे केवळ याच कारणास्वत ती मतपत्रिका बाद ठरवण्यात येणार नाही.

(3) पोटनियम (2) अन्वये कोणतीही मतपत्रिका बाद ठरविण्यापूर्वी, निवडणूक निर्णय अधिकारी उपस्थित असलेल्या प्रत्येक मतमोजणी प्रतिनिधीस मतपत्रिका तपासण्याची वाजवी संधी देईल.

(4) बाद केलेल्या प्रत्येक मतपत्रिकेवर निवडणूक निर्णय अधिकारी 'बाद' अशी अक्षरे लिहील आणि स्वत:च्या हाताने किंवा रबरी ठशाच्या सहाय्याने **मतपत्रिकेच्या मागील बाजूस** बाद केल्याची कारणे संक्षिप्तपणे नमूद करील.

(5) या नियमान्वये बाद केलेल्या सर्व मतपत्रिका एका गठ्ठयात एकत्रितपणे करण्यात येतील.

**59. मतमोजणीची कार्यपद्धती. -**

(1) नियम 58 अन्वये बाद करण्यात न आलेली प्रत्येक मतपत्रिका एक वैध मत म्हणून मोजण्यात येईल.

परंतु, प्रदत्त मतपत्रिका असलेला लिफाफा उघडला जाणार नाही आणि अशा मतपत्रिकेची मोजणी केली जाणार नाही.

(2) मतदान केंद्रावर वापरण्यात आलेल्या सर्व मतपेट्यांमध्ये असलेल्या सर्व मतपत्रिकांची मोजणी पूर्ण करण्यात आल्यानंतर, निवडणूक निर्णय अधिकारी नमुना ई-16 मधील निकाल पत्रकात नोंद करील आणि तपशील जाहीर करील.

(3) वैध मतपत्रिकांचा नंतर एकत्रित गठ्ठा करण्यात येईल आणि बाद मतपत्रिकांच्या गठ्याबरोबरच तो एका वेगळया पाकिटात ठेवण्यात येईल. ते पाकिट मोहोर लावून बंद करण्यात येऊन त्यावर पुढील तपशील नमूद करण्यात येईल:-

(अ) मतदारसंघाचे नाव ;

(ब) ज्या मतदान केंद्रावर मतपत्रिकांचा उपयोग करण्यात आला त्या केंद्राचा तपशील, आणि

(क) मतमोजणीची तारीख.

**60. मतमोजणी सतत चालू ठेवणे :-**

निवडणूक निर्णय अधिकारी व्यवहार्य असेल तेथवर मतमोजणीचे काम सतत चालू ठेवील आणि मतमोजणी तहकूब करावी लागणार असेल अशा मध्यंतराच्या कोणत्याही कालावधीत मतपत्रिका, पाकिटे व निवडणूकीच्या संबंधातील इतर कागद, स्वत:ची मोहोर लावण्याची ज्याची इच्छा असेल अशा उमेदवारांची किंवा मतमोजणी प्रतिनिधींची मोहोर लावून, मोहोर बंद करील आणि मध्यंतरामध्ये ते अभिरक्षेत राहतील याबद्दल पुरेशी खबरदारी घेण्याची व्यवस्था करील.

**61. स्वतंत्र मतदारसंघ नसतील किंवा एका मतदारसंघातून एकापेक्षा अधिक जागा भरावयाच्या असतील अशा बाबतीतील मतमोजणीची कार्यपद्धती. -**

उप विधीमध्ये व्याख्या केलेले मतदारसंघ नसतील अशा बाबतीत किंवा एका मतदारसंघासाठी उपविधीमध्ये एकापेक्षा अधिक जागा देण्यात आल्या असतील अशा बाबतीत या जागासंबंधीच्या मतांची मोजणी पुढील रीतीने करण्यात येईल: -

(1) मतांची मोजणी, निवडणूक निर्णय अधिकारी मतमोजणीत सहाय्य करण्यासाठी नियुक्त करील अशा व्यक्तींच्या सहाय्याने निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून आणि त्याच्या पर्यवेक्षणाखाली करण्यात येईल.

(2) मतमोजणीसाठी प्रत्येक मतपेटी उघडल्यानंतर अवैध व संशयास्पद मतपत्रिकांतून स्पष्टपणे वैध असलेल्या मतपत्रिका वेगळया करण्यात याव्यात. अवैध व संशयास्पद मतपत्रिका निर्णयासाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला सादर करण्यात येतील. त्यानंतर वैध मतपत्रिका मतमोजणीस घेण्यात येतील आणि मतमोजणीत सहाय्य करण्यासाठी नेमलेल्या व्यक्तींच्या मदतीने प्रत्येक उमेदवाराच्या बाजूने नोंदलेली मते मोजण्यात येतील.

(3) निवडणूक निर्णय अधिकारी उपस्थित असलेल्या उमेदावारांना आणि त्यांच्या मतमोजणी प्रतिनिधींना, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या मते "बाद" करण्यास पात्र असतील अशा सर्व मतपत्रिकांची तपासणी करण्याची वाजवी संधी देईल. परंतु त्यांना त्या किंवा इतर कोणत्याही मतपत्रिका हाताळता येणार नाहीत. निवडणूक निर्णय अधिकारी बाद केलेल्या प्रत्येक मतपत्रिकेवर 'बाद' असे पृष्ठांकित करील. कोणताही उमेदवार किंवा त्याचा मतमोजणी प्रतिनिधी कोणतीही मतपत्रिका बाद केल्याच्या निर्णयाच्या अचूकतेबद्दल प्रश्न उपस्थित करील तर, निवडणूक निर्णय अधिकारी अशा मतपत्रिकेवर ती बाद केल्याचे कारणही थोडक्यात नमूद करील.

(4) वापरलेल्या सर्व मतपेट्यांतील सर्व मतपत्रिकांची मोजणी पूर्ण करण्यात आल्यानंतर, निवडणूक निर्णय अधिकारी मोजणी केलेल्या आणि बाद केलेल्या मतपत्रिकांच्या प्रत्येक पाकिटावर वर्णन पृष्ठांकित करुन त्या मतपत्रिका वेगवेगळया पाकिटात मोहोरबंद करण्याची व्यवस्था करील.

(5) निवडणूक निर्णय अधिकारी व्यवहार्य असेल तेथवर मतमोजणीचे काम सतत चालू ठेवील आणि मतमोजणी तहकूब करावी लागली असेल अशा मध्यंतराच्या कोणत्याही कालावधीत मतपत्रिका, पाकिटे व निवडणुकीच्या संबंधातील कागद, स्वत:ची मोहोर लावून आणि मोहोर लावण्याची ज्याची इच्छा असेल अशा उमेदवारांची किंवा मतमोजणी

प्रतिनिधींची मोहोर लावून मोहोरबंद करील आणि मध्यंतरामध्ये ते सुरक्षित अभिरक्षेत राहतील याबद्दल पुरेशी सावधगिरी बाळगण्याची व्यवस्था करील.

(6) सर्व मतदान केंद्रावर वापरण्यात आलेल्या सर्व मतपेट्यांमधील मतपत्रिकांची मोजणी पूर्ण करण्यात आल्यानंतर, निवडणूक निर्णय अधिकारी प्रत्येक उमेदवाराला देण्यात आलेल्या मतांची एकूण संख्या नमूद करणारे एक एकत्रित विवरणपत्र तयार करील.

## 62. नव्याने मतदान घेण्यात आल्यानंतर मतमोजणीस पुन्हा सुरुवात करणे. -

(1) नियम 54 अन्वये नव्याने मतदान घेण्यात आल्यास, ते मतदान पूर्ण झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी, त्याने त्याबाबतीत निश्चित केलेल्या तारखेस, वेळेस व त्या ठिकाणी मतमोजणीस पुन्हा सुरूवात करील आणि त्याबद्दल उमेदवारांना पूर्वीच सूचना देण्यात आलेली असेल.

(2) नियम 58 आणि 59 च्या तरतूदी शक्य असतील तेथवर अशा नंतरच्या मतमोजणीस लागू होतील.

## 63. मतांची फेरमोजणी :-

**(1)** मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर, निवडणूक निर्णय अधिकारी, नमुना ई-16 मधील निकाल पत्रकात प्रत्येक उमेदवाराला देण्यात आलेल्या मतांची एकूण संख्या नमूद करील आणि ती घोषित करील.

परंतु, राखीव किंवा बिनराखीव जागांवरील कोणत्याही उमेदवारांना सारखी मते पडली आहेत आणि कोणताही एक उमेदवार निवडून आल्याचे जाहीर करण्यासाठी एका ज्यादा मताची आवशकता आहे असे आढळून येईल तेव्हा कोणत्या व्यक्तीस किंवा व्यक्तींना असे ज्यादा मत देण्यात आल्याचे समजण्यात यावे याचा निर्णय, निवडणूक निर्णय अधिकारी आणि उपस्थित राहण्याची ज्यांची इच्छा असेल असे उमेदवार यांच्या उपस्थितीत आणि निवडणूक निर्णय अधिकारी ठरवील अशा रीतीने चिठया काढून, करण्यात येईल.

(2) असे जाहीर करण्यात आल्यानंतर, उमेदवारास किंवा त्याच्या अनुपस्थितीत त्याच्या निवडणूक प्रतिनिधीस, फेर मतमोजणीची मागणी तो का करीत आहे याची कारणे नमूद करून, अगोदर मोजणी केलेल्या सर्व किंवा कोणत्याही मतपत्रिकांची फेरमोजणी करण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला योग्य वाटेल अशा अनामत रक्कमेसह निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे लेखी अर्ज करता येईल.

(3) असा अर्ज करण्यात आल्यानंतर, निवडणूक निर्णय अधिकारी, त्या बाबतीत निर्णय देईल आणि त्यास, तो अर्ज संपूर्णत: किंवा अंशत: मान्य करता येईल किंवा असा अर्ज क्षुल्लक किंवा गैरवाजवी आहे असे त्यास दिसून आल्यास, तो पूर्णत: फेटाळता येईल.

(4) पोटनियम (3) खालील निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचा प्रत्येक निर्णय लेखी असेल आणि त्याची कारणेही त्यात नमूद केलेली असतील.

(5) निवडणूक निर्णय अधिकारी पोटनियम (3) अन्वये अर्जास संपूर्णत: किंवा अंशत: मान्यता देण्याचे ठरवील तर तो-

(अ) आपल्या निर्णयानुसार मतपत्रिकांची फेरमोजणी करील;

(ब) अशा फेरमोजणीनंतर, नमुना ई-16 मधील निकालपत्रकात आवश्यक त्या मर्यादेपर्यंत सुधारणा करील; आणि

(क) त्याने केलेली सुधारणा जाहीर करील.

(6) प्रत्येक मतदाराला देण्यात आलेल्या एकूण मतांची संख्या पोटनियम (1) किंवा पोटनियम (5) अन्वये जाहीर करण्यात आल्यानंतर, निवडणूक निर्णय अधिकारी नमुना ई-16 मधील निकालपत्रक पूर्ण करुन त्यावर स्वाक्षरी करील आणि त्यांनतर फेरमोजणीसाठी कोणताही अर्ज स्वीकारण्यात येणार नाही :

परंतु, मतमोजणी पूर्ण झाली असेल त्या वेळी उपस्थित असलेल्या उमेदवारांना पोटनियम (2) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करण्याची वाजवी संधी देण्यात येईतोपर्यंत, मतमोजणी पूर्ण झाल्यावर या पोट नियमान्वये कोणतीही उपाययोजना करता कामा नये.

## 64. निकाल घोषित करणे आणि समितीच्या सदस्यांची नावे प्रसिध्द करणे. -

(1) निवडणूक निर्णय अधिकारी नंतर ज्याला सर्वात अधिक वैध मते देण्यात आली असतील असा उमेदवार निवडून आला असल्याचे घोषित करील आणि नमुना ई-17 मधील निवडणूकीचे विवरण प्रमाणित करील आणि जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी हा स्वत: निवडणूक निर्णय अधिकारी नसेल त्याबाबतीत निवडणूक निर्णय अधिकारी शक्य तितक्या लवकर विवरणाच्या सही केलेल्या प्रती जिल्हा सहकारी निवडणूक अधिका-याकडे पाठवील. असे घोषणापत्र मिळाल्यानंतर जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या सामान्य अथवा विशेष आदेशाच्या आधीन राहून समितीच्या सर्व निर्वाचित सदस्यांची नावे प्रसिध्द करील. आणि त्यांचे कायमचे पत्ते व ज्या मतदार संघातून ते निवडून आले असतील त्या मतदार संघांची नावे यासहीत त्यांच्या नावांची सूची त्याच्या कार्यालयाच्या सूचना फलकावर लावण्याची व्यवस्था करील आणि संबंधित संस्थेच्या सूचना फलकावर लावण्यासाठी किंवा तिच्या अभिलेखासाठी त्या संस्थेच्या नोंदणीकृत पत्त्यावर त्याची एक प्रत पाठवील. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी निवडूनआलेल्या समिती सदस्यांची यादी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाकडे पाठवील.

## भाग - आठ

## निवडणूक खर्च

### 65. निवडणूक खर्चाचा हिशेब. -

(1) निवडणुकीतील प्रत्येक उमेदवार स्वत: किंवा त्याचा निवडणूक प्रतिनिधी, निवडणूक घेण्याच्या आदेशाचा दिनांक व तिच्या निकालाचा दिनांक या दोन्ही दिनांक धरून त्या दिनांका दरम्यानच्या कालावधीमध्ये निवडणूकीच्या संबंधात त्याने किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीने केलेल्या किंवा प्राधिकृत केलेल्या संपूर्ण खर्चाचा स्वतंत्र व अचूक हिशेब ~~निकाल घोषित झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीच्या आत~~ ठेवील.

(2) या लेख्यात नियम 67 मध्ये विनिर्दिष्ट केलेला तपशील अंतर्भूत असेल.

(3) उपरोक्त खर्चाची एकूण बेरीज ही, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकारणाने अधिसूचित केलेल्या रकमेपेक्षा अधिक असता कामा नये.

(4) निवडणूक लढवणारा प्रत्येक उमेदवार त्याच्या निवडणूक खर्चाचा हिशेब नियम-67 मध्ये ठरवून दिलेल्या रीतीने व मुदतीत निवडणूक निर्णय अधिका-यामार्फत जिल्हा सहकारी निवडणूक अधिका-याकडे सादर करील.

**परंतु, असे की, ह्या उपनियमांच्या तरतुदी “ड” वर्ग सहकारी संस्थांना लागू होणार नाहीत.**

### 66. निवडणूक खर्चाचा हिशेब सादर करण्यात कसूर केल्यास अनहर्ता. -

(1) जर जिल्हा सहकारी निवडणूक अधिका-याची अशी खात्री होईल की, एखादया व्यक्तीने -

अ) पूर्ववर्ती नियमात नमुद केल्याप्रमाणे आवश्यक असेल अशा मुदतीत व रीतीने निवडणुकीच्या खर्चाचा हिशेब सादर करण्यात कसूर केला आहे ; आणि

ब) अशा कसुरी बद्दल उक्त व्यक्तीपाशी कोणतीही उचित किंवा समर्थनीय कारणे नाहीत, तर जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी, **तालुका सहकारी निवडणुक अधिकारी जसे असेल त्याप्रमाणे निबंधकांना अहवाल सादर करेल, आणि असा अहवाल प्राप्त झाल्यावर, संबंधित निबंधक, म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर** संबंधित व्यक्तीला आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर ~~राजपत्रात प्रसिध्द केलेल्या~~ आदेशाव्दारे, आणि त्याला योग्य वाटेल अशा इतर रीतीने, तिला अनर्ह घोषित करील आणि अशी कोणतीही व्यक्ती, निवडून येण्यासाठी अथवा कोणत्याही सहकारी संस्थेचा सदस्य म्हणून चालू राहण्यासाठी त्या आदेशाच्या दिनांकापासून <u>तीन</u> वर्षे मुदतीपर्यंत अनर्ह ठरेल.

### 67. निवडणूक खर्चाच्या हिशेबाचा तपशील. -

(1) नियम 65 अन्वये उमेदवाराकडून अथवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीकडून ठेवण्यात यावयाच्या निडणुक विषयक खर्चाच्या हिशेबात, दिवसागणिक होणा-या खर्चाच्या प्रत्येक बाबीसंबंधातील पुढील तपशील अंतर्भूत असेल.

**(1अ) प्रत्येक निवडणुक लढविणाऱ्या उमेदवाराने, निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासून 60 दिवसाचे कालावधीचे आत निवडणुक अधिकाऱ्याकडे निवडणुक खर्चाचा हिशोब सादर करावा.**

(अ) ज्या दिनांकाला खर्च करण्यात आला अथवा तो प्राधिकृत करण्यात आला तो दिनांक;

(ब) खर्चाचे स्वरूप (उदा. प्रवास खर्च, टपाल खर्च किंवा मुद्रण खर्च व तत्स्म खर्च);
(क) खर्चची रक्कम (एक), दिलेली रक्कम (2), अदत्त रक्क्म;
(ड) प्रदानाची दिनांक; (ई) आदात्याचे नाव व पत्ता; (फ) रक्क्म दिली असेल तर, प्रमाणकाचा अनुक्रमांक;
(ग) कोणतीही रक्कम अदत्त असेल, तर बिलांचे (प्रमाणकाचा) अनुक्रमांक ;
(ह) अदत्त रक्क्म जिला देय असेल त्या व्यक्तीचे नाव व पत्ता ;

(2) निवडणुकीच्या खर्चाच्या हिशेबासह सर्व प्रमाणके दाखल करण्यात येतील व ती, प्रदानाच्या तारखेनुसार लावण्यात येतील व उमेदवार अथवा त्याचा निवडणूक प्रतिनिधी याच्याकडून त्यावर अनुक्रमांक घालण्यात येईल आणि असे अनुक्रमांक, पोटनियम (1) ची बाब (फ) खाली हिशेबात नमूद करण्यात येतील.

(3) ज्याकरीता प्रमाणके मिळविण्यात आली नसतील अशा पोटनियम (1) च्या बाब (क) मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या खर्चाच्या बाबीसंबंधात त्याचा तपशील देणे आवश्यक असणार नाही.

**68. हिशेबाच्या निरिक्षणासाठी निवडणूक निर्णय अधिका-याने नोटीस देणे. -**

निवडणूक निर्णय अधिकारी, नियम 65 अन्वये उमेदवाराकडून निवडणूक विषयक खर्चाचा हिशेब सादर करण्यात आल्याच्या तारखेपासून दोन दिवसात, त्याच्या सूचना फलकावर नोटीस लावण्याची व्यवस्था करील, तीमध्ये-

(अ) ज्या दिनांकाला हिशेब सादर करण्यात आला तो दिनांक (ब) उमेदवाराचे नाव; आणि
(क) ज्या ठिकाणी अशा हिशेबाचे निरीक्षण करता येईल, ते ठिकाण व वेळ निर्दिष्ट करण्यात येईल.

## भाग – आठ अ

## निकाल घोषित करणे, अनामत रक्कम परत अथवा जप्त करणे, निवडणुकीसंबंधीच्या कागदपत्रांची अभिरक्षा आणि विल्हेवाट

**69. समितीच्या सदस्यांची नावे प्रसिध्द करणे :-**

(1) नियम 32 अन्वये प्रतिज्ञापन अथवा नियम 64 अन्वये निवडणूक विवरणे मिळाल्यावर, ~~राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण किंवा जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी~~ **जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका/प्रभाग सहकारी निवडणुक अधिकारी** निवडून आलेल्या समितीच्या सर्व सदस्याची नावे दोन दिवसाच्या आत प्रसिध्द करील आणि त्यांचे कायमचे पत्ते व ज्या मतदार संघातून ते निवडून आले असतील त्या मतदारसंघाची नावे यासहित, त्यांच्या नावाची सूची त्यांच्या कार्यालयाच्या सूचना फलकावर अथवा त्याच्या कार्यालयातील कोणत्याही ठळक जागी लावण्याची व्यवस्था करील .

(2) ~~राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण किंवा जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी~~ **जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका/प्रभाग सहकारी निवडणुक अधिकारी**, निवडून आलेल्या समितीच्या सर्व सदस्यांच्या नावाची यादी संस्थेला आणि निबंधकाला अशी यादी प्राप्त झाल्यावर, अधिनियमाचे कलम 73 अअअ चे उपकलम (5) प्रमाणे निबंधक न चुकता समिती गठित करण्याची आवश्यक कार्यवाही करेल ~~पाठवील~~.

**70. उमेदवारांची अनामत रक्कम परत अथवा जप्त करणे :-**

(1) नियम 23 अन्वये ठेवलेली अनामत रक्कम, एकतर ती ठेवणा-या व्यक्तीला अथवा तिच्या वैध प्रतिनिधीला, वारसाला परत करण्यात येईल अथवा निवडणूक निधीत समपहृत करण्यात येईल.

(2) या नियमात यानंतर ज्या प्रकरणांचा उल्लेख करण्यात आला आहे त्या व्यतिरिक्त इतर बाबतीत, निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर, व्यवहार्य असेल तितक्या लवकर अनामत रक्कम परत करण्यात येईल.

• जर निवडणुक लढविणा-या उमेदवारांच्या यादीत उमेदवारांचे नाव नसेल अथवा मतदान सुरू होण्याअगोदर तो मरण पावला असेल तर, त्याची अनामत रक्कम, यथास्थिति, यादी प्रसिध्द झाल्यानंतर अथवा त्याच्या मृत्यूनंतर, व्यवहार्य असेल तितक्या लवकर, परत करण्यात येईल.

(4) पोटनियम (3) च्या तरतूदीस अधीन राहून, जेथे मतदान झाले असेल त्या निवडणुकीत जर उमेदवार निवडून आला नसेल व त्याला पडलेल्या वैध मतांची संख्या, सर्व उमेदवारांना पडलेल्या वैध मतांच्या एकूण संख्येच्या एक दशमांशापेक्षा अधिक नसेल तर, अथवा निवडणुकीत एकापेक्षा अधिक उमेदवार निवडून येतील त्याबाबतीत पडलेल्या वैध मतांच्या एकूण संख्येला निवडावयाच्या उमेदवाराच्या संख्येने भागल्यानंतर ती एक दशमांशापेक्षा अधिक नसेल तर, त्याची अनामत रक्कम जप्त होईल.

**71. निवडणुकीसंबंधीची कागदपत्रे अभिरक्षेत ठेवणे :-**

नियम 51 मध्ये ज्यांचा निर्देश करण्यात आला आहे अशी पुडकी व निवडणुकीसंबंधीची इतर सर्व कागदपत्रे, निवडणूक निर्णय अधिकारी निवडणूक निकाल जाहीर करण्याच्या दिनांकपासून 6 महिने इतक्या कालावधीपर्यंत किंवा निवडणूकीसंबंधीच्या विवादाच्या बाबतीत न्यायालयाने निदेश दिला असेल अशा कालावधी पर्यंत अभिरक्षेत ठेवील.

**72. निवडणूक कागदपत्रे सादर करणे व त्यांची तपासणी. -**

(1) निवडणूक निर्णय अधिका-यांच्या अभिरक्षेत असताना :-

(अ) न वापरलेल्या मतपत्रिकांची पुडकी ;

(ब) वैध, दुबार नोंदलेली अथवा नाकारलेल्या अशा वापरलेल्या मतपत्रिकांची पुडकी;

(क) मतदारांच्या यादीच्या चिन्हांकित प्रतीची पुडकी उघडण्यात येणार नाहीत, आणि न्यायालयाच्या आदेशाखेरीज, त्यातील कागदपत्रांचे कोणीही व्यकती अथवा प्राधिकारी, यांजकडून तपासणी करण्यात येणार नाही अथवा ती कागदपत्रे त्यांच्यापुढे सादर करण्यात येणार नाहीत.

(2) निवडणुकीशी संबंधित असलेली इतर सर्व कागदपत्रे लोकांना तपासणीसाठी खुली असतील.

**73. निवडणुकविषयक कागदपत्रांची विल्हेवाट लावणे. -**

- नियम 72 मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेली पुडकी, **नियम 71 आणि** सहा महिन्यापर्यंत ठेवण्यात येतील व त्यानंतर ती राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण अथवा न्यायालय यांच्याकडून ~~**एतदविरुध्द**~~ असा कोणताही निदेश देण्यात आला असेल तर त्यास अधीन राहून, नष्ट करण्यात येतील.
- निवडणुकीशी संबंधित इतर सर्व कागदपत्रे, ती ज्या मतदारसंघाशी संबंधित असतील त्या मतदारसंघाची निवडणूक समाप्त होईपर्यंत ठेवण्यात येतील व त्यानंतर ती, आयुक्त अथवा न्यायालय यांच्याकडून ~~**एतदविरुध्द**~~ कोणताही निदेश देण्यात आला असेल तर त्यास अधीन राहून, नष्ट करण्यात येतील.

**भाग – आठ ब**

**प्रासंगिक रिक्त जागा भरावयाची रित**

**74. प्रासंगिक रिक्त जागा भरावयाची रीत :-**

संस्थेचा सदस्य मरण पावल्यामुळे, त्याने राजीनामा दिल्यामुळे, त्याला अनर्ह ठरविल्यामुळे अथवा त्याला काढून टाकण्यात आल्यामुळे अथवा त्याच्या पदाची मुदत संपण्यापुर्वी अथवा अन्यथा सदस्य म्हणून काम करण्यास असमर्थ झाल्याने रिकाम्या झालेल्या जागेच्या बाबतीत, संस्थेचा मुख्य कार्यकारी अधिकारी अशा रिकाम्या झालेल्या जागेच्या बाबतीत राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाला त्याबद्दल ताबडतोब कळवील व सोईस्कर असेल तितक्या लवकर, अधिनियमाच्या तरतुदींनुसार ती भरण्यात येईल. अशाप्रकारे निवडून आलेली किंवा स्वीकृत केलेली किंवा यथास्थिती, नामनिर्देशित केलेली व्यक्ती, जर जागा रिकामी झाली नसती तर ज्या सदस्याच्या जागी ती निवडून आली असेल, तिला स्वीकृत केले असेल किंवा यथास्थिती नामनिर्देशित केले असेल तो समितीचा सदस्य जोपर्यंत त्या पदावर राहिला असता फक्त तेवढयाच मुदतीपर्यंत पदावर राहील.

## भाग – नऊ

## ‘क’ प्रकारच्या संस्थांच्या समिती निवडणुकीबाबत विशेष तरतूदी

**75. ‘क’ प्रकारच्या संस्थांच्या समितीची निवडणूक. -**

(1) या भागातील तरतुदी नियम 4 च्या पोटनियम (3) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या ‘ क ’ प्रकारच्या संस्थांना लागू होतील.

(2) या प्रकारच्या संस्थांच्या समितीची निवडणूक पुढे नमूद केल्याप्रमाणे घेण्यात येईल.

(अ) या संस्था, तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकाऱ्यास त्या संस्थेच्या समितीची मुदत संपण्याच्या व एकशे ऐंशी दिवस अगोदर क्रियाशील सभासदांच्या यादीच्या चार प्रतीसह कळवील.

(ब) ~~**तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी हे सहकार विभागाच्या कार्यालयातील व्यक्तीची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करील आणि निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या मान्येतसह लवकरात लवकर निवडणूक कार्यक्रम तात्काळ तयार करील. तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिका-याकडून मंजुरी घेईल.**~~

जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांनी तयार केलेल्या व राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाने मान्य केलेल्या तालिकेवरील किंवा नियम 3 खंड (1) प्रमाणे राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण निवडणुक अधिकाऱ्याची नेमणूक करेल आणि निवडणुक अधिकारी तालुका सहकारी निवडणुक अधिकारी किंवा प्रभाग सहकारी निवडणुक अधिकारी यांचे मान्यतेने लवकरात लवकर निवडणुक कार्यक्रम जाहीर करेल.

~~(क) निवडणूक कार्यक्रम खाली नमूद केलेल्या तरतूदीनुसार तयार करण्यात येईल.~~

| ~~अ.क्र.~~ | ~~बाब~~ | ~~कालावधी~~ | ~~दिवस~~ |
|---|---|---|---|
| ~~01.~~ | ~~निवडणूक कार्यक्रम आणि प्राथमिक मतदारयादीची प्रसिध्दी~~ | ~~तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांनी निवडणूक कार्यक्रम मंजूर केलेल्या दिनांकाच्या पुढील दिनांकास~~ | ~~01~~ |
| ~~02.~~ | ~~प्राथमिक मतदार यादीवरील दावे व आक्षेप मागविणे~~ | ~~प्राथमिक मतदार यादी प्रसिध्द केलेच्या दिनांकापासून 5 दिवसाच्या आत~~ | ~~05~~ |
| ~~03.~~ | ~~प्राथमिक मतदार यादीवरील दावे व आक्षेप यावर निर्णय घेणे~~ | ~~प्राथमिक मतदार यादीवरील दावे व आक्षेप घेण्याच्या शेवटच्या दिनांकापासुन दोन दिवसांच्या आत~~ | ~~07~~ |
| ~~04.~~ | ~~अंतिम मतदारयादी प्रसिध्दी~~ | ~~प्राथमिक मतदार यादीवरील दावे व आक्षेपांवर घ्यावयाच्या निर्णयाच्या दिनांकाच्या पुढील दिनांकास~~ | ~~08~~ |
| ~~05.~~ | ~~नामनिर्देशन करण्याचा शेवटचा दिनांक~~ | ~~अंतिम मतदार यादीच्या प्रसिध्दीच्या दिनांकापासुन 5 दिवस~~ | ~~13~~ |
| ~~06.~~ | ~~नामनिर्देशनपत्राची यादी प्रसिध्दी~~ | ~~नामनिर्देशनाच्या शेवटच्या दिनांकास आणि नामनिर्देशनाची वेळ समाप्त झाल्यानंतर~~ | ~~13~~ |
| ~~07.~~ | ~~छाननीचा दिनांक~~ | ~~नामनिर्देशन करण्याच्या शेवटच्या दिनांकाच्या पुढील दिनांकास~~ | ~~14~~ |
| ~~08.~~ | ~~वैध नामनिर्देशनपत्राची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक~~ | ~~नामनिर्देशपत्राची छाननी पूर्ण झाल्याच्या दिनांकाच्या दुस-या दिवशी~~ | ~~15~~ |
| ~~09.~~ | ~~उमेदवारी मागे घेण्याचा दिनांक~~ | ~~वैध नामनिर्देशनपत्राची यादी प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासून 15 दिवस~~ | ~~30~~ |
| ~~10.~~ | ~~निवडणूक लढविण्याऱ्या उमेदवारांची अंतिम यादी प्रसिध्दी करण्याचा व निशाणी नेमून देण्याचा दिनांक~~ | ~~उमेदवारी मागे घेण्याकरिता निश्चित केलेल्या अंतिम दिनांकाच्या लगतच्या पुढील दिनांकास (निवडणूक निर्णय अधिका-याने निश्चित केलेल्या वेळी व ठिकाणी)~~ | ~~30~~ |
| ~~11.~~ | ~~मतदान घ्यावयाचा दिनांक, वेळ व ठिकाण~~ | ~~उमेदवारी मागे घ्यावयाच्या दिनांकानंतर किमान 5 दिवस पूर्ण झाल्यानंतर~~ | ~~5~~ |
| ~~12.~~ | ~~मतमोजणीचा दिनांक, वेळ व ठिकाण~~ | ~~मतदानानंत लगेचच~~ | ~~5~~ |
| ~~13.~~ | ~~निकाल जाहीर करण्याचा दिनांक~~ | ~~मतमोजणी समाप्त झाल्यानंतर लगेचच~~ | ~~5~~ |

(क) (i) नियम 19 च्या उपनियम (4) मधील परंतुकात घालून दिलेल्या पध्दतीने, तालुका सहकारी निवडणुक अधिकारी किंवा प्रभाग सहकारी निवडणुक अधिकारी प्रारुप मतदारयादी प्राप्त झाल्याच्या तारखेपासून सात दिवसांचे आत, खाली नमूद पध्दतीने कार्यक्रम प्रसिध्द करेल :-

| अ.क्र. | तपशिल | कालावधी |
|---|---|---|
| 1 | प्रारुप मतदार यादी प्रसिध्दी | कार्यक्रम जाहीर करण्याच्या वेळेस घोषित करावयाचा दिनांक |
| 2 | प्रारुप मतदार यादीवर हरकती व आक्षेप मागविणे | प्रारुप मतदार यादी प्रसिध्द केल्यापासून (7) दिवसांचे आत |
| 3 | प्रारुप मतदार यादीवरील आक्षेप व हरकतीवर निर्णय | प्रारुप मतदार यादीवर आक्षेप व हरकती करण्याच्या शेवटच्या दिनांकापासून (7) दिलसांचे आत |
| 4 | अंतिम मतदार यादी जाहीर करणे | आक्षेप व हरकतीवरील निर्णयाच्या तारखेस |

**(ii)** **अंतिम मतदार यादी, तालुका किंवा प्रभाग सहकारी निवडणुक अधिकाऱ्यांनी राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाने नियुक्त केलेल्या निवडणुक अधिकाऱ्यास सुपुर्द करावी.**

**(ड)** **निवडणुक अधिकारी, खाली नमुद तक्त्यातील तरतुदी प्रमाणे निवडणुक कार्यक्रम तयार करुन नियम 19 उपनियम (4) च्या परंतुकाच्या तरतुदीप्रमाणे प्रसिध्द करावी :-**

| अ.क्र. | तपशिल | कालावधी |
|---|---|---|
| 1. | निवडणुक कार्यक्रम जाहरी करण्याचा दिनांक | कार्यक्रम जाहीर करण्याच्या वेळेस दिनांक घोषित करण्यात यावा |
| 2. | नामनिर्देशन करण्याची शेवटचा दिनांक | निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्याच्या दिनांकापासून ~~5 दिवस~~ 5 कामाचे दिवस |
| 3 | नामनिर्देशनाची यादी प्रसिध्द करणे | नामनिर्देशनाच्या शेवटच्या दिवशी नामनिर्देशनाची वेळ संपल्यानंतर |
| 4 | नामनिर्देशन पत्रांच्या छाननीचा दिनांक | नामनिर्देशन पत्र दाखल करण्यासाठी निश्चित केलेल्या शेवटच्या दिनांकानंतरच्या दुसऱ्या दिवशी |
| 5 | छाननीनंतरच वैध नामनिर्देशन पत्रांच्या यादीचा प्रसिद्धीचा दिनांक | छाननी पूर्ण झाल्यानंतरच्या दिनांकाच्या दुस-या दिवशी |
| 6 | ज्या दिनांकापर्यंत उमेदवारी मागे घेता येईल तो दिनांक | छाननीनंतर वैध नामनिर्देशन पत्रांच्या यादीच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून 15 दिवसांच्या आत |
| 7 | निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराच्या अंतिम यादीची प्रसिद्धी व चिन्हांचे वाटप याचा दिनांक | उमेदवारी मागे घेण्यासाठी निश्चित केलेल्या अंतिम दिनांकाच्या निकट अनुवर्ती <u>दिवस</u> |
| 8 | आवश्यक असल्यास, ज्या दिनांकास ज्या वेळी व ज्या ठिकाणी मतदान घेण्यात येईल ती दिनांक, ती वेळ व ते ठिकाण/ठिकाणे | उमेदवारी मागे घेण्याच्या दिनांकानंतर कमीत कमी (5) दिवस (ठिकाण आणि वेळ निवडणुक अधिकाऱ्याने निश्चित करावा) |
| 9 | मतमोजणीचा दिनांक, वेळ व ठिकाण | मतदान संपल्यानंतर |
| 10 | मतदानाचे निकाल जाहीर करण्याचा दिनांक | मतमोजणीनंतर लगेच. |

**(3)** नियम 20 ते 74 च्या तरतुदी, त्या जशा आहे त्याप्रमाणे, अशा संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी लागू होतील.

**(4)** (अ) निवडणूक निर्णय अधिका-याने नामनिर्देशन पत्र फेटाळले असेल तर, उमेदवारास नामनिर्देशन पत्र फेटाळ्याच्या दिनांकापासून तीन दिवसांच्या कालावधीत निबंधकाकडे अपील दाखल करता येईल. निबंधक असे अपील, ते अपील मिळाल्याच्या दिनांकापासून दहा दिवसांच्या आत निकाली काढेल.

(ब) निवडणूक निर्णय अधिकारी निकाल जाहीर करण्यासाठी निश्चित केलेल्या दिनांकापासून दोन दिवसांच्या आत संबंधीत निकाल तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्याकडे सादर करील.

(क) तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी निवडणूकीचा निकाल प्राप्त झाल्यापासुन तीन दिवसाच्या आत निवडून आलेल्या उमेदवाराची अधिसूचना जाहीर करेल, आणि निवडणूक निर्णय अधिका-यास पदाधिका-यांची दहा दिवसांचे आत निवड करण्याबाबत निर्देश देईल.

(ड) या प्रकारच्या संस्थांच्या निवडणुका या नियमात विहित केल्याप्रमाणे वेळ आणि दिनांक वगळता या नियमांत घालून देण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार घेण्यात येतील.

## भाग - दहा

## 'ड' प्रकारच्या संस्थांच्या समितीची निवडणूक

~~76. 'ड' प्रकारच्या संस्थांच्या समितीची निवडणूक. -~~

~~(1) या भागातील तरतुदी नियम 4(चार) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या ' ड ' प्रकारच्या संस्थांना लागू होतील.~~

~~(2) या प्रकारच्या संस्थांच्या निवडणूका या प्रयोजनार्थ बोलावलेल्या विशेष सर्वसाधारण सभेत घेण्यात येईल. अशी सभा राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने नियुक्त केलेल्या व्यक्तीच्या अध्यक्षतेखाली होईल. अशा सभेची नोटीस निवडणुक निर्णय अधिकारी किंवा असा अधिकारी लागु असेल त्याप्रमाणे अशा सभेसाठी निश्चित दिनांकाच्या किमान पंधरा दिवस आधी देईल:~~

~~परंतु संस्थेच्या सर्वसाधारण सभेने, तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकाऱ्याकडे नियम 75 मध्ये विहित केल्याप्रमाणे निवडणूक घ्यावी याबाबत ठरावाव्दारे मागणी केल्यास, तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी नियम 75 मध्ये घालून दिलेल्या कार्यपध्दती नुसार निवडणूक घेण्याबाबतची पुढील कार्यवाही करील.~~

~~परंतु आणखी असे की, जर या प्रयोजनार्थ बोलावण्यात आलेल्या विशेष सर्वसाधारण सभेत, कोणत्याही कारणामुळे समिती सदस्य निवडण्यास कसूर झाल्यास, निवडणूकीच्या कामासाठी नियुक्त केलेली व्यक्ती, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण किंवा जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा यथास्थित तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांचेकडे नियम 75 अन्वये विहित केल्याप्रमाणे निवडणूक घेण्यासंदर्भात, अहवाल सादर करील.~~

~~परंतु तसेच निवडणुकीच्या कामासाठी नेमलेल्या व्यक्तीस, कोणत्याही परिस्थितीत मतदानाचा हक्क असणार नाही.~~

~~(3) निवडणुकीच्या कामासाठी नियुक्त केलेली व्यक्ती, सभेस उपस्थित राहील आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाकडे ज्या प्रयोजनार्थ अशी सभा झाली त्या सभेनंतर दोन दिवसांच्या आत आपला अहवाल सादर करेल.~~

**76.** **ड वर्ग प्रकारातील संस्थांच्या समितीची निवडणुक ह्या भागातील तरतुदी, नियम 4 (iv) मध्ये नमूद ड वर्ग प्रकारातील संस्थांना लागू होतील :-**

**(1) संस्थेने तिची प्रारुप मतदार यादी तयार करावी आणि त्याची एक प्रत, तालुका किंवा प्रभाग सहकारी निवडणुक अधिकाऱ्यास समितीचा कार्यकाल संपण्यापूर्वी कमीत कमी (60) दिवस अगोदर सादर करावी.**

**(2) प्रारुप मतदारांची यादी प्राप्त झाल्याच्या दिनांका पासून (7) दिवसाचे आत तालुका किंवा प्रभाग सहकारी निवडणुक अधिकाऱ्यांने अंतिम मतदार यादीचा कार्यक्रम प्रसिध्द करावा.**

| अ.क्र. | तपशिल | कालावधी |
|---|---|---|
| 1 | प्रारुप मतदार यादी प्रसिध्दी | कार्यक्रम जाहीर करण्याच्या वेळेस घोषित करावयाचा दिनांक |
| 2 | प्रारुप मतदार यादीवर हरकती व आक्षेप मागविणे | कार्यक्रम जाहीर करण्याच्या वेळेस घोषित करावयाचा दिनांक |
| 3 | प्रारुप मतदार यादीवरील आक्षेप व हरकतीवर निर्णय | प्रारुप मतदार यादीवर आक्षेप व हरकती करण्याच्या शेवटच्या दिनांकापासून (7) दिलसांचे आत |
| 4 | अंतिम मतदार यादी जाहीर करणे | आक्षेप व हरकतीवरील निर्णयाच्या पुढचा दिनांक |

**(3) अंतिम मतदार यादी राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाने किंवा तालुका किंवा प्रभाग सहकारी निवडणुक अधिकाऱ्याने नियुक्त केलेल्या प्राधिकृत अधिकाऱ्यास सुपुर्द करण्यात यावी.**

**(4) ह्या संस्थांच्या निवडणुका, या प्रयोजनार्थ बोलविलेल्या विशेष सर्वसाधारण सभेत घेण्यात येतील, अशी सभा राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाने ह्या हेतूने नियुक्त केलेल्या व्यक्तीच्या अध्यक्षतेखाली होईल, अशा सभेची नोटीस निडणुक अधिकारी किंवा यथास्थिती, असा अधिकारी अशा सभेच्या किमान 15 दिवस अगोदर होईल :**

**परंतु, संस्थेच्या सर्वसाधारण सभेने, तालुका किंवा प्रभाग सहकारी निवडणुक अधिकाऱ्याकडे नियम 75 मध्ये विहित केल्याप्रमाणे निवडणुक घ्यावी याबाबत ठरावाव्दारे मागणी केल्यास तालुका किंवा प्रभाग सहकारी निवडणुक अधिकारी नियम 75 मध्ये घालून दिलेल्या कार्यपध्दती नुसार निवडणुक घेण्याबाबतची पुढील कार्यवाही करेल.**

**परंतु, आणखी असे की, जर या प्रयोजनार्थ बोलवण्यात आलेल्या विशेष सर्वसाधारण सभेत कोणत्याही कारणामुळे समिती सदस्य निवडण्यात कसून झाल्यास, निवडणुकीच्या कामासाठी नियुक्त केलेली व्यक्ती राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण किंवा जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी किंवा यथास्थिती तालुका किंवा प्रभाग सहकारी निवडणुक अधिकारी यांच्याकडे नियम 75 अन्वये विहित केल्याप्रमाणे निवडणुक घेण्यासंदर्भात अहवाल सादर करील.**

**(5) निवडणुकीच्या कामासाठी नियुक्त केलेली व्यक्ती सभेस उपस्थित राहील आणि राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाकडे ज्या प्रयोजनार्थ अशी सभा झाली त्या सभेपासून दोन दिवसाचे आत आपला अहवाल सादर करील :**

**(६) निवडणुक निर्णय अधिकारी किंवा प्राधिकृत अधिकारी यांची तालिका राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाने विहित केलेल्या पध्दतीने करण्यात यावी.**

## भाग – दहा – अ
## पदाधिकाऱ्यांच्या निवडणुकीची पध्दत

**77. पदाधिका-यांची निवडणूक. -**

समितींच्या सदस्यांची निवड झाल्यानंतर लगेचच, अशा कोणत्याही संस्थंच्या पदाधिकाऱ्यांची निवडणूक तिच्या उप-विधींमध्ये तरतूद केल्याप्रमाणे निकाल जाहीर झाल्यानंतर पंधरा दिसांच्या कालावधीत घेण्यात येईल. या प्रयोजनार्थ घेतलेली समितीची सभा, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाकडून प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली होईल.

## भाग - अकरा
## निवडणुकांसंबंधातील निवडणूक विवाद

**78. निवडणूक विवाद. -**

कलम 91 मध्ये घालून दिल्याप्रमाणे, सहकारी न्यायालयाकेउ विनंती अर्ज सादर करुन असेल त्याखेरीजकरुन, कोणत्याही निवडणुकीस आव्हान देता येणार नाही.

## भाग - बारा
## भ्रष्टाचार आणि निवडणुकविषयक अपराध

**79. निवडणूकीच्या संबंधातील भ्रष्टाचार, अपराध आणि त्यासाठीची शास्ती.-**

या प्रकरणाच्या प्रयोजनार्थ, पुढील गोष्टी भ्रष्टाचार असल्याचे समजण्यात येईल.

(1) लाचलुपत म्हणजे

(अ) उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने किंवा उमेदवाराच्या किंवा त्यांच्या निवडणूक प्रतिनिधीच्या संमतीने इतर कोणत्याही व्यक्तीने, प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे, -

(अ) निवडणूकीत उमेदवार म्हणून उभे राहण्याविषयी किंवा उभे न राहण्याविषयी किंवा निवडणूकीतून उमेदवारी मागे घेण्याविषयी किंवा उमेदवारी मागे न घेण्याविषयी एखाद्या व्यक्तीस प्रवृत्त करण्याच्या उद्देशाने; किंवा

(ब) निवडणूकीत मते देण्याविषयी किंवा मत न देण्याविषयी एखाद्या मतदारास प्रवृत्त करण्याच्या उद्देशाने; किंवा

1) एखाद्या व्यक्तीस निवडणूकीत अशा प्रकारे उभे राहिल्याबद्दल किंवा न राहिल्याबद्दल किंवा आपली उमेदवारी मागे घेतल्याबद्दल किंवा मागे न घेतल्याबद्दल; किंवा

2) एखाद्या मतदारास मत दिल्याबद्दल किंवा मत न दिल्याबद्दल बक्षिस म्हणूस, कोणतीही देणगी देणे, देऊ करणे किंवा कोणताही परितोष देण्याचे अभिवचन देणे;

(ब) (अ) एखाद्या व्यक्तीने उमेदवार म्हणून उभे राहण्यासाठी किंवा न राहण्यासाठी किंवा उमेदवारी मागे घेण्यासाठी किंवा उमेदवारी मागे न घेण्यासाठी; किंवा

(ब) कोणत्याही व्यक्तीने स्वत: किंवा दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीने मत देण्याविषयी किंवा मत न देण्याविषयी किंवा कोणत्याही मतदारास मत देण्याविषयी किंवा मत न देण्याविषयी किंवा कोणत्याही उमेदवारस आपली उमेदवारी मागे घेण्याविषयी किंवा आपली उमेदवारी मागे न घेण्याविषयी प्रवृत्त करण्याविषयी किंवा प्रवृत्त करण्याचा प्रयत्न करण्याविषयी, प्रेरणा किंवा बक्षिस म्हणून कोणताही परितोष घेणे किंवा परितोष घेण्याविषयी करार करणे.

**स्पष्टीकरण :-** या खंडाच्या प्रयोजनांसाठी "परितोष" ही संज्ञा, आर्थिक परितोष किंवा पैशाच्या स्वरूपात ठरविण्यात येण्याजोगा परितोष यापुरतीच मर्यादित नाही. आणि तीत बक्षीस म्हणून केलेल्या सर्व प्रकारच्या सरबराईचा व सेवायोजनाच्या सर्व प्रकारांचा समावेश होतो. परंतु तीत कोणत्याही निवडणूकीत किंवा निवडणूकीसाठी खरोखर केलेल्या निवडणूक खर्चाच्या हिशेबात ज्याची यथोचित रीतीने नोंद करण्यात आली आहे अशा प्रदान केलेल्या रकमांचा समावेश होत नाही.

2) गैरवाजवी दडपण, म्हणजे उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने किंवा उमेदवाराच्या किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या संमतीने इतर कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही निवडणूक अधिकाराचा मुक्त वापर करण्याच्या कामी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीने केलेला कोणताही हस्तक्षेप किंवा हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न:

परंतु,-

(अ) या खंडाच्या तरतुदींच्या सर्वसाधारणतेस बाधा न येऊ देता त्याच्या विनिर्दिष्ट केलेली जी कोणतीही व्यक्ती-

(एक) कोणत्याही उमेदवारास किंवा मतदारास किंवा ज्या कोणत्याही व्यक्तीविषयी उमेदवारास किंवा मतदारास आस्था आहे अशा व्यक्तीस समाजबहिष्कृत व जातिबहिष्कृत करणे किंवा तिला जातीतून किंवा जमातीतून काढून टाकणे यासह कोणत्याही प्रकारची इजा पोचवण्याची धमकी देईल, किंवा

(दोन) उमेदवारावर किंवा मतदारावर किंवा तो ज्या व्यक्तीविषयी आस्था बाळगतो त्या व्यक्तीवर दैवी अवकृपा होईल किंवा तिला पाप लागेल किंवा ती अशा अवकृपेस पात्रा ठरवली जाईल किंवा पापी ठरवली जाईल या गोष्टीवर विश्वास ठेवण्यास कोणत्याही उमेदवाराला किंवा मतदाराला प्रवृत्त करील किंवा प्रवृत्त करण्याचा प्रयत्न करील, ती व्यक्ती, या खंडाच्या अर्थान्तर्गत उमेदवाराने किंवा मतदाराने निवडणूक अधिकाराचा मुक्त वापर करण्याच्या कामी हस्तक्षेप करीत असल्याचे मानण्यात येईल;

(ब) सार्वजनिक धोरण जाहीर करणे अथवा सार्वजनिक कृती करण्याचे अभिवचन देणे किंवा निवडणूक अधिकारात हस्तक्षेप करण्याच्या हेतूशिवाय केवळ एखाद्या कायदेशीर अधिकाराचा वापर करणे, हे या खंडाच्या अर्थान्तर्गत हस्तक्षेप करणे असल्याचे मानण्यात येणार नाही.

3) उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनधीने किंवा उमेदवारांच्या किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या संमतीने इतर कोणत्याही व्यक्तीने, कोणतेही वाहन किंवा गलबत, पैसे देऊन किंवा अन्य रितीने, भाडयाने घेणे किंवा मिळविणे किंवा (स्वत: उमेदवार, त्याच्या कुटुंबातील व्यक्ती किंवा त्याचा निवडणूक प्रतिनिधी याव्यक्तीरिक्त) इतर कोणत्याही मतदारास कोणत्याही मतदान केंद्रापर्यंत किंवा अशा केंद्रापासून मोफत ने-आणीसाठी अशा वाहनाचा किंवा गलबताचा उपयोग करणे:

परंतु, एखाद्या मतदाराने किंवा अनेक मतदारांनी त्यास किंवा त्यांना अशा कोणत्याही मतदान केंद्रापर्यंत किंवा मतदान केंद्रापासून ने-आणीच्या प्रयोजनासाठी त्याच्या किंवा त्यांच्या सामाईक खर्चाने एखादे वाहन किंवा गलबत भाड्याने घेणे हे या खंडान्वये भ्रष्टाचाराचे कृत्य समजले जाणार नाही.

परंतु आणखी असे की, कोणत्याही मतदाराने अशा कोणत्याही मतदान केंद्राकडे जाण्याच्या किंवा मतदान केंद्रापासून येण्याच्या प्रयोजनासाठी स्वत:च्या खर्चाने, कोणतेही सार्वजनिक वाहतुकीचे वाहन किंवा गलबत किंवा कोणताही रेल्वेचा डबा यांचा उपयोग करणे हे या खंडान्वये भ्रष्टाचाराचे कृत्य समजले जाणार नाही.

**स्पष्टीकरण** – या खंडात आणि लगत पुढच्या खंडात वाहन या संज्ञेचा अर्थ, रस्त्यावरील वाहतुकीच्या प्रयोजनासाठी उपयोगात आणलेले किंवा उपयोगात आणणे शक्य असलेले कोणतेही वाहन असा होतो- मग ते यांत्रिक शक्तीने

चालणारे असो किंवा अन्य रितीने वापरण्यात येत असो-आणि ते इतर वाहने ओढणा-याकरिता वापरण्यात ये असो किंवा अन्य रीतीने वापरण्यात असो.

(4) कोणत्याही निवडणूकीच्या प्रयोजनार्थ संस्थेच्या मालकीच्या वाहनांचा वापर.

(5) नियम 65 चे उल्लंघन करून खर्च करणे किंवा खर्च प्राधिकृत करणे.

(6) निवडणुकीसंबंधीच्या कार्यक्रमाच्या घोषणेचा दिनांक तारीख आणि निवडणुकीच्या निकालाचा दिनांक या दरम्यानच्या काळात कोणत्याही मतदारास किंवा मतदारांच्या गटास विशेष आगाऊ कर्जे देणे किंवा त्यावर अन्यथा अनुग्रह करणे.

**80. मतदानाची गुप्तता राखणे :-**

एखाद्या निवडणुकीत मतनोंदणीच्या किंवा मतमोजणीच्या संबंधातील कोणतेही कर्तव्य पार पाडीत असेल अशा प्रत्येक अधिका-याने, लिपिकाने, अभिकर्त्याने, किंवा इतर व्यक्तीने मतदानासंबंधी गुप्तता राखली पाहिजे आणि ती राखण्यास सहाय्य केले पाहिजे आणि त्याने किंवा त्या व्यक्तीने (कोणत्याही कायद्याने किंवा कायदयान्वये प्राधिकृत केलेल्या कोणत्याही प्रयोजनाकरीता असेल त्याव्यतिरिक्त) ज्यामुळे अशा गुप्ततेचा भंग होईल अशा कोणतीही माहिती कोणत्याही व्यक्तीस कळविता कामा नये.

**81. निवडणुकांमधील अधिकारी इत्यादींनी उमेदवारांसाठी काम न करणे किंवा मतदानाबाबत दडपण न आणणे :-**

(1) जी कोणतीही व्यक्ती, निवडणुकीत निवडणूक निर्णय अधिकारी किंवा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी किंवा मतदान केंद्राध्यक्ष किंवा मतदान अधिकारी असेल किंवा निवडणुकीच्या संबंधात कोणतेही कर्तव्य पार पाडण्याकरिता निवडणूक निर्णय अधिकारी किंवा मतदान केंद्राध्यक्ष यांजकडून नेमण्यात आलेला एखादा अधिकारी किंवा लिपिक असेल अशा व्यक्तीने निवडणुकीचे संचालन किंवा व्यवस्था करीत असताना, उमेदवारांच्या निवडणुकीतील यशाची संभाव्यता वाढविण्यासाठी कोणतेही कृत्य ( मत देण्याखेरीज इतर) करता कामा नये.

(2) वर निर्दिष्ट केलेल्या अशा कोणत्याही व्यक्तीने आणि पोलीस दलातील कोणत्याही व्यक्तीने-

(अ) निवडणुकीत आपले मत देण्याविषयी कोणत्याही व्यक्तीचे मन वळवण्याचा, किंवा

(ब) निवडणुकीत आपले मत न देण्याविषयी कोणत्याही व्यक्तीचे मन वळवण्याचा, किंवा

(क) निवडणुकीत कोणत्याही व्यक्तीच्या मतदानावर कोणत्याही रीतीने दडपण आणण्याचा प्रयत्न करता कामा नये.

**82. मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्राजवळ प्रचार करण्यास मनाई :-**

कोणत्याही व्यक्तीने, कोणत्याही मतदान केंद्रात ज्या तारखेस किंवा तारखांस मतदान घेण्यात येईल त्या तारखेस किंवा तारखांस मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्रापासुन 100 मीटर अंतरातील कोणत्याही सार्वजनिक किंवा खाजगी जागेत पुढील कृत्यांपैकी कोणतेही कृत्य करता कामा नये-

(अ) मते मिळविण्यासाठी प्रचार करणे ; किंवा (ब) कोणत्याही मतदारास मत देण्याची विनंती करणे; किंवा

(क) कोणत्याही विशिष्ट उमेदवारास मत न देण्याविषयी कोणत्याही मतदाराचे मन वळविणे; किंवा

(ड) निवडणुकीत मत न देण्याविषयी कोणत्याही मतदाराचे मन वळविणे; किंवा

(ई) निवडणुकीसंबंधी कोणतीही नोटीस किंवा चिन्ह (अधिकृत नोटिशीखेरीज इतर ) प्रदर्शित करणे;

**83. मतदान केंदामध्ये किंवा मतदान केंद्राजवळ बेशिस्त वर्तणूक केल्याबददल शास्ती .-**

(1) कोणत्याही व्यक्तीने, ज्या तारखेस किंवा तारखांस कोणत्याही मतदान केद्रात मतदान घेण्यात येईल त्या तारखेस किंवा तारखांस, मतदानाकरीता मतदान केंद्रावर येणा-या कोणत्याही व्यक्तीस त्रास होईल किंवा मतदान केंद्रात कामावर असलेल्या अधिका-यांच्या व इतर व्यक्तींच्या कामात हस्तक्षेप होईल अशा रितीने , -

(अ) मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्राच्या प्रवेशव्दाराजवळ किंवा त्याच्या जवळपास असलेल्या कोणत्याही सार्वजनिक किंवा खाजगी जागेत, ध्वनिवर्धक किंवा ध्वनिक्षेपक यांसारखे, मनुष्याचा आवाज मोठा करण्यासाठी किंवा तो पुन्हा निर्माण करणेसाठी कोणतेही साधन वापरता कामा नये, किंवा उपयोगात आणता कामा नये, किंवा

(ब) मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्राच्या प्रवेशव्दाराजवळ किंवा त्याच्या जवळपास असलेल्या कोणत्याही सार्वजनिक किंवा खाजगी जागेत ओरडता कामा नये किंवा इतर प्रकारे बेशिस्त रीतीने वागता कामा नये.

(2) जर एखाद्या मतदान केंद्राच्या मतदान केंद्राध्यक्षास एखादी व्यक्ती हया कलमान्वये शिक्षापात्र असलेला अपराध करीत आहे किंवा तिने केला आहे असे सकारण वाटत असेल तर त्यास, अशा व्यक्तीस अटक करण्याबद्दल कोणत्याही पोलीस अधिका-यास निदेश देता येईल आणि लागोलाग त्या पोलीस अधिका-याने उक्त व्यक्तीस अटक केली पाहिजे.

(३) कोणत्याही पोलीस अधिका-यास, पोटनियम (1) च्या तरतुदीच्या कोणत्याही उल्लंघनास प्रतिबंध करण्यासाठी वाजवीरीत्या आवश्यक असतील अशा उपाययोजना करता येतील व अशा बलाचा वापर करता येईल आणि अशा उल्लंघनाकरिता वापरण्यात आलेले कोणतेही साधन जप्त करता येईल.

**84. मतदान केंद्रावर गैरवर्तणूक केल्याबद्दल शास्ती :-**

(1) कोणतीही व्यक्ती कोणत्याही मतदान केंद्रात मतदानासाठी निश्चित केलेल्या वेळेमध्ये गैरवर्तणूक करील किंवा मतदान केंद्राध्यक्षाच्या कायदेशीर निदेशांचे पालन करण्यात कसूर करील तर त्या व्यक्तीस, मतदान केंद्राध्याक्षांकडून किंवा कामावरील कोणत्याही पोलीस अधिका-याकडून किंवा अशा मतदान केंद्राध्यक्षाने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून मतदान केंद्रातून काढून टाकता येईल.

(2) ज्या मतदारास मतदान केंद्रात मतदान करण्याचा अन्यथा हक्क असेल अशा कोणत्याही मतदारास उक्त केंद्रात मतदान करण्याची संधी मिळण्यास प्रतिबंध होईल अशा रीतीने उपबंध (1) अन्वये देण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करता येणार नाही.

**85. मतदान केंद्रावरून मतपत्रिका बाहेर नेणे हा अपराध असणे :-**

(1) एखाद्या मतदान केंद्राध्यक्षास सकारण वाटत असेल जर कोणतीही व्यक्ती, अपप्रकारे मतदान केंद्रावरून मतपत्रिका बाहेर नेणे किंवा बाहेर नेण्याचा प्रयत्न करणे किंवा सहेतुकपणे अशी कृती करण्यास मदत किंवा साह्य करणे अशा अधिका-यास अशा व्यक्तीस, तिने मतदान केंद्र सोडण्यापूर्वी, अटक करता येईल किंवा तिला अटक करण्याविषयी पोलीस अधिका-यास निदेश देता येईल आणि अशा व्यक्तीची झडती घेता येईल किंवा पोलीस अधिका-यांकडून तिची झडती घेवविता येईल.

परंतु, जेव्हा एखाद्या स्त्रीची झडती घेण्याची आवश्यकता असेल तेंव्हा सदर झडती दुस-या स्त्रीकडून, सभ्यतेचे दक्षतापूर्वक पालन करून घेण्यात येईल.

(2) अटक करण्यात आलेल्या व्यक्तीची झडती घेण्यात आल्यावर तिच्याजवळ कोणतीही मतपत्रिका सापडल्यास ती, मतदान केंद्राध्यक्ष सुरक्षित अभिरक्षेसाठी, पोलीस अधिका-याच्या स्वाधीन करील किंवा सदर झडती पोलीस अधिका-याकडून घेण्यात आली असेल तेव्हा असा अधिकारी अशी मतपत्रिका सुरक्षित अभिरक्षेत ठेवील.

**86. इतर अपराध व त्याबद्दलच्या शास्ती :-**

(1) कोणत्याही निवडणुकीच्या वेळी पुढीलपैकी कोणतेही कृत्य करणारी कोणतीही व्यक्ती निवडणुकीबाबतच्या अपराधाबद्दल दोषी असेल :

(अ) कोणतेही नामनिर्देशनपत्र लबाडीने खराब करणे किंवा लबाडीने त्याचा नाश करणे; किंवा

(ब) निवडणूक निर्णय अधिका-याच्या प्राधिकाराव्दारे किंवा तद्न्वये लावलेली कोणतीही यादी, नोटीस किंवा इतर कागदपत्र लबाडीने खराब करणे किंवा लबाडीने त्याचा नाश करणे, किंवा ते काढून टाकणे; किंवा

(क) कोणतीही मतपत्रिका किंवा कोणत्याही मतपत्रिकेवरील अधिकृत चिन्ह किंवा ओळख पटवून देण्याबाबतचे प्रतिज्ञापन किंवा डाकेने मतपत्रिका पाठविण्यासंबंधात वापरलेले अधिकृत पाकीट लबाडीने खराब करणे किंवा लबाडीने त्याचा नाश करणे; किंवा

(ड) योग्य प्राधिकाराशिवाय कोणत्याही व्यक्तीस मतपत्रिका पुरविणे किंवा कोणत्याही व्यक्तीकडून मतपत्रिका स्वीकारणे किंवा कोणतीही मतपत्रिका जवळ बाळगणे; किंवा

(ई) मतपेटीत जी मतपत्रिका टाकण्याचा कायद्याने अधिकार असेल त्या मतपत्रिकेव्यतिरिक्त इतर कोणतीही वस्तू लबाडीने तीत टाकणे; किंवा

(फ) निवडणुकीच्या प्रयोजनासाठी त्यावेळी उपयोगात आणलेल्या कोणत्याही मतपेट्यांचा किंवा मतपत्रिकांचा योग्य प्राधिकारावाचून नाश करणे किंवा त्या घेऊन जाणे किंवा उघडणे किंवा त्यात इतर रीतीने हस्तक्षेप करणे; किंवा

(ग) लबाडीने किंवा यथास्थिती, योग्य प्राधिकारावाचून कोणतीही पूर्वोकृत कृत्ये करण्याचा प्रयत्न करणे किंवा अशी कृत्ये करण्यास जाणूनबुजून मदत करणे किंवा अशी कृत्ये करण्यास अपप्रेरणा देणे.

(2) या कलमाच्या प्रयोजनाकरिता, मतमोजणी धरुन निवडणुकीचे काम किंवा निवडणुकीच्या कामाचा भाग पार पाडताना त्यात भाग घेणे किंवा निवडणुकीनंतर अशा निवडणुकांच्या संबंधात वापरलेल्या मतपत्रिका व इतर कागदपत्रे यांच्याबद्दल जबाबदार राहणे हे एखादया व्यक्तीचे कर्तव्य असेल तर, ती व्यक्ती अधिकृत कामावर आहे असे मानण्यात येईल. परंतु, " अधिकृत काम " या संज्ञेत या नियमाव्दारे किंवा तदन्वये असेल त्याखेरीज अन्यथा लादलेल्या कोणत्याही कामांचा समावेश होणार नाही.

**नमुना - इ-1**

**[नियम 5 (1) पहा]**

**राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाकडे** ठेवावयाची **पुढील व**र्षी **निवडणूकीस पात्र असणा-या सहकारी संस्थांचा** नावे **दर्शविणारी नोंदवही**

| अ.क्र. | विभाग | जिल्हा | तालुका/ प्रभाग | नोंदणी क्रमांक व संपूर्ण पत्ता यांसह संस्थेचे नांव | समितीच्या कर्मचारी संख्येच्या संबंधातील उपविधी क्रमांक | समितीसाठी निवडावयाच्या सदस्यांची कर्मचारी संख्या | | पदाधिका-यांचा यापूर्वी झालेला निवडणुकीचा दिनांक | विद्यमा ान पदाधिका-यांची ज्या दिवशी मुदत संपते तो दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | मतदार संघांचा क्रमांक | सदस्य संख्या | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| | | | | | | | | | | |

**नमुना - इ-2**

**[नियम 5 (2) पहा]**

**संस्थेच्या समितीने त्यांची मुदत संपण्याच्या सहा महिने पूर्वी दाखल करावयाच्या माहितीचा नमुना**

| अ,क्र. | सहकारी संस्थेचे नाव, नोंदणी क्रमांक व संपूर्ण पत्ता यासह | व्यवस्थापन समितीचा अखेरच्या निवडणुकीचा ज्या दिवशी जाहिर झाला तो दिनांक | विद्यमान व्यवस्थापन समिती सदस्यांची मुदत ज्या दिनांकास संपली तो दिनांक | उपविधीनुसार मतदार संघाचे नाव | प्रत्येक मतदारसंघातून निवडावयाच्या व्यवस्थापन समितीच्या सदस्यांच्या संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| | | | | | | |

टीप - संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी / सचिव यांनी संस्थेची प्राथमिक मतदार यादी सात दिवसाच्या आत खालील बाबींचा अंतर्भाव करून देत असल्याबाबतचे प्रमाणपत्र खालिल प्रमाणे द्यावे.

प्रमाणपत्र

मी श्री. / श्रीमती. ---------------------------------- मुख्य कार्यकारी अधिकारी / सचिव , -------------------------- संस्था मर्या. -------ह्या द्वारे प्रमाणित करतो की,

1. संस्था प्राथमिक मतदार यादी, ही सदरची मुदत संपण्याच्या 120 / 150 दिवसांपूर्वी तयार करील.
2. नमुना इ-2 मधील मतदार यादी माहिती खरी व संस्थेच्या अभिलेखाशी जुळणारी आहे.
3. प्राथमिक मतदार यादीमधील हा या नियमातील तपशील नियम क्र. 6 मध्ये नमूद केल्याप्रमाणे आहे.

ठिकाण :--------------------

दिनांक :-------------------- **संस्था सिल** ---------------------------------------------

मुख्य कार्यकारी अधिकारी / सचिव नांव व सही

**नमुना इ- 3**

मतदारांची **प्राथमिक मतदार यादी ( वैयक्तिक मतदार)**

**(नियम 7 व 10 पहा)**

**1. संस्थेचे नांव व पत्ताः- ----------------------------------------**

**2. नोंदणी क्रमांक व दिनांकः- -------------------------**

**3. प्राथमिक मतदार यादी प्रकाशित करण्याच्या दिनांकास एकुण सभासदः- ----------------**

**4. प्राथमिक मतदार यादी प्रकाशित करण्याच्या दिनांकास एकुण पात्र मतदारः- ----------------**

| **अ.क्र.** | **सभासदाचे नाव ( इंग्रजी वर्णमालेनुसार)**<br>**( आडनाव ,**पहिले **नाव व** मधले **नाव)** | **सभासद क्र..** | **वय** | **लिंग** | **पत्ता** |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

सुचनाः- संस्था त्यां**च्या**, संस्थेचे कार्यक्षेत्र , संस्थेच्या शाखा संख्या विचारात घेवून निवडणूक **घे**ण्यास सुलभतेच्या प्रमाणे प्राथमिक मतदार यादी करू शकेल.

ठिकाण :--------------------

दिनांक :--------------------

संस्था
सिल

----------------------------------------------------

मुख्य कार्यकारी अधिकारी / सचिव नांव व सही

**नमुना इ- 3(1)**

**मतदार यादी (संस्था सभासद)**

**(नियम 7 व 10 पहा)**

**1. संस्थेचे नांव व पत्ताः- ----------------------------------------**

**2. नोंदणी क्रमांक व दिनांकः- -------------------------**

**3. मतदार यादी प्रकाशित करण्याच्या दिनांकास एकुण सभासदः- ----------------**

**4. मतदार यादी प्रकाशित करण्याच्या दिनांकास एकुण पात्र मतदारः- ----------------**

| अ.क्र. | सभासद संस्थेचे नाव | सभासद संस्था प्रतिनिधीचे नाव ( इंग्रजी वर्णमालेनुसार) ( आडनाव , पहिले नाव व मधले नाव) | संस्थेचा सभासद क्र.. | वय | लिंग | पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

दिनांक :--------------------

ठिकाण :--------------------

सिल

**निवडणुक निर्णय अधिकारी**

**नमुना इ -4**

**[नियम 19 पहा]**

**निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय,-------------------------------------( सद्याचे कार्यालयीन पदनाम नमूद करावे)**

सहकारी संस्थेचे नाव - ---------------------------------------------------- सहकारी संस्था मर्यादित. ------------- तालुका -------------जिल्हा. ----------

महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणूक नियम 2013 याच्या नियम 19 प्रमाणे अधिकारांचा वापर करुन आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण व जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांनी जाहीर केलेल्या उपरोक्त सहकारी संस्थेच्या सदस्यांच्या निवडणुकीकरिता मी,---------------------------------------------- (कार्यालयीन पदनाम) आणि जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अथवा राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांच्या मान्यतेने,---------------------------------------------------- सहकारी संस्था मर्या. ----------------, तालुका --------------, जिल्हा -------------- यांच्या समितीच्या सदस्यांची निवडणूक घेण्याकरिता नियुक्त केलेला, निवडणूक निर्णय अधिकारी, याव्दारे,--------------------------------मर्यादित, --------- तालुका--------- जिल्हा--------- म्हणून ओळखल्या जाणा-या सहकारी संस्थेच्या समितीच्या सदस्यांची/सदस्यांची निवड करण्याच्या निवडणुकीचा कार्यक्रमातील विविध टप्पे तयार करील व जाहिर करीत आहोत आणि यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ- 1 मध्ये विविर्दिष्ट केलेल्या मतदार संघाच्या किंवा मतदारसंघांच्या सं

बंधातील निवडणुका नियत करीत आहोत..

**अनुसूची**

| अ. क्र. | मतदार संघाचे नाव | नामनिर्देशनपत्रे दाखल करण्यासाठीचा शेवटचा दिनांक (ज्या जागी नामनिर्देशनपत्रे मिळतील ती जागा) | नामनिर्देशन पत्रांची यादीचे प्रकाशन | नामनिर्देशन पत्राच्या छाननीचा दिनांक | विधीग्राहय नामनिर्देशना पत्रांची सूची प्रसिध्द करण्याचा दिनांक | उमेदवाराने नामनिर्देशन पत्रे मागे घेण्याचा दिनांक | उमेदवारांना निशाणीचे वाटप व अंतिम यादीचे प्रकाशन | मतदान ज्या दिनांकास घेण्यात येईल तो दिनांक, वेळ व मतदानाचे स्थळ | मत मोजणी ची दिनांक, वेळ व स्थळ | मतदाना चे निकाल घोषित करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| | | | | | | | | | | |

निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाचा पत्ता :-- -------------

संपर्क क्र.:-- --------- ई- मेल :- ---- निवडणूक निर्णय अधिका-याचे नाव , स्वाक्षरी व मुद्रा

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण/ जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांच्या मान्यतेने

| |
|---|
| पासपोर्ट आकाराचे नजीकच्या काळातील छायाचित्र |

**नमूना इ- 5**

**[नियम 20(2) पहा ]**

**नामनिर्देशन पत्राचा नमूना**

(------------------------------------------------ ---------------- सहकारी संस्था मर्या.,------------ --------------तालुका,-------------, जिल्हा --------------------------ची सन ------ते ------- या कालावधी साठीची निवडणूक )

मी,---------------------------------------------------- याव्दारे श्री/ श्रीमती, ---------------------- -------------- यांना.......................... या मतदारसंघातील उमेदवार म्हणून नामनिर्देशीत करीत आहे.

1. मतदारसंघाचे नाव :- ..............................................................................

2. उमेदवाराचे नाव :-

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

(आडनाव) (नाव) (वडिलांचे/पतीचे नाव)

3. उमेदवाराचे वय :- ---------------------

4. उमेदवाराचा डाकेचा संपूर्ण पत्ता :-

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

(निवासी पत्त्याबाबतच्या पुरावा व ओळखपत्राची छायांकीत प्रत जोडवी)

5. संपर्क क्रमांक . अ) निवास / कार्यालय ------ ब) भ्रमणध्वनी क्र.. --------

क) ई- मेल आय डी---------------------- ड) आधार कार्ड नं..

6. मतदारसंघाचे नाव -

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

(एक) राखीव जागा असलेल्या मतदार संघात उमेदवार ज्या अनुसूचीत जातीचा किंवा अनुसूचीत जमातीचा किंवा इतर मागास प्रवर्गाचा किंवा भटक्या जाती किंवा विमुक्त जमातीचा किंवा विशेष मागास प्रवर्गाचा असेल त्याचा तपशील नमूद करावा.

--------------------------------------------------------------------------------------------------

(दोन) ज्या मतदारसंघात उमेदवाराचे नाव नोंदलेले आहे त्या मतदारसंघाचे नाव (लागू असल्यास नमूद करावे)

–––––––––––––––––––––––––––––––––

(तीन) ज्यात उमेदवाराचे नाव मतदार म्हणून नोंदलेले असेल त्या पूर्वोल्लेखित मतदारसंघाच्या मतदारांच्या यादीतील उमेदवाराचा अनुक्रमांक :-

7. सूचकाचे नाव :-

–––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

(आडनाव) (नाव) (वडिलांचे /पतीचे नाव)

8.. संपर्क क्रमांक :- . अ) निवास / कार्यालय ------ ब) भ्रमण ध्वनी क्र.. --------

क) ई- मेल आय डी---------------------- ड) आधार कार्ड नं..--------------

9. मतदारसंघाच्या मतदार यादीतील सूचकाचा अनुक्रमांक:- - -------------------------

**सूचकाची स्वाक्षरी**

10 अनुमोदकाचे नाव

_ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _

(आडनाव) (नाव) (वडिलांचे /पतीचे नाव)

11. मतदारसंघाच्या मतदार यादीतील अनुमोदकाचा अनुक्रमांक- ------------------------

**अनुमोदकाची स्वाक्षरी**

---

**(अ) उमेदवाराचे प्रतिज्ञापत्र**

निवडून आल्यास, संस्थेच्या समितीचा सदस्य् म्हणून सेवा करण्याची माझी तयारी, मी, याव्दारे व्यक्त करतो.

दिनांक -------------- उमेदवाराची स्वाक्षरी

(ब**) उमेदवाराचे प्रतिज्ञापत्र**

मी याव्दारे घोषित करतो की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 73 कअ मध्ये नमूद केलेली कोणतीही अपात्रता मी धारण करीत नाही.

दिनांक -------------------------------- उमेदवाराची स्वाक्षरी

_ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _

**(क) उमेदवाराचे प्रतिज्ञापत्र**

(अनुसूचित जातीच्या / अनुसूचित जमाती / इतर मागासवर्गीय प्रवर्ग/ विमुक्त जातीच्या/ भटक्या जाती / विमुक्त जाती / विशेष मागास प्रवर्ग यातील उमेदवाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र. कलम 73 ब )

मी, याव्दारे, घोषित करतो की, मी ------------------------------------------------ या जाती/ जमाती मधील असून सदरची जात / जमाती ही महाराष्ट्रामध्ये ---------------------------------------------- या राखीव प्रवर्गात मोडते. मी सदरच्या राखीव प्रवर्गात मोडत असल्याचे सक्षम अधिका-याने दिलेले जातीच्या प्रमाण पत्राची सत्य छायांकीत प्रत सोबत जोडत आहे.

दिनांक------------------------------------ उमेदवाराची स्वाक्षरी

_ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _

**निशाणी निवडल्याबददलचे प्रतिज्ञापन**

मी, याव्दारे, घोषित करतो की, माझ्या निवडणुकीसाठी मी निवडलेल्या निशाण्या, माझ्या पसंतीक्रमाने , खाली दर्शविल्या आहेत-

1. _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ 2. _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _

3. _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _

उमेदवाराची सही

_ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _

नामनिर्देशनाचा अनुक्रमांक-------------------------------------------------------

हे नामनिर्देशनपत्र माझ्या कार्यालयात मला --------------------(तास) वाजता------------------रोजी (दिनांक) उमेदवाराकडून/उमेदवाराच्या सुचकाकडून देण्यात आले.

दिनांक------------------ निवडणूक निर्णय अधिका-याची सही

_ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _

**सदरच्या नामनिर्देशन पत्रावर महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणूक नियम 2013 चे नियम 21** अनुसार मी हे नामनिर्देशन पत्र तपासले असून पुढील निर्णय घेतला आहे

नामनिर्देशन पत्रा स्विकारले आहे/ फेटाळले आहे.

( फेटाळले असल्यास कारणे नमूद करावीत)

दिनांक : -------------------------------------------------
--

निवडणूक निर्णय अधिकारी सही

**नामनिर्देशन पत्राची पोचपावती व छाननीची नोटीस.**

(नामनिर्देशन पत्र सादर करणा-या व्यक्तीला दयावयाचे)

नामनिर्देशन पत्राचा अनुक्रमांक - -------------------------सहकारी संस्था मर्या.,------------------------------तालुका----------------------------------जिल्हा,-------------------------------------
मतदारसंघातील सन ------ते ------- या कालावधी साठीची निवडणुकीसाठी उमेदवार------------------------------------------------------------------------यांचे नामनिर्देशन पत्र मला माझ्या कार्यालयात --------------------(तास) वाजता------------------रोजी (दिनांक) उमेदवाराकडून/उमेदवाराच्या सूचकाकडून मिळाले.

सर्व नामनिर्देशन पत्रे यांची छाननी -------------------------(तास) वाजता------------------रोजी (दिनांक)-------------------------ठिकाणी करण्यात येईल.

ठिकाण :--------------------

दिनांक :-----------------------

मुद्रा

--------------------------------------------

निवडणूक निर्णय अधिका-याची सही

**नमूना इ -6**

[नियम 27 पहा]

**उमेदवारी मागे घेण्याबाबत नोटीस**

----------------------------------सहकारी संस्था मर्या.,--------------------------तालुका,--------------
जिल्हा---------------------- च्या समितीवरील ------------------------मतदासंघातील सन ------ते -------
या कालावधी साठीची निवडणूक

---

निवडणूक निर्णय अधिकारी,
------------------------------यांस,

महोदय,
मी,------------------------------------------------------------------ वरील निवडणुकीतील उमेदवार, याव्दारे नोटीस देतो की, मी माझी उमेदवारी मागे घेत आहे.

ठिकाण :---------------------- ----------------------------------------------

दिनांक--------------------- उमेदवाराची सही

---

ही नोटीस मला माझ्या कार्यालयात, दिनांक---------------------------ला-------------(वेळ)वाजता----------------------श्री. (नाव)------------------------------------------------------------------- यांच्याकडून देण्यात आली.

दिनांक :---------------------- ------------------------------------
------- निवडणूक निर्णय अधिका-याची सही

– – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – –

**उमेदवारी मागे घेण्याची नोटीस मिळाल्याची पोचपावती**

(नोटीस पोचवणा-या व्यक्तिच्या स्वाधीन करावयाची)

---------------------------------------------सहकारी संस्था मर्या. च्या समितीवरील ---------------------------मतदार संघातील निवडणुकीतील उमेदवार------------------------------------------------------------यांनी दिलेली, उमेदवारी मागे घेण्याबाबतची नोटीस मला माझ्या कार्यालयात ------------------रोजी (दिनांक)------------ वाजता (तास) -------- यांच्याकडून प्राप्त झाली.

दिनांक :---------------------- -----------------------------------------
निर्वाचन अधिका-याची सही

- येथे योग्य असेल त्या प्रमाणे पुढील पैकी एक पर्याय दाखल करावा.-
  1.उमेदवार
  2.ही नोटीस हवाली करण्यासाठी उमेदवाराने लेखी प्राधिकृत केलेली , उमेदवाराची सूचक व्यक्ती
  3.वर नमूद केल्याप्रमाणे लेखी प्राधिकृत केलेला उमेदवाराचा निवडणूक प्रतिनिधी.

**नमूना इ -7**

**[नियम 28 पहा]**

**निवडणूक लढविणा-या उमेदवारांची यादी**

---------------------------------------------सहकारी संस्था मर्या.,-------------------------
-तालुका,---------------जिल्हा---------------------- यांची ------------------मतदारसंघातील सन --
----ते ------- या कालावधी साठी निवडणूक

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | उमेदवाराचा पत्ता | उमेदवाराला नेमून दिलेली निशाणी |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |

ठिकाण :--------------------

दिनांक :-----------------------   ----------------------------------
------------

निवडणूक निर्णय अधिका-याची सही

टीप **- निवडणूक लढविणा-या उमेदवारांची यादी त्यांच्या आडनावाच्या इंग्रजी वर्णमालेप्रमाणे तयार करण्यात यावी. उमेदवाराचे आडनाव नसल्यास त्यांच्या नावाच्या इंग्रजी वर्णमालेप्रमाणे यादी तयार करण्यात यावी. सदर यादी निवडणूक निर्णय अधिका-याच्या कार्यालयाच्या व संस्थेच्या सूचना फलकावर प्रसिध्द करण्यात यावी.**

**नमूना इ- 8**
**[ नियम 29(1) पहा]**
**निवडणूक प्रतिनिधींची नेमणूक**

----------------------------------------------सहकारी संस्था मर्या.,----------------------
तालुका,---------------जिल्हा---------------------- यांची -----------------------------
मतदारसंघातील सन ------ते ------- या कालावधी साठी समितीची निवडणूक

---

प्रति,
निवडणूक निर्णय अधिकारी,
------------------------------- यांस,

मी,-----------------------------------------------------वरील निवडणुकीतील उमेदवार, याव्दारे अशी

नोटीस देतो की, मी------------------------------------------------( मतदार यादीतील क्रमांक- ---------) याची उक्त निवडणुकीत माझा निवडणूक प्रतिनिधी म्हणून आजपासून नेमणूक करीत आहे.

ठिकाण :--------------------

दिनांक :----------------------- ------------------------------------------------

उमेदवाराची सही

---

मी वरील नेमणूक स्वीकारीत आहे.

ठिकाण :--------------------

दिनांक :----------------------- ------------------------------------------------

निवडणूक प्रतिनिधीची सही

---------------------------------------------------------------------------------------

**नमूना इ- 8 - अ**

**[ नियम 30 पहा]**

**मतदान/मतमोजणी प्रतिनिधींची नेमणूक**

----------------------------------सहकारी संस्था मर्या.,-------------------तालुका,------------ -जिल्हा--------

यांची ---------------------मतदारसंघातील सन ------ते ------- या कालावधी साठी समिती सदस्याची निवडणूक.

प्रति,

निवडणूक निर्णय अधिकारी / मतदान केंद्राध्यक्ष,

मी,-----------------------------------------------------------------विद्यमान निवडणूकीतील उमेदवार------------------------------------------------------यान्दारे , विनंती करतो की, मी ---------------------------------------------------------------------------------------यांना मतदान प्रतिनिधी म्हणून-----------------------------------------------------------------------------------------------मतदान केंद्रात---------------------------------------------मतदान केंद्र/मतदान मंडप क्रमांक--------------------------------------------------येथे उपस्थित राहण्यासाठी नियुक्त करीत आहे.

मतमोजणीसाठी निश्चित केलेल्या जागी उपस्थित राहण्यासाठी मतमोजणी प्रतिनिधी म्हणून नियुक्त् करीत आहे.

दिनांक :----------------------  ------------------------------------

उमेदवाराची सही

मतदान निर्णय अधिकारी / मतदान अधिकारी यांच्यासमोर सही करुन मतदान / मतमोजणी प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठीच्या प्रतिज्ञापत्रावर सही करावे.

मी मतदान प्रतिनिधी/मतमोजणी प्रतिनिधी म्हणून काम करण्यास संमती देतो.-------------------------

दिनांक :----------------------  ------------------------------------

मतदान/मतमोजणी प्रतिनिधीची सही

मी, याव्दारे घोषित करतो की, मी.................................. मतदारसंघातील निवडणुकीच्या वेळी, अधिनियम किंवा त्याखालील नियम किंवा उपविधी अन्वये निषिध्द असलेले कोणतेही कृत्य करणार नाही.

मतदान/मतमोजणी प्रतिनिधीची सही

माझ्यासमोर सही केली.

निवडणूक निर्णय अधिकारी/ मतदान केंद्राध्यक्ष/ मतमोजणी अधिकारी

**नियम इ- 9 E -9**

**[नियम 32 पहा]**

बिन**विरोध निवडणुकीच्या निकालाच्या प्रतिज्ञापनाचा नमुना**

(संस्थेचे नांव)------------------------------------------------------------ सहकारी संस्था मर्या.,--------------------------------------------- ता.---------------------------------जि. ची (मतदार संघाचे नांव)----------------------------------------------------------- मतदारसंघातील सन ------ते ------- या कालावधी साठीची निवडणूक.
निवडणूकीचे वर्ष

महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणूक नियम 2013 च्या नियम 37 मधील तरतुदींना अनुसरून, मी घोषित करतो की, खालील नमूद केलेले उमेदवार त्यांच्या नावासमोर नमूद केलेल्या मतदारसंघातून बिनविरोध निवडून आलेले आहेत कारण त्या जागेसाठी ते एकच उमेदवार होते.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | मतदारसंघाचे नाव |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |

मी असे देखील प्रमाणित व घोषित करतो की, वरील उमेदवार संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या त्या त्या जागांवर यथोचितरित्या निवडून आलेले आहेत.

ठिकाण :---------

दिनांक :----------- निवडणूक निर्णय अधिका-याची सही

**नमूना इ-10**
**[ नियम 35 पहा]**
**मतपत्रिकेचा नमूना**

संस्थेचे नांव ---------------------------------------------------------- सहकारी संस्था मर्या.,--------- ----- ता. --------जि.---------------- ची -----------------------------(मतदारसंघाचे नांव) मतदारसंघातील सन ------ते ------- या कालावधी साठीची निवडणूक.

मतपत्रिका क्र.

**==============================================================**

संस्थेचे नांव ---------------------------------------------------------- सहकारी संस्था मर्या.,--------- ------ ता.----------जि.----------------- ची ---------------------------- (मतदार संघाचे नांव) मतदारसंघातील सन ------ते ------- या कालावधी साठीची निवडणूक.

निवडणूकीचे वर्ष-

| **अ.क्र.** | **उमेदवाराचे नांव** | **नेमून दिलेली निशाणी** |
|---|---|---|
| **1** | **2** | **3** |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

#####

**नमूना इ -11**

**[नियम 41पहा ]**

**आव्हानित मंताची यादी**

संस्थेचे नांव ------------------------------------------------ सहकारी संस्था मर्या.---------------- , ता----------------.जि. ------------------------------------ची सन ------ते ------- या कालावधी साठीची निवडणूक.

(अ) मतदार संघ --------------------------------

(ब) मतदान केंद्र --------------------------------

(क) मतदान केंद्राचा क्रमांक (असल्यास) ----------------------

| नोंदीचा अनुक्रमाक | मतदाराचे नांव | मतदारांच्या यादीतील अनुक्रमाक | मतदाराची सही किंवा अंगठयाची निशाणी व त्याचा पत्ता | आव्हान देणा-या व्यक्तीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | |

| दिलेली अनामत रक्कम (रू.) | ओळखीबाबतचा पुरावा अथवा ओळख पटवणा-या व्यक्तीचे नांव | प्रत्येक बाबतीतील मतदान केंद्राध्यक्षाचा आदेश | अनामत रक्कम परत करण्यात येईल तेव्हा ती मिळालेबद्दल आव्हानाची सही | अनामत रक्कम परत न दिल्यास मतदान केंद्राध्यक्षाचा शेरा |
|---|---|---|---|---|
| ६ | 7 | 8 | 9 | 10 |
| | | | | |

ठिकाण -------------------------

दिनांक ---------------------------

मतदान केंद्राध्यक्षाची सही

**नमूना इ – 12**

**[नियम 46 पहा]**

**अंध किंवा अपंग मतदारांच्या सोबत्याने करावयाच्या प्रतिज्ञापनाचा नमूना**

संस्थेचे नांव --------------------------------------------- सहकारी संस्था मर्या.,------------------
ता.-----------------जि.--------------हिच्या--------------------- मतदारसंघातील सन ------ते ------
- या कालावधी साठीची निवडणूक.

–––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––
––––––––––––––––––––––––––––

मतदान केंद्राचा क्रमाक व नांव -------------------------------------------
मी, ------------------------------------------------------------------------------वय-------
------------------- रा.------------------------------------------------------------------------
------------------- याव्दारे घोषित करतो की,

अ) मी श्री/श्रीमती----------------------------------------------------- याचा सोबता म्हणून काम करु इच्छितो, ते वरील निवडणूकीतील अंध/अपंग मतदार असून मतदाराच्या यादीतील अनुक्रंमाक------- वर त्यांचे नांव आहे.

ब) मी आजच्या दिवशी यापूर्वी कोणत्याही मतदान केंद्रावर इतर कोणत्याही मतदाराचा सोबती म्हणून काम केलेले नाही.

क) उपरोक्त मतदाराच्या वतीने मी नोंदलेले मत गुप्त ठेवीन.

ठिकाण --------------------

दिनांक-------------------------------- -------------------------

सोबत्याची सही

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

**नमूना इ -13**
**[नियम 46(2) पहा ]**

**अंध किंवा अपंग मतदारांची यादी**

संस्थेचे नांव ------------------------------------------- सहकारी संस्था मर्या.,---------------------
- ता.------------जि. -----------------ची -------------------मतदारसंघातील सन ------ते -------
या कालावधी साठी व्यवस्थापन समिती सदस्यांची निवडणूक.

मतदान केंद्राचा क्रमाक व नांव

| मतदाराचा अनुक्रमांक | मतदाराचे संपूर्ण नांव | सोबत्याचे संपूर्ण नांव | सोबत्याचा पत्ता | सोबत्याची सही किंवा अंगठयाचा ठसा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | |

ठिकाण --------------
दिनांक ---------------- मतदान केंद्राध्यक्षाची सही

**नमूना इ 14**

**[नियम 48(2 पहा)]**

**दुबार नोंदलेल्या मतांची यादी**

संस्थेचे नांव ------------------------------------------------ सहकारी संस्था मर्या.,------------------- ता.-------------जि------------------------------------. ची सन ------ते ------- या कालावधी साठीची निवडणूक.

(अ) मतदार संघ ------------------------------

(ब) मतदान केंद्र ------------------------------

(क) मतदान केंद्राचा क्रमांक(असल्यास)----------------------

| नोंदीचा अनुक्रमाक | मतदाराचे नांव | मतदार यादीतील मतदाराचा अनुक्रमाक | मतदाराचा पत्ता | दुबार नोंदलेल्या मतपत्रिकेचा अनुक्रमाक | ज्या व्यक्तीच्या नावाने पुर्वीच मतदान केले असेल त्याचा मतदार यादीतील अनुक्रमाक | मतदाराची सही किंवा अंगठयाचा ठसा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

ठिकाण ----------------------

दिनांक -------------------------- --------------------

--------------- मतदान केंद्राध्यक्षाची सही

**नमूना इ -15**

**[ नियम 51 पहा]**

**मतपत्रिकेचा हिशोब**

---

संस्थेचे नांव ----------------------------------------सहकारी संस्था मर्या.,------------------------- ता.-----------------जि.----------------------------------- ची------------------ मतदारसंघातील सन ------ते ------- या कालावधी साठीची निवडणूक

मतदान केंद्र .--------------------------

मतदान मंडप क्रमांक------------------

| **अ.क्र. .** | **तपशील** | **अ. क्र. -- पासून------ पर्यंत** | **एकूण** |
|---|---|---|---|
| **1.** | मतदान केंद्राध्यक्षास मतदान मंडपावर मिळालेल्या मतपत्रिकांची संख्याआणि जर *मतदान केंद्रावर एकापेक्षा मंडपअसल्यास प्रत्येक मंडपावर अधिक* | | |
| **2** | मतदारांना दिलेल्या मतपत्रिकांची संख्या | | |
| **3** | परत केलेल्या, वापरात न आणलेल्या, मतपत्रिकांची संख्या | | |
| **4** | रद्द केलेल्या मतपत्रिकांची संख्या | | |
| **5** | दुबार नोंदणीसाठी वापरलेल्या, मतपत्रिकांची संख्या | | |

ठिकाण:-

दिनांक---------------------------  मतदान केंद्राध्यक्षाची सही

टीप:- मतदान केंद्रावर एकापेक्षा अधिक मतदान मंडप असल्यास अशा प्रत्येक मतदान मंडपाच्या बाबतीत वेगळा हिशेब करण्यासाठी नमूना जोडण्यात येईल

**नमूना इ -16**

**[नियम 59 व 63 पहा ]**

**निकालपत्र**

---

संस्थेचे नांव------------------------------------ सहकारी संस्था मर्या.,------------------------ ता.----------------------जि. -----------------ची -------------------- मतदारसंघातील सन ------ते ------- या कालावधी साठीची निवडणूक.

---

| मतदान केंद्र | | अ.ब.क.ङ इत्यादींना मिळालेली एकूण वैध मते | | | | एकूण वैध मते | फेटाळण्यात आलेली मते | संख्या | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | मतदान केंद्राचे नांव | अ | ब | क | ड | | | मतदान केंद्रावरील एकूण मते | प्रदत्त मते |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

---------------या मतदान केंद्रावर नोंदविलेल्या मतांची एकूण संख्या.

ठिकाण ---------------------------

दिनांक -------------------------- --------------------------------

निवडणूक निर्णय अधिका-याची स्वाक्षरी

**नमूना इ -17**

**[ नियम 64 पहा ]**

**निवडणूक निकालाचा आणि समितीच्या सदस्यांची नावे प्रसिध्द करण्याचा नमुना**

संस्थेचे नांव------------------------------ सहकारी संस्था मर्या.,---------------------
ता.------------------------------जि. -------------------------ची सन ------ते ------- या कालावधी साठीची निवडणूक

1) सन - 201 ते 201

2) मतदारसंघाचे नाव :- ------------------------------------

| अ. क्र. | उमेदवाराचे नाव व पत्ता | उमेदवाराला मिळालेली एकूण वैध मते |
|---|---|---|
| 1 | | |
| 2 | | |
| 3 | | |

(अ) एकूण वैध मतपत्रिका संख्या -
(ब) एकूण अवैध मतपत्रिका संख्या -
(क) दुबार नोंदलेल्या मतपत्रिका संख्या -

मी घोषित करतो की, (नाव)------------------------------------ (पत्ता) ------------------------
---- हे यथोचित रीत्या निवडून आलेले आहेत

मुद्रा

----------------------------------------
-----

निवडणूक निर्णय अधिका-याची स्वाक्षरी

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

शासनाचे सचिव